
धाराशिव के सुप्रसिद्ध जैनसाहित्योद्धारक और विद्याव्यासङ्गी नवयुवक श्रीयुत सेठ मोतीलाल हिराचन्द गांधीने इसका सुंदर मराठी अनुवाद करके महाराष्ट्रप्रान्तके जैन बन्धुओंका बहुत उपकार किया है। यद्यपि माणिकचन्द्र ग्रन्थमालामें मूल संस्कृत प्राकृत ग्रन्थही प्रकाशित किये जाते हैं परन्तु श्रीयुत मोतीलालजीके इस आग्रहको कि मराठी अनुवाद भी साथमें रहे, हम अस्वीकार न कर सके। यह ग्रन्थ उन्होंने परार्थदृष्टिसेही सम्पादित किया है और इसकी चारसौ प्रतियाँ अपनेही खर्चसे ग्रन्थमालाको अर्पण कर दी हैं। इसके लिए ग्रन्थमाला समिति उनके प्रति अपनी हार्दिक कृतज्ञता प्रकाशित करती है।

ता २४।११।१७ नाथूरामप्रेमी
मंत्री—मा. ग्रं. माला

प्रस्तावना.



धर्मामृतमयीं वृष्टिस्त्वा भव्येषु निर्वृत
तं पार्श्वताप मूर्च्छाभूमायीं पर्युपास्महे ॥
—पं आशाधर

जैन समाजात इ स, च्या सातव्या शतकापासून पधराव्या शतकापर्यंत मोठे मोठे पडित व राजे होऊन गेले असून त्यानीं सस्कृत वाङ्मयात बरीच भर घातली आहे या कालानतरचें वाड्मय मुख्यत्वें करून प्रचलित भाषांतून झालेलें आहे व त्या पूर्वीचें वाङ्मय फारसें उपलब्ध नसून जें आहे तें प्राकृत भाषातून आहे पण वर दिलेल्या काळात जैन पडितानीं इतकी उत्कृष्ट ग्रथरचना करून ठेविली आहे कीं, त्यानीं सस्कृत वाङ्मयात वैदिकावरहि ताण केली असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं जैन पडिताना या काळात राजाश्रय होता व अशा आश्रयाशिवायहि केवळ धर्मप्रेमामुळेंच काहीं पडितानीं वाङ्मय रचना केलेली आहे सरस्वतीपुत्र आशाधर पडित वरील दोन्ही वर्गात मोडतात

पडितजींचा काळ इ स ११८० ते १२५० पर्यंतचा असावा असें त्यानीं लिहिलेल्या ग्रथावरून वाटतें त्याचें जन्मस्थान मेवाड राज्यातील माडलगड हें होय त्याकाळीं या प्रदेशास सपादलक्ष म्हणत या गावाला एक सरोवर होतें त्याचें नाव सावर व एक मडलक नावाचा किल्ला होता, व गडाचे जागीं मड-लश नावाची ही विशाल नगरी होती त्याच्या वडिलाचें नाव सल्लक्षण व मातोश्रींचें नाव श्री रत्नाबाई होतें सल्लक्षण हे राजकारणात बरेंच लक्ष घालित ह्यामुळें मेवाडचें राज्य इ स ११९३ मध्यें शाहाबुद्दीनघोरीच्या टोळधाडीस बळी पडल्यावर त्याना स्वरक्षणासाठीं माळवा प्रातात येऊन राहावें लागलें माळवाप्रातावर परमारवंशाचे राजे राज्य करीत होते राजा भोजनतर उदया-दित्य, नरवर्मा, यशोवर्मा, अपवर्मा इतक राजे होऊन गले त्यावेळीं अजयवर्मा किंवा विन्ध्यवर्मा राज्य करीत होता विद्वानाचा आश्रयदाता म्हणून भोज-राजाची कीर्ति अजून आहे ती विन्ध्यवर्माचे वेळींहि अखड होती म्हणूनच त्यानें सल्लक्षणसारख्या विद्वानाला सन्मानपूर्वक आश्रय दिला

माळवाप्राताची राजधानी धारानगरींत सल्लक्षण येऊन राहिले तेव्हा आशा-

घराचे वय १०।१२ वर्षाचें होतें. पण त्याना महावीरपंडिताकडे जैनेंद्रप्रमाण व जैनेंद्रव्याकरणासारखें ग्रंथ पढण्यास पाठविण्यात आलें. महावीरपंडित हे सुप्रसिद्ध वादिराजपंडित धरसेनाचें शिष्य होते त्यांच्याजवळ एक तपपर्यंत आशाधरानीं अध्ययन केल्यावर त्यानीं स्वत. ग्रंथरचनेस प्रारंभ केला. माळवाधीशाचे पदरीं त्यावेळीं वादीन्द्रविशालकीर्ति, परराष्ट्रमंत्री कविराज बिल्हण, देवचंद, मदनोपाध्याय, केल्हण, उदयसेन वगैरे बरेच विद्वद्वर्य होते. त्या सर्वांनी आशाधराच्या विद्वत्तेची मुक्त कंठानें प्रशंसा केलेली आहे. बिल्हणनें त्याना 'सरस्वति पुत्र' ही पदवी दिली. पंडित उदयसेनानें त्याना कलिकालीदास म्हणून संबोधिलें आहे. मदनकीर्तियतीनीं त्याना प्रज्ञापुञ्ज म्हटलें आहे. त्याची ही सर्वतोमुखी कीर्ति ऐकून देशांत राहून अनेक विद्यार्थी त्याचेकडे निरनिराळ्या शास्त्राच्या अध्ययनार्थ येऊं लागले व इतक्या लहान वयातही सर्वांना आपल्या विषयांत त्यानीं पारंगत करून आपला लौकिक वाढविला. खालीं दिलेल्या श्लोकांत ह्याच गोष्टीबद्दलचा उल्लेख आहे.

योद्राग्व्याकरणाब्धि पारमनयच्छुश्रूषमाणान्न कान्
षट्तर्कीपरमास्त्रमाप्य न यतः प्रत्यर्थिनः केऽक्षिपन् ।
चेरुः केऽस्खलितं न येन जिनवाग्दीपं पथिग्राहित
प्रीत्या काव्यसुधां यतश्च रसिकेष्वापुःप्रतिष्ठांन के ॥

"पंडित आशाधराच्या शिष्यापैकीं असा कोण आहे कीं ज्याला त्यानीं व्याकरण महोदधीच्या पैलतीरास अल्पावधींत पोहोंचविलें नाहीं, असा कोण आहे कीं ज्यानें षट्दर्शनाचें अमोघ शस्त्र हातीं घेऊन प्रतिवादियाना जिंकलें नाहीं, असा कोण आहे कीं आशाधरपंडिताच्या तोंडून जिनवाणी ऐकून तो मोक्षमार्गी बनला नाहीं, त्याचप्रमाणें असा कोण आहे कीं, जो त्याच्या मुखांतील काव्यामृत पिऊन रसिक पुरुषांत प्रतिष्ठा पावला नाहीं." असा वरील श्लोकाचा मतितार्थ आहे. तात्पर्य हें कीं पंडित आशाधराच्या शिष्यवृंदात मुनिगण, शास्त्रपटु, शास्त्री व पंडित आणि मर्मज्ञ रसिक वगैरे सर्वशास्त्रपारंगत मंडळी होती. महान् वैय्याकरणी देवचंद्र, न्यायशास्त्र व षट्दर्शनाभिज्ञ विशाळकीर्ति भट्टारक विनयचंद्र व रसिकवर मदनोपाध्याय हे त्यांचे शिष्य होत.

त्याच्या एकुलत्या एक छाहड नावाच्या पुत्रानेंहि त्याची कीर्ति कायम राखली होती. विन्ध्यवर्मा राजानंतर सुभटवर्मा गादीवर येऊन त्याचेनंतर अर्जुनवर्मा

गादीवर बसला हा महान कवि व शास्त्रज्ञ होता. ह्याच्या पदरी बरील सर्व विद्वान् व इतरहि अनेक पंडित होते छाहडानेंहि आपल्या विद्वत्तेनें राजास खुप केलें. ह्याचे कारकीर्दींत सल्लक्षण होते ते परराष्ट्रमंत्री होते असें दिसून येते. अर्जुनवर्मा निपुत्रिक वारला तेव्हां त्याच्या चुलत पणजाचा नातु देवपाळ किंवा साहसमल्ल यास गादी मिळाला त्याचेनंतर त्याचा मुलगा जयसिंह उर्फ जैतुगिदेव गादीवर बसला ह्याचे कारकीर्दींतच व आशाधरानीं सागरधर्मामृत नावाची टीका लिहिली धारानगरींत असताना त्यांनीं पाच राजाच्या कारकीर्दी पाहिल्या

पंडितजी हे नुसते एका शास्त्रांतीलच पंडित नव्हते, तर वैद्य, ज्योतिष वगैरे शास्त्रांतहि ते पारंगत होते त्याशिवाय सम्यक्धर्मावर त्यांचें खरेंखुरें प्रेम होतें अनेक धर्मग्रंथ लिहून जिनवाणीची सेवा करण्याकरिता केवळ ते धारानगरी सोडून निघाले एवढेंच नव्हे तर जवळजवळ प्रपंच सोडून धार संस्थानातील नालछानगरींत येऊन ते राहिले त्याकाळीं नालछा गावास नलकच्छपूर म्हणत असत हल्लीप्रमाणे त्यावेळींहि हें गाव सधन जैन श्रावकानी मंडित होते असे दिसते एर्व्हीं हें गाव आशाधरानीं पसंत केलें नसतें " श्रीमदर्जुन भूपाल राज्ये श्रावकसंकुले। जिनधर्मोदयार्थं या नलकच्छपुरे ऽवसत् असें म्हटलेलें आहे ह्यावरून नालछानगरीच का पसंत केली व त्याचा हेतु किती उच्च हें स्पष्ट दिसत धन्य त्या महाभागाची! अशा प्रतिगौतमगणधरामुळेंच अजून जिनवाणी प्रथमरूपानें टिकून राहिली आहे असे म्हणण्यास हरकत नाहीं धर्माखातर सर्व हाल सहन करून स्वशक्त्यनुसार शासनसेवा करण्यास आशाधर पंडिताप्रमाणे श्रावक जर तयार होतील तर ह्या पडत्या काळांतहि जिनशासनो द्धार झाल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं नालछाला ते इ स १२२०–२५ च्या दरम्यान गेले असावे असा अंदाज आहे ह्यानंतर जवळजवळ २॥ तपाचा काळ त्यांनीं केवळ ग्रंथ लेखनांत घालविला

सध्या आशाधराचे मुख्य तीन ग्रंथ सुलभ आहेत (१) जिनयज्ञकल्प, (२) सागारधर्मामृत (३) अनागारधर्मामृत या तीन्ही ग्रंथात त्यांनीं आपली विस्तृत प्रशस्ति लिहिली आहे व संवत् १३०० पर्यंत त्यांनीं जेवढया ग्रंथांची रचना केली त्या सर्वांचीं नावें प्रशस्तींत आहेत ते ग्रंथ

(१) प्रमेयरत्नाकर— हा न्यायाचा ग्रंथ पद्यमय आहे

(२) भरतेश्वराभ्युदय— उत्तम काव्य प्रत्येक सर्गाच्या शेवटीं 'सिद्ध'

शब्द येतो. तो स्वोपज्ञटीकेसह लिहिला. हा ग्रंथ सोनागिरीचे भट्टारकाचे भांडारांत आहे.

(३) धर्मामृतशास्त्र— हा स्वटीकेसह सुंदर लिहिला.

(४) अष्टांगहृदयोद्योतिनी— ही वाग्भटसंहितेची टीका होय.

(५) मूलाराधना— भगवती आराधनेवरील टीका. नुकतीच उपलब्ध नव्हे प्रसिद्ध झाली आहे.

(६) इष्टोपदेश— यावरील टीका

(७) अमरकोशावर क्रियाकलाप नावाची टीका लिहिली.

या ग्रंथाचा उल्लेख जिनयज्ञकल्पाच्या प्रशस्तींत आहे. हे वि. संवत् १२८५ च्या अगोदर रचले गेले. यानंतर सं. १२९६ पर्यंत सागारधर्मामृताची टीका लिहिपर्यंत खालील ग्रंथ लिहिले

(१) रुद्रटकवीच्या काव्यालंकारावरील टीका ही सोनागिरचे भांडारांत आहे.

(२) सहस्रनाम स्तोत्र— अरहंतदेवाचें. सर्वत्र उपलब्ध

(३) जिनयज्ञकल्प— सटीक उपलब्ध-प्रसिद्ध.

(४) त्रिषष्टिस्मृतिशास्त्र— संक्षिप्त ६३ शलाकापुरुषाचें चरित्र स्वटिप्पणीसह सध्यां प्रसिद्ध करीत आहोत

वि. सन १२९६ च्या नंतर लिहिलेले ग्रंथ अनगारधर्मामृताच्या टीकेंत आढळतात ते

(१) राजीमतीविप्रलंभ नांवाचे खण्डकाव्य स्वोपज्ञटीकेसह अनुपलब्ध

(२) अध्यात्मरहस्य— हा वडिलांच्या आज्ञेवरून यांनी लिहिला. योगमार्गावरील शास्त्र

(३) रत्नत्रयविधान— रत्नत्रयविधानपूजा व महात्म्याचें वर्णन करणारा ग्रंथ

जिनयज्ञकल्प हा ग्रंथ प्रतिष्ठेसंबंधीं होय. हा खंडेलवाल वंशाचे भूषणरूप अल्हणचे पुत्र धावकधर्मी स्वलीन, नलकच्छपूरचे रहिवाशी, परोपकारी, देवपूजा पात्रदान व जिनशासन उद्योत करणारे प्रतिष्ठाप्रणी पापासापूरच्या वारंवार आग्रहावरून लिहिला व तो आश्विन शु० १५ वि. सं. १२८५ त देवपालाच्या राज्यांत नलकच्छपूर नगरीच्या नेमिनाथ चैत्यालयांत पूर्ण झाला.

सागारधर्मामृत — ही सुदर अष्टाध्यायी टीका पोष व ॥ ७ स १२९६ त पूर्ण केली त्यावेळीं श्रीमान् जैतुगिदेव माळव्यावर राज्य करीत होते

अनागारधर्मामृताची टीका स्वोपज्ञटीका त्यांनीं पापासाधूचे पुत्र बहुदेव व पद्मसिंह बहुदेवाचे पुत्र हरदेव, उदय व स्तभदेव यांपैकीं हरदेवाच्या विनतीवरून व धनचद्राच्या आग्रहावरून ही टीका लिहिली गेली ही नलकच्छपुरांत नेमिनाथ भगवानाचे चैत्यालयात वि स १३०० च्या कार्तिक महिन्यांत पूर्ण झाली

याशिवाय नित्यमहोद्योत, भूपोळस्तोत्र ग्रथ लिहिले आहेत ह्या १५।२० ग्रथामध्यें धर्मशास्त्रपर, तत्त्वज्ञानपर, वैद्यक, काव्यशास्त्र, भक्ति आणि योगमार्गपर असे बहुविध ग्रथ आहेत तेव्हां मदनकीर्तियतीनीं आशाधराना प्रज्ञापुञ्ज ही पदवी दिली ती किर्ती सार्थ आहे हें उघड होत आहे.

जिनयज्ञकल्पग्रथांत ते म्हणतात कीं 'यावल्लिोक्या जिनमन्दिरार्चा तिष्ठन्ति शक्रादिभिरर्च्यमाना । तावज्जिनादि प्रतिमाप्रतिष्ठा शिवार्थिनाऽनेन विधापयन्तु ॥' जोपर्यंत ह्या तीन लोकात इद्रादिकाकडून जिनभगवानाची पूजा होत राहील तोपर्यंत ह्या ग्रथाच्या आधारानें कल्याणेच्छु जिनबिंबाची प्रतिष्ठा करें त त्यांच्या त्या इच्छेप्रमाणें का वरें होणार नाहीं ? अमोलिक ग्रथ लिहून त्यानीं तसें करण्याचा म र्ग सुलभ करून दिलेला आहे व त्याचा लाभ श्रावक घेत आहेतच सागरधर्मामृताच्या भव्यकुमुदचंद्रिकानामक टीकेत लिहितात कीं—

> यावत्तिष्ठति शासन जिनपतश्छेदानमन्तस्तमो ।
> यावच्चार्कनिशाकरौ प्रकुरुत पुसा दृशामुत्सवम् ।
> तावत्तिष्ठतु धर्मसूरिभिरियं व्याख्यायमानानिशम् ।
> भव्यानां पुरतोत्र देशविरताचारप्रबोधाद्धुरा ॥

जिनशासन जोपर्यंत वर्धमान आहे, म्हणजे यावचद्र दिवाकरौ श्रावक धर्माचें ज्ञान करून देणारी ही टीका मुनिगणाकडून वाचली जावो आशाधर पंडितांची ही इच्छा सुद्धा श्रावकमडळीकडून पूर्ण करण्यांत आली पाहिजे। पहिल्या श्लोकांतील प्रतिष्ठामहात्म्यवाची इच्छा कांहीं अशीं पूर्ण करण्यात येत आहे, पण दुसऱ्या श्लोकांतील श्रावकधर्मप्रचाराची इच्छा तितक्या प्रमाणांत पूर्ण करण्यात येत नाहीं ही दुःखाची गोष्ट होय श्रावक भरपूर असतील

तर मुनिगण सागरधर्मामृतासारखे ग्रंथ वाचून शास्त्रविर्तील त्या रायकांचे मुनाहि असावयास पाहिजेत हें खरें पण श्रावक समुदाय बहुसंख्यांक व बहुश्रुत असला पाहिजे मग मुनीहि चागल्या निघतात नाहींतर हल्लीसारखी शोचनीय व लज्जास्पद स्थिति प्राप्त होते जसे श्रावक तसे मुनि! व असल्या श्रावक श्राविका व साधुसाध्वींचा अर्हत्संघ जिनशासनाचें वर्धन कसें करणार! म्हणून श्रावकांची संख्या वाढविली पाहिजे त्याना सच्छ्रावक बनावेले पाहिजे व सम्यक्त्वव्रतधारी मुनींनाच आश्रय दऊन जैनशासनोद्धाराचें कार्य आपण केलें पाहिजे प्रत्येक व्यक्तीस आत किंवा ऋषिऋण असत तें फेडल्याशिवाय मुक्ति नाहीं तें फेडण्यासाठी पंडित आशाधरासारख्या धर्मरक्षकांची इच्छा पूर्ण केली पाहिजे मुसलमानाच्या धोळधाडीच्या काळात जिनवाणीचें रक्षण व वर्धन करून ज्या पंडित प्रवरान जिनानुयायांवर महदुपकार करून ठेवले त्याचें ऋण स्वकल्याणासाठींच त्याचे ग्रंथ वाचन व प्रयोक्त आचरण करून आपण फेड वयास नको काय? तसें न करणें ही मोठी कृतघ्नता होय, म्हणून तसें करण्याशिवाय गत्यंतर नाहीं आशाधरपंडितासारख्याचें ग्रंथ वाचून व स्वतंत्र ग्रंथरचना करून श्रावकगण जिनवाणीचा प्रसार करतील अर्सा आशा आहे असो

पंडित आशाधराच्या ज्ञातीस हल्ली बघेरवाल म्हणतात त्याच्या पत्नीचें नाव सरस्वती त्यांना छाहड नामक पुत्र होता हा मुलगा विशेष विद्वान नव्हता असें दिसते पण आशाधराचे अनेक शिष्य बरेच विद्वान होते त्यापैकी अर्हद्दास कवीचें, पुरुदेवचम्पू, मुनिसुव्रत काव्य भव्यजनकण्ठाभरण हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत पंडितजी शेवटपर्यंत गृहस्थच होते पण त्यांचेजवळ अनेक मुनींनी शास्त्राध्ययन केले असून त्यांनी धर्मप्रभावना बरीच केली आहे ते व्रती श्रावक होते वर दिलेल्या त्यांच्या ग्रंथापैकीं कांहीं ग्रंथ अजून अप्रसिद्ध आहेत त्यापैकी आम्ही प्रसिद्ध करीत असलेला एक ग्रंथ होय त्रिषष्टिस्मृतिशास्त्र हा ग्रंथ ५१९ वर्षांचा ली भांडारकर इन्स्टिटयूट मधून आणला हता याचे मराठी भाषांतर करून तो जनतेस सादर करण्याचा विचार तेव्हां पासून करीत होता पण तसा योग येईना कांहीं वर्षांपूर्वी मूळ संस्कृत ग्रंथच श्री माणिकचंद ग्रंथमालेंतून प्रसिद्ध करण्याचें ठरवून श्री प नाथरामप्रेमीकडे पाठवून दिला होता पण तो अगदीं लहान आहे त्याला आणखी एक तितकाच लहान ग्रंथ जोडावा या म्हणजे मग आम्ही छापून घेऊ असें उत्तर आलें तव्हा तो

तथाच पहून राहिला मध्यतरी जैनज्ञानकोशासाठी आदिपुराण व उत्तरपुराण वाचण्यास हाती घेतले त्यावेळी त्रिषष्टिस्मृतिच्या अनुवादाची कल्पना डोक्यात आली त्याच कल्पनेचे हे मूर्तस्वरुप म्हणजे प्रस्तुतचा अनुवाद होय. हा अनुवाद मूळ श्लोकातील अर्थाला धरून पण मागील व पुढील संदर्भ समजावा या दृष्टीने लिहिला आहे. कारण त्रिषष्टिस्मृति हें शास्त्र अगदीं क्लिष्ट व संक्षिप्त आहे. त्यात केवळ ४८० श्लोकात त्रेसष्ट शलाका पुरुषाचेच चरित्र गाविले आहे. आजपर्यंत जैनवाङ्मयकुसुमालेतर्फे मी जैन समाजाची थोडीबहुत सेवा केली आहे पण हा ग्रंथ त्या मालेतर्फे प्रगट न करता श्री. माणिकचंदग्रथमालेतर्फे प्रसिद्ध करण्याची इच्छा होती अनुवाद पूर्ण होताच पुन्हा प श्रीनाथुरामप्रेमी व मालेचे दुसरे श्री. ठाकरदास भगवानदास याना भेटून त्याची सम्मति घेतली. सम्मतिबद्दल ट्रस्टीवर्य अभिनंदनास पात्र आहेत सदर मालेने ग्रथप्रकाशनाचे काम बरेच केले आहे मराठी भाषा जाणणारे जैन बहुसख्याक असल्यामुळे मराठी अनुवादितग्रथ ' माणिकचद ग्रथमाला ' मधून मधून असेच प्रसिद्ध करील अशी पूर्ण अपेक्षा बाळगतो मालेची सांपत्तिकस्थिती सध्या खालावलेली आहे. त्यामुळे आम्ही हा ग्रथ आमच्या खर्चानीच छापवून मालेतर्फे प्रसिद्ध करीत आहोत असाच हातभार प्रत्येक जैनधर्मप्रेमीयानी मालेला लावून माला अखड, अव्याहतपणें चालू राहील असा प्रयत्न करणे त्याचें मुख्य कर्तव्य होय अशा बहुमूल्य ग्रथप्रकाशनाचें कार्य करणाऱ्या माला आपणात नाहींत इतराच्या वाङ्मयक्षेत्राकडे पाहिले तर आपले वाङ्मयप्रसिद्धीकरणाच क्षेत्र अगदीं क्षुद्र दिसतें एवढ्या मोठ्या जगद्व्यापी जैनधर्माची ही दुःस्थिती !! काळाचा महिमा और आहे !! या ग्रथाच्या प्रशस्तींत आशाधर पडित लिहितात " सोऽहमाशाधर कण्ठमल कर्तुं सधर्मणाम् । पञ्चिकालकृत ग्रथमिमं पुण्यमरीचम् ॥७॥ राक्षिष्यताम्पुराणानि नित्यस्वाध्याय सिद्धये ॥ इति पण्डितजाजाका द्विजाति प्रेरिकाग्रमे ॥ ९ ॥ धार्मिकाचे कठ भूषित करण्यासाठींच हा ग्रथ मी लिहिला नित्यस्वाध्यायासाठीं त्रेसष्ट शलाका पुरुषाचा पुराणेंसक्षिप्त करून द्या अशी आकांक्षा पडितानी केलेली प्रेरणाच या ग्रथाला कारण आहे या खुलाशावरून उच्च वाङ्मयाच्या दृष्टीन या ग्रथाकडे न पाहता धर्मशील जैनाच्या रोजच्या गरजेच्या पूर्तीचेन दृष्टीनें पाहिलें पाहिजे चोवीस तीर्थंकर, बाराचक्रवर्ती, नऊ बलदेव, नऊ बळदेव व नऊ प्रतिवासुदेव मिळून त्रेसष्ट महापुरुषाना जैनलोक

फार पूज्य मानतात त्यांच्या नामावली व चरित्रें सर्व भाषांतून अनेक विद्वानांनी लिहिलेलीं आहेत महापुराण व उत्तरपुराण हे ग्रंथ त्यामध्यें प्रमुख आहेत. हे ग्रंथ फार प्रचंड आहेत रोज पारायण करण्यास सुटसुटीत ग्रंथ हवा याद्दष्टीनें आशाधर पंडितानी सुमारें पाचशे श्लोकाचे (४८० श्लोक) त्रिषष्टि स्मृतिशास्त्र लिहून चांगली सोय करून दिली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं रामायण महाभारतादि ग्रंथाचेहि असे संक्षिप्तीकरण झालेलें आहेच त्या ग्रंथापेक्षा हा ग्रंथ अधिक दुर्बोध आहे हे खरें पण मूळविषयच क्लिष्ट असल्यामुळें आशाधराचा निरुपाय झाला आहे त्यामुळें महानुभावाच्या सांकेतिक लिपींत लिहिलेल्या ग्रंथाप्रमाणेंच या ग्रंथाची गत झाली आहे

एकदरीत या ग्रंथाच्या प्रसिद्धीमुळें आशाधर पंडिताचा एक ग्रंथ जनतेपुढें येत आहे माणिकचंद्रग्रंथमालेला मराठी ग्रंथ प्रसिद्धाचें श्रेय मिळत आहे व धर्मशील जैनाना स्वाध्याय करण्यास एक ग्रंथ मिळत आहे इतके फायदे होत आहेत. हें सर्व साधल्याबद्दल, ग्रंथाचा अनुवाद करताना मिळालेल्या माझ्या परममित्राच्या मदतीबद्दल व मालेतून ग्रंथ प्रकाशित करण्यास दिलेल्या संम तिबद्दल त्या मालेच्या चालकाचा व इतर सर्व समाजाचा मी ऋणी आहे ग्रंथाची १६५ पानें श्री प वर्धमानशास्त्री सोलापूर यानी आपल्या कल्याणप्रेसमध्यें छापून वेळेवर दिली याबद्दल त्याचा व श्री हनुमान प्रेसचे मालक व चालक श्री कोकाटे यांचा त्यांनी पुस्तकांतील निवेदन व इतर मजकूर छापून दिल्याबद्दल आभारी आहे अशीच उत्तरोत्तर मजकडून सेवा घडो ही जिनेश चरणी मागणी आहे प. आशाधरानीं हा ग्रंथ वाचणारावर सम्यग्दृष्टी प्रसन्न होवो अशी शुभेच्छा प्रगट केलीच आहे त्यांच्याच खालील श्लोकानें मी ही प्रस्तावना पुरी करतो

शान्तिः शंतनुतां समस्तजगतां सम्पद्यतां धार्मिके ।
श्रेय श्रीः परिवर्धतां नयधुराधुर्यो धरित्रीपतिः ।
सद्विद्यारसमुद्गिरन्तु कवयो नामाप्यघस्यास्तु मा ।
प्रार्थ्यं वा कियदेक एव शिवकृद्धर्मो जयत्वर्हताम् ॥

न्यायमार्गानें प्रतिपाळ करणारा राजा धार्मिकलोकांच्या सहाय्यानें सर्व विश्वांत शांति, संपत्ति व कल्याण वाढवो विद्वज्जन सद्विद्येचाच प्रचार करोत व पापकर्मे नांवालाहि नसोत कल्याणकारी अर्हद्धर्माचा विजय असो या शिवाय दुसऱ्या कशाची इच्छा करावी ? इतिशम्

आषाढ पौर्णिमा वीर स २४६२ | आपला सर्वांचा नम्र
शनिवार, धाराशिव | मोतीलाल हिराचंद गांधी (वकील



नमः सिद्धेभ्यः ।

आचार्यकल्पाशाधरविरचितम्

त्रिषष्टिस्मृतिशास्त्रम् ।

वीरं नत्वेन्द्रभूतिञ्च त्रिषष्टिश्रेष्ठपुंश्रितम्[1] ।
इतिवृत्तमहं[2] वक्ष्ये स्मृत्यै समासेन[3] यथागमम् ॥ १ ॥

तीर्थंकर महावीर, गणधर इंद्रभूति याना नमन करून सर्वश्रेष्ठ अशा त्रेसष्ट (चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ बलदेव, नऊ वासुदेव व नऊ प्रतिवासुदेव) शलाका-पुरुषांचें मी संक्षिप्त चरित्र आगमाला धरून थोडक्यात सांगतो.

---

१ श्रेष्ठपुमांस शलाकापुरुषा २ महापुराण ३ विस्तारस्त्वार्षपुराणादौ द्रष्टव्य ।

मंत्री मतिवरः श्रेष्ठी धनमित्रः पुरोहित ।
आनन्दोऽकम्पनः सेनेड् वज्रांस्य श्रीमती प्रिया ॥६॥

पूर्वविदेह क्षेत्रांतील पुष्कलावती देशांतील उत्पलखेट नगरीचा राजा वज्रबाहु त्याची भार्या वसुंधरा याचे पोटीं महाबलाचा जीव ललितांगदेव स्वर्गीचें सुख भोगून वज्रजंघ नामें जन्मला. त्याचे मामा चक्रवर्ती वज्रदंत. याची पुत्री श्रीमती त्याची प्रिया झाली. ही श्रीमती ललितांग देवाची सहचरी स्वयंप्रभा पूर्वभवांत धातकीद्वीपांत पूर्वमंदरपर्वताच्या पश्चिमेकडील विदेहक्षेत्रांत गंधिल-देशांतील पलालपर्वत नामक गांवांत देविल पाटलाची मुलगी होती. त्या भवांत तिनें समाधिगुप्त मुनि ध्यानस्थ असतां त्याचें अंगावर मेलेलें कुत्रें टाकून त्याचा अपमान केला. पुढें ती पाटलीग्रामांत नागदत्त वाण्याची कन्या होऊन जन्मली. तेथें पिहितास्रव मुनि जवळ व्रतें घेऊन तिनें तीं पाळल्यामुळें ऐशान स्वर्गांत स्वयंप्रभा देवी झाली. प्रीतिवर्धन राजाच्या मुनिदानास अनुमोदन दिल्यामुळें झालेल्या पुण्योपार्जनानें पुरोहित, सेनापति व मंत्री यांचा आणि व्याघ्रभवांतील तपामुळें मतिवर मंत्र्याचा समागम झाला. अर्थात् ते व्याघ्रादिक वज्रजंघाचे पुरोहित, मंत्री, सेनापति व श्रेष्ठी झाले मंत्र्याचें नांव मतिवर, श्रेष्ठीचें नांव धनमित्र, पुरोहिताचें नांव आनंद व सेनापतीचें नांव अकंपन होतें. वज्रजंघरानानें दमवर व सागरसेन मुनींना आहार दान दिल्यावर आपल्या चार मित्रांची

१ वज्रजंघस्य ।

भगवानली विचारली. तिचा मथितार्थ असा—मतिवर मंत्री पूर्वभवात प्रभाकरी नगरीचा अतिगृद्ध राजा होता. तो फार विषयी असल्यामुळे पंकप्रभा नरकात पडला. नरकातून तो वाघाच्या जन्मास गेला. एकदा प्रभाकरी नगरीचा त्यावेळचा राजा प्रीतिवर्धन जंगलात गेला असता पिहितास्रव मुनि त्याला भेटले. माध्यान्हकाल असल्यामुळे पुरोहिताने त्यांना आहारदान करण्याचा राजास सल्ला दिला. राजाने तो केल्यामुळे रत्नवृष्टि झाली. मुनि ह्मणाले कीं जवळच एक वाघ तपश्चर्या करीत आहे व तो पुढे भरत चक्रवर्ती होणार आहे. राजा मुनीसह तो चमत्कार पहावयास गेला. अठरा दिवस अनशन करून सन्यासविधीने तो वाघ मेला व देवलोकात गेला. तो प्रकार पाहून प्रीतिवर्धन राजाचे मंत्री, सेनापति व पुरोहित यांना उपरति झाली व मरणानंतर ते भोगभूमीत जन्मले. तेथून ऐशान स्वर्गांत गेले. स्वर्गातून ते चावे वज्रजंघ राजाचे मित्र होऊन जन्मले, या सर्वांच्या समागमें राजा सुखी झाला.

तौ दम्पती मृतौ धूमादपिदानाददक्कुरौ ।
जातौ व्याघ्रकोडकीशननकुलाश्च तदिष्टितः ॥ ७ ॥
द्वितीयेकोपादिवद्धायुष्का व्याघ्रादयस्तदा
वनादेत्य नृपावासाद्वहिस्तस्थुर्मुनीक्षिणः ॥ ८ ॥

१ उत्तमभोगभूमौ उत्पन्नौ २ सूकर. ३ वानर ४ तयोर्मुनियुगलयोरिष्टिर्दानापूजा तत. अथवा दानानुमोदनात. ५अप्रत्याख्यान ६ दानकाले.

नीत्वा शतमतिं चक्री तुग्भूयोपर्यमोद्यतम्
तपो नीत्वा ब्रह्मशक्रीकृतमेत्याद्दतानतैम् ॥ ११ ॥

श्रीधर देवाने शतमतीला सम्यग्दर्शनाचा उपदेश केला तो पटल्यामुळे तो नरकातून निघून पुष्करद्वीपाच्या पूर्वार्धांतील पूर्व-विदेहक्षेत्रांतील मगलावती देशाच्या मध्यभागातील रत्नसचय नगरीचा जो महीधर चक्रवर्ती त्याच्या सुंदरीदेवीच्या पोटीं जयसेन नामें करून जन्मला. पुढे यमधर मुनीजवळ दीक्षा घेऊन समाधीनें मेल्यानंतर तो ब्रह्मस्वर्गांत इंद्र झाला.

यौ महामतिसम्भिन्नमती मिथ्यात्वदाढ्र्यतः ।
तौ निगोदास्पदं यातौ तेनोक्तेः सोऽन्वैरुन्मत् ॥१२॥

महामति व संभिन्नमति नामक दुसरे दोन मंत्री निगोदात म्हणजे नरकात खितपत पडले आहेत असें प्रीतिकरमुनिकडून ऐकून श्रीधरदेव कळवळला.

महावत्से सुसीमश स भूत्वा सुविधिः सुतं ।
केशवं श्रीमतीजीवं स्नेहादार्यन्नतं गृहे ॥ १३ ॥

जम्बूद्वीपातील विदेहक्षेत्रात महावत्स देशातील सुसीमा नगरीचा राजा सुदृष्टि व राणी सुंदरनंदा याच्या पोटीं श्रीधरदेव स्वर्गांतून येऊन सुविधि नावाने जन्मला. अभयघोष चक्रवर्तीची

१ पुष्करार्द्ध पूर्वमंदरे मंगलावत्या रत्नसंचये महीधराख्यचक्रिणः पुत्रो जयसेनाख्यो भूत्वा २ विवाहकरणाद्यतं ३ स श्रीधरः अभ्यनदत. ४ तेन गुरूणा ५ स महाबलचर, श्रीधर हा कष्ट कय तादृग् खाचौ उद्धेरयीमति अतरार्द्रतया प्रत्यपद्यत ६ देशसंयमसर्वस्वं भक्त्वा आराध्य.

मुलगी मनोरमा त्याला देण्यात आली. तिच्यापासून त्याला केशव नामक पुत्र झाला (हा श्रीमतीचाच जीव होता कारण ती स्वर्गांत देव झाली होती व तीच केशव झाला.)

भुक्त्वा जातोऽच्युतेन्द्रोऽस्य तुक् प्रतीन्द्रो महान् ततः ।
व्याघ्राद्यार्यामरा राजपुत्राः सामानिकाश्च ते ॥१४॥

या बापलेकांनी श्रावकव्रत पाळून देहत्यागानंतर ते अच्युतेंद्र व प्रतींद्र झाले व्याघ्रादिकांचे जीव वज्रजंघाबरोबर उत्तरकुरूत जाऊन मेले तेथून प्रीतिकर चारण मुनींच्या उपदेशामुळें ऐशान कल्पात देव झाले तेथून वानराचा जीव चित्रांगद, वराहाचा जीव राजा नंदिषेण यांची राणी अनंतमतीच्या पोटीं वरसेन, व्याघ्राचा जीव विभीषणराजाच्या प्रियदत्ता देवीच्या पोटीं वरदत्त व नकुलाचा जीव प्रशांतमदन नाम जन्मले या सर्वांनी अभयघोषचक्रवर्ती बरोबर दीक्षा घेतल्यावर ते मरून सामानिक देव झाले

अथेन्द्रः पुष्कलावत्यां वज्रनाभिः स चक्रभृत् ।
सामानिकास्तदनुजा प्रतीन्द्रस्तद्गृहे वणिक् ॥ १५॥

नंतर तो अच्युतेंद्र पुष्कलावती देशांतील पुंडरीकिणी नगरीचा राजा वज्रसेन व राणी श्रीकांता यांचे पोटीं वज्रनाभिनामे करून

१ पंचाप्येते केशवेन सह नैर्ग्रन्थ्यदीक्षां प्रतिपन्नाः । केशवः प्रतीन्द्रोऽभवत् । चत्वारो राजपुत्राः सामानिका अभवन् । २ सुविधिचर ३ तस्य चक्रिणो विजयवैजयंतजयंतापराजित संज्ञा ४भाण्डागारिक धनदेवाख्याः

राजातिगृध्रो धार्मोऽद्रौ व्याघ्रो देवो दिवाकरः[७]।
मन्त्री मतिवरोऽधोऽहमिन्द्रो योऽभूत्सुबाहुकः ॥२४॥
विराट् सर्वार्थसिद्धश्च स जयाङ्गरत पुरोः ।
आद्यः पुत्रोऽथ चक्रभृत्षोडशो हि मनुर्महान् ॥२५॥

अतिगृध्रराजा, नारकी जीव, वाघ, देव, मतिवरमन्त्री, अह-मिन्द्र, सुबाहु, वज्रसेन तीर्थकराचा पुत्र नरदत्तराज, सर्वार्थसिद्धि स्वर्गातील देव आदि भव घेऊन भरत झालेला प्रथम तीर्थकराचा प्रथम पुत्र चक्रवर्ती, सोळावा मनु (देश विरति व लोककल्याणकारी उपदेशक या अर्थाने) जयशाली होवो.

यो मन्त्री वत्सकावत्यां प्रीतिवर्द्धनभूपते ।
प्रभाकरीपुरीहृदक्कुरुर्वा कनकप्रभः ॥ २६ ॥
आनन्दोऽधोऽहमिन्द्रोऽभून्महाबाहुरनुत्तरे ।
सुरर्थान्त्ये स पुरुतुकामो बाहुबलीज्र्यताम् ॥ २७ ॥

वत्सकान्ती देशातील प्रभाकरी नगरीच्या प्रीतिवर्धन राजाचा मंत्री व उत्तर कुरुभोगभूमीतील आर्य कनकप्रभ नामक वैमानिक

१ धर्माया भवो धार्मा नारकः २ विशिष्ट राजा वज्रसेन तीर्थकरपुत्रः ३ नगर्यां ४ भूमौ ना पुमान् ५ काञ्चनविमानेश ६ सर्वार्थ-सिद्धौ. ७ पूजता शिवार्थिभि

लोलुप नावाचा जो मिठाईवाला नकुल झाला होता तो पुढें उत्तरकुरुभोगभूमींत जाऊन तेथून प्रभाकर विमानांत देव झाला. नंतर प्रशांतमदन नांवाचा राजपुत्र झाला पुढे अच्युतेंद्राचा सामानिक देव होऊन तो जीव वज्रसेन राजाचा अपराजित नामक पुत्र झाला. नंतर सर्वार्थसिद्धि देवलोकांतून तो आतां सुवीर नामक तीर्थंकरपुत्र झाला

संन्यासमृत्युदानानुमोदसद्वृत्तपोऽर्जितैः ।
पुण्यैस्तेऽभ्युदयान्भुक्त्वा सिद्धाःसिद्धिं दिशन्तु नः ४०

संन्यासमरण, दानानुमोदन, वगैरे सारख्या पुण्यकर्मांनीं मिळविलेले अभ्युदय भोगून जे सिद्ध झाले ते आम्हालाहि सिद्धि देवोत.

इत्याशाधरदृब्धे त्रिषष्टिस्मृतिनाम्नि महापुराणान्तस्तत्त्वसङ्ग्रहे श्रीवृषभतीर्थङ्करभरतेश्वरादिनिवृत्तिपुराणं प्रथमम् ॥१॥

वत्सादेशे सुसीमाप्तः स्वामी विमलवाहनः ।
चिराद्राज्याद्विरज्यात्तव्रतो बद्ध्वान्त्यनाम शं॑म् ॥ १ ॥

वत्सदेशांत सुसीमा नगरीचा पति विमलवाहन नामक राजा होता त्यानें बराच काळपर्यंत राज्यसुख भोगून त्याचा त्याग केला व व्रतधारी होऊन तीर्थंकर कर्म बांधलें

१ द्वीपेऽस्मिन्निति वर्तते, जंबूद्वीपपूर्वविदेहस्थे २ सुसीमा आप्ता प्राप्ता येन स ३ गृहीतसंयम ४ तीर्थकरत्वनाम सर्वेषां तीर्थकृतां तद्बंधकाल प्रायेणैका दशांगश्रुतज्ञान बोद्धव्य

पूर्वभवात हरिवाहन नामक राजपुत्र असलेला शूकर पुढें उत्तरकुरु नामक भोगभूमीत आर्य बनला. नद्याख्य विमानात माणिकुंडली देव होऊन वरसेन राजा झाला. पुढें तो जीव सामानिक देव होऊन नतर वज्रसेन राजाचा पुत्र वैजयत नामें झाला. तेथून सर्वार्थसिद्धींत अहमिंद्र होऊन तो आता अच्युत नामाने तीर्थंकरपुत्र झाला आहे.

यो वणिङ्नागदत्ताख्यः कपिः पूर्ववदार्यकः
मनोहरामरो राजपुत्रश्चित्राङ्गदश्रुति ॥ ३६ ॥
जज्ञे सामानिकसुरो जयंतस्तीर्थतुक् पुनः ।
पर्श्चमेऽनुत्तरेऽमर्त्यः स वीर पुरनन्दनः ॥ ३७ ॥

नागदत्त नावाचा जो वणिक् वानर झाला होता तो देवगतींत मनोहर नामकदेव होऊन पुढे चित्रांगद नामक राजपुत्र झाला. तो जीव सामानिक देव होऊन व वज्रसेन राजाचा जयत नामक पुत्र झाला. नतर पाचव्या स्वर्गात अनुत्तर विमानातील देव होऊन तो आता आदितीर्थंकरपुत्र वीर नामे कुमार झाला आहे.

आर्यूपिको लोलुपाख्यो नकुलो दिव्यमानुपं ।
मनोरथःपार्थिवतुक् प्रशान्तमदनाभिधः ॥ ३८ ॥
योऽन्युतेन्द्रसमो देवो जिनपुत्रोऽपराजितः ।
स्वरेकंचरमश्चाभूत्सुवीरीरस्य स पौरवः ॥ ३९ ॥

---

१ नद्यावर्तविमानेश २ 'नाम राजपुं' ३ वज्रसेनतीर्थंकरस्य ४ सर्वार्थसिद्धौ ५ कादविक ६ उत्तरकुरुनर ७ प्रभाकरविमानश ८ चित्रमालिनीप्रमजनयो क्षत्रियभार्यापत्यो । ९ सामानिक १० वज्रसेनस्य ११ सर्वार्थसिद्धि

लोलुप नावाचा जो मिठाईवाला नकुल झाला होता तो पुढें उत्तरकुरुभोगभूमींत जाऊन तेथून प्रभाकर विमानांत देव झाला नंतर प्रशांतमदन नांवाचा राजपुत्र झाला पुढ अच्युतेंद्राचा सामानिक देव होऊन तो जीव वज्रसेन राजाचा अपराजित नामक पुत्र झाला नंतर सर्वार्थसिद्धि देवलोकांतून तो आतां सुवीर नामक तीर्थंकरपुत्र झाला

सन्यासमृत्युदानानुमादसद्वृतपोऽर्जितैः ।
पुण्यैस्तेऽभ्युदयान्भुक्त्वा सिद्धा सिद्धिं दिशन्तु न ४०

सन्यासमरण, दानानुमोदन वगैरे सारख्या पुण्यकर्मांनीं मिळालेले अभ्युदय भोगून जे सिद्ध झाले ते आम्हालाहि सिद्धि देवोत

इत्याशाधरदृब्धे त्रिषष्टिस्मृतिनाम्नि महापुराणान्तरतत्त्वसङ्ग्रहे श्रीवृषभतीर्थङ्कर भरतेश्वरादिनिवृत्तिपुराण प्रथमम् ॥१॥

वत्सेदेशे सुसीमाप्त स्वामी विमलवाहन ।
चिराद्राज्याद्विरज्यात्तवैतो बद्ध्वान्त्यनाम गेम् ॥ १ ॥

वत्सदेशांत सुसीमा नगरीचा पति विमलवाहन नामक राजा हा त्यानें बराच काळपर्यंत राज्यसुख भोगून त्याचा त्याग केला व व्रतधारी होऊन तीर्थंकर कर्म बांधलें

१ द्वीपे ऽस्मिन्नित वर्तते जम्बूद्वीपपूर्वविदेहस्य २ सुसीमा आख्या प्राप्ता यन स ३ गृहीतसंयम ४ तीर्थकरत्वनाम सर्वेषां तीर्थकृतां तद्बन्धकाल प्रायेणैवां दर्शनाविशुद्धचादि बाह्य

निर्विश्यं विजये भूत्वा साकेते जितशात्रवः ।
दीक्ष्योल्कां त्यक्तराज्योऽव्यात्कृततीर्थोऽत्र नोऽजितः॥

तेथून तो निज्यनामक प्रथम अनुत्तर विमानात देव झाला पुढें अयोध्यानगरींत जितशत्रुराजा व विजयसेना देवी यांच्या पोटीं तो जीव अजितनाथ तीर्थंकर म्हणून जन्मला उल्कापात पाहून त्यांना उपरति झाली व अजितसेन नामक पुत्राचे हातीं राज्यकारभार सोंपवून त्यांनीं दीक्षा घेतली व धर्मप्रसार करून मोक्षास गेले

यो वत्सकावतीपृथ्वीपुरेशो जयसेनक ।
रतिषेणसुतेऽतीतं धृतिषेणेऽर्पितक्षिति ॥ ३ ॥

जंबूद्वीपात पूर्व विदेहक्षेत्रात सीतानदीचें तीरीं वत्सकावती नांवाच्या देशातील पृथ्वीपुर नगरीचा राजा जयसेन व राणी जयसेना त्यानां रतिषेण व धृतिषेण नामक दोन पुत्र होते रतिषेण अकस्मात् वारल्यामुळें विन्न होऊन जयसेन राजानें धृतिषेणाला गादीवर बसविलें.

महारुतेन स्यालेन सह कृत्वा तपोऽच्युते ।
देवो महाबलः सोऽभूदितरो मणिकेतुक ॥ ४ ॥

आणि मेहुणा महारुत यांच्यासह यशोधर मुनीजवळ दीक्षा

१ मुक्त्वा २ प्रथमानुत्तरविमाने ३ जितशत्रोरपत्य विजयसेनादे व्यामुत्पन्न ४ स्वयं उपन्नबोधि सन् त्यक्त अजितसेनपुत्राय दत्त राज्य येन स । गृहीतसंयम कर्मप्रमुत्पादाति तीर्थंकरत्व तपोपपेतलम्यन ५ यशोधरगुरूपदिष्ट ६ जयसेन ७ महारुतचर

घेऊन जयसेन राजानें तपश्चर्या केल्यावर तो सोळाव्या स्वर्गांत महाबल नामक देव झाला व महारुत अच्युत स्वर्गांत मणिकेतु नामक देव झाला.

प्राक्च्युतं बोधयत्वन्य इति ताभ्यां कृता स्थितिः ।
च्युत्वा महाबलश्चक्री सगरोऽभूज्जिनान्वये ॥ ५ ॥

त्या दोघा देवामध्यें असा करार झाला कीं, जो देवगतींतून प्रथम च्युत होईल त्यास राहिलेल्यानें समजवावें. महाबलदेव बावीस सागरकाल पर्यंत स्वर्गसुख भोगून धातकी देशांतील अयोध्यानगरींत इक्ष्वाकुवंशामध्यें समुद्रविजयराजा व सुबालाराणी यांच्या पोटीं सगर नामें करून चक्रवर्ती जन्मला.

चतुर्मुखान्ते सख्योक्तो यतीभूय जिनालये ।
न बुद्धो बोधितो विप्रीभूय मायास्ततुकशुचिः ॥६॥

सिद्धवनांत चतुर्मुख मुनींना केवलज्ञान प्राप्त झाल्यावर कल्याणमहोत्सव करण्यासाठीं इंद्रादि देव आले असतां मणिकेतुदेवहि तेथें

१ इत स्वर्गात्प्रथम कर्मभूमिभवतीर्णं २ दृढरथ स्वर्गास्थितन ३ जयसेनचर ४ चतुर्मुखमुनेः समीप केवलज्ञानकल्याणे सनु आगतेनाद्वे सहागता मणि केतुना उक्ता प्रागुक्तस्थिति ५ तत्वाविते जिनालये नैव पुनुदस्तः, पुत्रव्यामोहात् बुद्ध । ६ पितरसभोजनप्रतिशया उपरत च ग्हातविरजत्र प्रेयाद्भरतेशचैत्यालयरक्षार्थं कैलास परितो दण्डरत्नेन गंगा खातिकाकृतवतां मन्त्रिसम्मतेन मणिकेतुना भूपरगीभूय/मायाभस्मीकृतानां तुचा ष्टिसहस्र पुत्राणां शुचि शोक सति तच्छोकाविष्ट सचिवेन । तत्रा स्वयं ब्राह्मणवेषं धृत्वा सगर प्रतिबोधित ।

आला होता व त्यानें कराराप्रमाणें महाबलाच्या जीवाला ह्मणजे सगर चक्रवर्तीला आठवण दिली. पण सगर सावध झाला नाहीं. तेव्हा सुंदर तरुण यतीचें रूप घेऊन मणिकेतुदेव पुन्हा आला. त्याला सगरानें विचारले असता देहाचा भरवसा नाहीं म्हणून इतक्या त्वकर दीक्षा घेतली असें मणिकेतूनें उत्तर दिले तरीहि मायेनें पछाडलेला सगर उमगला नाहीं. पुढें कैलासपर्वतावर बांधलेल्या जिनालया भोंवतीं गंगेचा खंदक खणण्यास त्यानें आपले पुत्र पाठविले असता मणिकेतूनें विषसर्प होऊन त्यांना दंश करून मूर्च्छित केलें. तेव्हां सगर चक्रवर्ती शोकाकुल होऊन विप्रवेषधारी मणिकेतु देवाच्या उपदेशानें वैराग्य धारण करता झाला.

भगीरथे श्रियं न्यस्य स सिद्धस्तपसा सतुंक्। वरदत्तसुत पुत्रराज्य सोऽप्यर्चित मुरैः ॥ ७ ॥

नतर मणिकेतूनें देवमाया काढून घेतल्यावर सगरपुत्र शुद्धीवर आले. भगीरथाला गादीवर बसवून इतर पुत्रासह सगरानें दीक्षा घेतली, आणि तपश्चर्या करून सिद्धपदाला गेला. हें वृत्त ऐकून भगीरथानें आपला पुत्र वरदत्त, त्याच्या पुत्रास गादीवर बसविलें व

१ पुत्रै सह २ भगीरथस्य पुत्रा वरदत्तो वरदत्तस्य कोऽपि पुत्रस्तस्मै भगीरथेन राज्य दत्त । पुत्र राज्य यस्य यस्माद्वा स । भगीरथ । ३ भगीरथः सम्मेदे सगरस्य मुक्तिं श्रुत्वा प्रव्रज्य गगातटे कायोत्सर्गेण स्थित शक्रेण क्षीरोदजलक्षालिताङ्घ्रिः चिर तपः कृत्वा सिद्धः । तत्क्रमाबुजप्रवाहमगमात्तदा प्रभृति गगापि लोके तीर्थमभूत् । एतदर्चितः सुरैरित्यनो लभ्यते ।

आपणहि दीक्षा घेऊन गगातटाकीं कायोत्सर्गपूर्वक तप आचरिलें तेव्हां इद्रानें त्याचें पूजन केल्यामुळें गगोदकहि तीर्थ झालें भगीरथहि सिद्धपदवीस पोहोंचला.

इति श्री अजितनाथसगरेतिवृत्तोत्तर द्वितीयम् ॥२॥

कच्छोक्षेमपुरे योऽभूद्राजा विमलवाहनः ।
स्वयम्प्रभजिनान्तेऽसौ प्रव्रज्याचान्त्यनामकः॥ १ ॥

जबूद्वीपाच्या पूर्वेकिनाऱ्यानर विदेहक्षेत्रात सीतानदीच्या तटाकीं कच्छ देशातील क्षेमपुरात विमलवाहन राजा राज्य करीत होता त्यानें विमलकीर्तीचे हातीं राज्यकारभार देऊन स्वयप्रभ जिनेंद्राजवळ दीक्षा घेतली बरीच तपश्चर्या करून यानें तीर्थकरकर्म बाधलें.

सुदर्शन विमानेऽभूद्देवो ग्रैवेयकादिमे ।
तत स्रावस्तिनगरे दृढराजाद्गजाऽजनि ॥ २॥

समाधिमरणपूर्वक शरीरत्याग केल्यानंतर तो पहिल्या ग्रैवेयक स्वर्गात सुदर्शन विमानात अहमिंद्र देव झाला तेथून स्रावस्ती नगरीचा राजा दृढराज व राणी सुषेणेचे पोटीं तो जन्मला

शम्भवाख्यः स दृष्ट्वाभ्रविभ्रंशत्यक्तराज्यकः ।
प्राप्यार्हन्त्य धर्मतीर्थं कृत्वा मुक्तोऽस्तु नःश्रिये ॥३॥

१ जम्बूद्वीपस्य प्राग्विदेहस्या देश २ सुषेणागर्भे ३ विनाश ४ पूर्वेसमनन्येति सामर्थ्याल्लभ्यते ।

याचें नाव सभुवनाथ, एकदा ढग विरुयाला जात असलेले पाहून याना वराग्य उत्पन्न झालें व यानीं पुत्राला गादीवर बसवून दीक्षा घेतली तपश्चर्या करून धर्मतीर्थ प्रवर्तित केलं व ते मोक्षाला गेले ते आमचें कल्याण करोत

इति शम्भवजिनस्य तृतीयम् ॥ ३ ॥

या मङ्गलावतीरत्नसचयशा महाबल ।
निर्विण्ण संयम माप्य गराविमलवाहनात् ॥ १ ॥

जम्बूद्वीपात पूर्वविदेह क्षेत्रात सीतानदीच्या दक्षिणतीरावर मग लावतीनामक देशात रत्नसचयनामक नगरी होती तिचा राजा महाबल भोगापासून निरक्त होऊन यानें विमलवाहन मुनीजवळ दीक्षा घेतली

एकादशाङ्गभृद्बद्धतीर्थकृत्त्वोऽहमिन्द्रताम् ।
विजये माप्य साकेत स्वयवरसुताऽभवत ॥ २ ॥

अकरा अगाचा तो ज्ञानी झाला व सोळा भावना भावून यानें तीर्थंकर नाम कर्म बांधले सन्यासपूर्वक देहत्याग केल्यावर तो विजयनामक पहिल्या अनुत्तर विमानात अहमिंद्र झाला तेथून तो *अयोध्यानगरीचा राजा स्वयवर व राणी सिद्धार्था याच्या* पोटीं जन्मला

गन्धर्वनगरभ्रशाद्विरज्यात्मजदत्तभू ।
तीर्थं भवत्यं मुक्तश्च स नन्यादभिनन्दन ॥ ३ ॥

१ प्राग्विदेहस्था देश २ सिद्धार्यागर्भे ।

पुष्कळ वर्षे राज्यसुख भोगल्यावर एकदा त्यानें ढगाची गधर्व नगरी विलयाला गेलेली पाहून वैराग्य धारण केलें व मुलाला गादी वर बसवून दीक्षा घेतली. तपश्चर्या करून धर्मतीर्थाचें प्रवर्तन केलें व मोक्षाला गेला. तो अभिनंदन सदा आनंदकारी हो वो.

इति श्री अभिनन्दनार्हतश्चतुर्थम् ॥ ४ ॥

घाता गाग्धातकीखण्डमेरोः प्राक्ङ्पुष्कलावतीं ।
श्रितायां पुण्डरीकिण्यां रतिषेणो विरज्य य ॥१॥

अखड धातकी खडात, पूर्वमदराचलाच्या पूर्वेस पुष्कलावती देशातील पुडरीकिणी नगरीत रतिषेण नामक राजा होता. त्यानें पुष्कळ सुखें भोगल्यावर त्याला विरक्ति उत्पन्न झाली व अतिरथ नामक पुत्राला गादीवर बसवून त्यानें अर्हन्नंदन मुनीजवळ दीक्षा घेतली.

निजार्हन्नन्दनाभ्यर्णे विदितैकादशाङ्गकः ।
बद्धतीर्थकरत्वोऽसावैजयन्तेऽहमिन्द्रताम् ॥ २ ॥

एकादशांगाचें अध्ययन करून त्यानें तीर्थंकरकर्म बांधलें व सन्यासपूर्वक देहत्याग केल्यावर तो वैजयंत विमानात अहमिंद्र देव झाला.

पुत्रो मेघरथायोध्यापतेर्भूत्वात्र राज्यतः ।
स्वयं विरज्य चार्हन्त्यं प्राप्तस्तं सुमतिं स्तुमः ॥ ३ ॥

तेथून 'अयोध्यानगरीचा राजा मेघरथ व राणी मगला यांच्या पोटीं'

१ पूर्व. २ पूर्वविदेह. ३ धाता. ४ द्विर्वानुत्तरे. ५ 'मगलागर्भजः.

सुमतिनाथ नामें करून जन्मला. पुष्कळ वर्षें राज्य केल्यावर त्यांना वैराग्य प्राप्त झालें व दीक्षा घेऊन त्यांनी धर्मतीर्थाचें प्रवर्तन केलें त्या सुमतिनाथाची आम्ही स्तुति करतो.

इति श्रीसुमतिजिनस्य पञ्चमम् ॥ ५ ॥

पूर्वद्वीपे सुसीमेशो वत्सायां योऽपराजितः ।
प्रव्रज्यैकादशाङ्गानि ज्ञात्वार्हत्पिहितास्रवात् ॥ १ ॥

धानकीखड नामक द्वीपात पूर्वविदेहक्षेत्रात वत्सदेशांतील सुसीमा नगराचा राजा अपराजित नामें करून होता. त्यानें पिहितास्रव मुनीजवळ दीक्षा घेऊन एकादशांगाचें अध्ययन केलें.

बद्ध्वान्त्यनामा देवोऽभूत्प्रीतिङ्करविमानजः ।
ऊर्ध्वग्रैवेयके भर्तुः कौशाम्ब्या धरणस्य तुक् ॥ २ ॥

तीर्थकरकर्म बांधून तो ऊर्ध्वग्रैवेयक स्वर्गांत प्रीतिंकर नामक विमानात अहमिंद्र देव झाला. तेथून कौशांबीनगरीचा राजा धरण व राणी सुसामा यांचे पोटीं तो पद्मप्रभ नामें करून जन्मला.

भूत्वात्र वारिबन्धस्थं गजं श्रुत्वात्तसंयम ॥
तीर्थं कृत्वा च निर्वाण पातु पद्मप्रभ स न ॥ ३ ॥

पुष्कळ वर्षे राज्यसंपन्न भोगल्यानंतर बांधलेल्या हत्तीस पाहून त्यांना एकाएकी वैराग्य प्राप्त झालें. दीक्षा घेऊन त्यांनीं धर्मतीर्थ

---

१ प्राग्धातकीखंडे. २ पुत्र सुसीमानामिका ।

सुरू करून निर्वाणपद मिळविले ते पद्मप्रभ तीर्थंकर आमचें रक्षण करोत

इति श्रीपद्मप्रभस्वामिन षष्ठम्॥ ६ ॥

धातकीखण्डपूर्वार्द्धे सुकच्छाक्षेमपू पति ॥
नन्दिषेणोऽस्तसङ्गोऽर्हन्नन्दनाद्धद्धतीर्थकृत् ॥ १ ॥

धातकी खंडाच्या पूर्वविदेहक्षेत्रात सुकच्छादेशातील क्षेम पुरींत नंदिषेण नावाचा राजा होता बरींच वर्षे राज्य केल्यावर त्याला वैराग्य प्राप्त झालें व त्यानें धनपति नामक मुलाला गादी वर बसवून अर्हन्नंदन नामक मुनीजवळ दीक्षा घेतली एकाद शागाचें अध्ययन करून व षोडश भावना भावून त्यान तीर्थंकर नामकर्म बांधलें.

प्राक्श्रुतेश सुभद्राख्ये यो ग्रैवेयकमध्यमे ।
मध्यमेऽभूद्विमानेऽथ सुमतिष्ठनृपात्मज ॥ २ ॥

पुढें तो जीव मध्यम ग्रैवेयकात सुभद्र नामक मध्यम विमानात अहमिंद्र झाला नतर काशीक्षेत्रात सुप्रतिष्ठ राजा व पृथ्वीषेणा राणीचे पोटीं सुपार्श्वनाथ तीर्थंकर नामें करून तो जीव जन्मला

काश्यपामृतुपरावर्तान्निर्विद्यासाद्य केवलम् ।
प्रवर्त्य तीर्थं मुक्तोऽभूत्स सुपार्श्वोऽस्तु न श्रियें ॥ ३ ॥

ऋतुपरावर्तनाचा विचार केल्यामुळें त्याना वैराग्य प्राप्त झालें

२ एकादशागवित् ३ पृथ्वीषेणागर्भज ।

व दीक्षा घेऊन तीर्थप्रवर्तन केल्यावर जे मोक्षाला गेले ते सुपार्श्वनाथ तीर्थंकर आमचें कल्याण करोत

इति श्रीसुपार्श्वजिनस्य सप्तमम् ॥ ७ ॥

प्राक्पुष्करार्द्धे पाश्चात्ये विदेहे श्रीपुरे नृपः ।
सुगन्धिदेशे श्रीषेण श्रीकान्ताऽजनि तत्प्रिया ॥१॥

पूर्वपुष्करार्ध द्वीपाच्या मध्यांतरील मदराचलाचे पश्चिमेस असले त्या विदेहक्षेत्रांत सुगन्धिदेशांतील श्रीपुरांत श्रीषेण नामक राजा होता. त्याची राणी श्रीकांता

स्वयं सुताप्तुं निःपुत्रशोको वाचा पुरोधसः ।
जिनार्चाः सन्मणिस्वर्णैर्विधाप्याष्टाह्निकार्चनम् ॥ २ ॥

त्याना पुत्र नसल्यामुळे ते फार चिंताग्रस्त होते. पुरोहिताच्या सल्ल्यानुसार त्यानीं रत्नजडित सुवर्ण प्रतिमा करून जिनेश्वराचा अष्टाह्निक पूजा महोत्सव केला.

कृत्वा समर्यैसिर्भक्त्या सस्नौ तद्गन्धवारिदे ।
तता दर्शितसुस्वप्न श्रीवर्मासीत्तयो सुत ॥३॥

पूजेच्या गंधोदक तीर्थानें त्या दोघानीं स्नान केले रात्रीं श्रीकांतेला हत्ती, सिंह, चद्र व लक्ष्मी स्वप्नात दिसली व पुढें तिला गर्भ राहून श्रीवर्मा नावाचा मुलगा झाला.

१—पश्चिम विदेहे २ श्रीषेणस्य भार्या ३ भार्यासहित ४ स्नान चकार ।

पित्राभिषिक्तोऽसौ राज्यं कुर्वन्निष्ट्वार्हतो निशि ।
उपोषितोऽग्रसौधस्थो वीक्ष्योल्कापातमापिवान् ॥४॥

मुलासह बरीच वर्षे आनंदात घालविल्यावर राजाने श्रीवर्मास गादीवर बसवून दीक्षा घेतली. पुढे श्रीवर्मा एकदा जिनपूजन करून उपवासाचे दिवशी रात्री गच्चीवर बसला असता त्याने उल्कापात पाहिला.

निर्वेदं तपसा जज्ञे सौधर्मे श्रीधरस्ततः ।
धातकीखण्डपूर्वार्धेऽलकानीवृति नामनि ॥ ५ ॥
अयोध्यायां चक्रवर्ती योऽभूदजितसेनकः ।
ततोऽच्युते स तपसा तत्स्वद्वीपेपूर्वतः ॥ ६ ॥

लगेच त्याला वैराग्य प्राप्त झाल्यामुळे त्याने श्रीकांत नामक पुत्राला गादीवर बसवून श्रीप्रभमुनीजवळ दीक्षा घेतली. बरेच तप आचरून तो सौधर्म नामक पहिल्या स्वर्गातील श्रीप्रभविमानात श्रीधर नामक देव झाला. तेथून धातकीखंडात इष्वाकार पर्वताच्या पूर्वेस अलका देशातील अयोध्या नगरीचा राजा अजितंजय व राणी अजितसेना यांच्या पोटी तो श्रीधर देव अजितसेन नामे जन्मला. तेथून तो सोळाव्या अच्युत नामक स्वर्गात शांतिकर विमानात देवेंद्र झाला.

विजये मङ्गलावत्यां नगरे रत्नसञ्चये ।
पद्मनाभो महाराजो जनित्वा श्रीधरान्तिके ॥ ७ ॥

१ प्राप्तो निर्वेदं २ देशे ३ स चासौ द्वीपः तद्वीपः जम्बूद्वीपपूर्वविदेहे ४ क्षेत्रे ।

दीक्षित्वा नाम बध्वान्त्य वैजयन्तेऽभवच्चतः ।
चन्द्रपुर्यां महासेननृपस्यावाप्य पुत्रताम् ॥ ८ ॥

तेथून पूर्वेस धातकीखंडात मगलावती देशातील रत्नसचय नामक नगरात कनकप्रभराजा व कनकमाला राणीचे पोटीं पद्मनाभ नामें करून नमन बरींच वर्षे राज्यवैभव भोगल्यानतर वैराग्य प्राप्त होऊन त्यानें श्रीधरमुनीजवळ दीक्षा घेतली व षोडश भावना भावून तीर्थंकरकर्म बाधलें नतर तो नयतविमानात अहमिंद्र झाला पुढ चन्द्रपुरीचा राजा महासेन व राणी लक्ष्मणा याच्या पोटीं चद्रप्रभ नानानें तो जन्मला

दर्पण वक्त्रविकृतिं दृष्ट्वा त्यक्त्वा श्रियं जिनं ।
जनशोमभवत्तीर्थं स नश्चन्द्रप्रभोऽवतात् ॥ ९ ॥

बरींच वर्षे राज्यसुख भोगल्यानतर एकदा आरशात पाहतांना त्याना वैराग्य उत्पन्न झालें व राज्यवैभव सोडून त्यानीं दीक्षा घेतली. तीर्थप्रवर्तित करून मोक्षाला गेलेले ते चद्रप्रभतीर्थंकर आमचें रक्षण करोत

श्रीवर्मा श्रीधरो देवोऽजितसेनोऽच्युताधिपः ।
पद्मनाभोऽहमिन्द्रोऽभूद्याऽव्याचन्द्रप्रभः स नः ॥ १०॥

श्रीवर्मा, श्रीधरदेव, अजितसेन, अच्युतेंद्र, पद्मनाभ आणि अहमिंद्र भवातून जो चद्रप्रभ झाला तो तीर्थंकर आमचें रक्षण करो.

इति श्रीचन्द्रप्रभस्याष्टमम् ॥८॥

---

१ लक्ष्मणागर्भे २ जीवन्मुक्त ३ इंद्रधरणेन्द्रचक्रवर्तीयममवत् ४ अस्मान् रक्षतु,

पुष्करार्द्धस्य पूर्वार्द्धे पुष्कलावत्यलङ्कृते ।
ईशिता पुण्डरीकिण्या महापद्मो जिनाधिपात् ॥१॥

पुष्करार्धे द्वीपाच्या पूर्वेस मदराचलाजवळ पूर्वविदेह क्षेत्रात पुष्कलावतीदेशातील पुडरीकिणीनगरीत महापद्मराजा राज्य करीत होता एकदा नजळच्या उद्यानात भूतहित नामक तीर्थंकर आले

श्रुत्वा भूतहिताल्लब्ध्वा तप स तीर्थकृत्त्वभाक् ॥
य प्राणतेन्द्र सुग्रीवकाकन्दीशस्य सोऽज्ञ तुक्॥ २ ॥

त्याच्या पासून जोग घेऊन त्यानें धनद नामक पुत्रास राज्य दिलें व दीक्षा घेऊन तीर्थंकरनामकर्म बाधले तेथून तो जीव चौदाव्या प्राणत नामक स्वर्गात इद्र झाला नतर काकदी नगरीचा राजा सुग्रीव व जयरामा राणीचे पोटीं पुष्पदत नामें करून जमला

उल्कापाताच्यक्तराज्यस्तपसा माप्तकेवल ।
धर्मतीर्थं व्यधात्तस्मै पुष्पदन्तार्हते नम' ॥ ३ ॥

पुष्पदत तीर्थंकरानी बरीच वर्षे राज्य केल्यावर उल्कापात पाहून त्याना वैराग्य उत्पन्न झाल्‍ व दीक्षा घेऊन त्यानीं तीर्थ प्रवर्तित करून मोक्षपद गाठले त्या पुष्पदत अरिहताना नमस्कार असो

इति श्री पुष्पदन्तार्हतो नवमम् ॥ ९ ॥

---

१ पडरीकिण्या २ भूतहितनाम्न ३ आध्यात्मिक ४ सुग्रीवनाम्न काकदीपुरीपते तुक् पुत्र । जयरामागर्भे ।

कन्याभूगोऽश्वदासीभरथंदमतिलौकसाम् ।
दानं तेनेऽस्य तीर्थान्ते मुण्डशालायनो द्विजः ॥ ४ ॥

शीतलनाथ तीर्थंकरानतर मलयदेशात भद्रिलपुरींत मेघरथ राजा राज्य करीत होता. त्याचा मंत्री सत्यकीर्ति सम्यक्त्वी होता. राजानें एकदा कोणतें दान श्रेष्ठ म्हणून विचारलें असता जैनशास्त्रानुसार त्यानें सांगितलें कीं, शास्त्रदान, अभयदान व अन्नदान असे उत्तम, मध्यम व कनिष्ट असे दानाचे तीन प्रकार आहेत. राजाचे दरबारात भूतिशर्मा ब्राह्मणाचा मिथ्यात्वी पुत्र मुंडशालायन नामक होता. तो म्हणाला कीं, कन्यादान, गजदान, सुवर्णदान, अश्वदान, दासीदान, गोदान, तिलदान, पृथ्वीदान, रथदान, व गृहदान अशीं दहाप्रकारचीं दानें आहेत. काळप्रभावानुसार राजाला मिथ्यात्वमताचीं हीं दहा प्रकारचींच दानें रुचलीं.

॥ इति श्रीशीतलनाथस्य दशमम् ॥

शौचि द्वीपे सुकच्छाख्ये देशे क्षेमपुरे नृप ।
नलिनप्रभ इत्यासीत्सोऽनन्ताजिनतस्तप ॥ १ ॥

पुष्करद्वीपात मंदराचळाजवळ पूर्वविदेहक्षेत्रांतील सुकच्छदेशांत क्षेमपुर नावाचें नगर होतें. तेथें नलिनप्रभ नावाचा राजा राज्य

१ शीतलस्य २ मलयदेश भद्रिलपूर मेघरथराजस्य प्रभाजैनेन सत्यकीर्तिमन्त्रिणा शास्त्रादिदानेषु बहुसमर्थितेषु अपि कपोतलेश्यावशादमन्यमानस्य सभाया कन्यादिदानानि मिथ्याशास्त्र प्रदर्श्य विस्तारयामास । तदैव सद्धर्मनाशादेव अधर्मतीर्थादनंतरं तदा तन्नाशश्चिंत्यः ॥ ३ पुष्करार्द्धस्य पूर्वार्द्ध प्राग्विदेह ।

करीत होता. एकदा सहस्राम्रवनात अनंतजिनेंद्र आले असता त्याची वाणी ऐकून राजाला उपरति झाली त्यानें दीक्षा घेतली व तप आचरिलें

स्वीकृत्य तीर्थकृन्नाम बद्ध्वागादच्युतेन्द्रताम् ।
पुष्पोत्तरविमानेऽत पुत्र सिंहपुरेशित ॥ २ ॥

षोडशभावना भावून त्यानें तीर्थंकरनामकर्माचें बंधन केलें व सोळाव्या पुष्पोत्तर विमानात अच्युतेंद्र झाला तेथून तो सिंहपुरचा राजा विष्णु व राणी नंदा याच्या पोटीं जन्मला

विष्णोर्भूत्वाऽत्र मुक्तश्रीर्वसन्तपरिवर्तनात् ।
धर्मं प्रणीय निर्वाण स श्रेयान् श्रेयसेऽस्तु न ॥३॥

श्रेयांसनाथ तीर्थंकरानीं बरीच वर्षे राज्य केल्यानंतर एकदा वसंत ऋतु गेलेला पाहून त्याना उपरति झाली व त्यानीं दीक्षा घेऊन तपश्चर्या केली पुढें धर्मतीर्थ चालू करून ते निर्वाणाला गेले ते श्रेयांसनाथ आम्हाला कल्याणकारक होवोत

पोतो राजगृह दत्त भ्रात्रीया विश्वभूतिना ।
विशाखभूतयेऽवीयान्विश्वनन्दी तदांऽकज ॥ ४ ॥

राजगृहनगरीचा विश्वभूति राजान विशाखभूति नामक धाकट्या भावाकडे राज्यकारभार सोपवून दीक्षा घेतली त्याला विशाख नंदी नामक पुत्र होता व त्या विश्वभूतीचा पुत्र विश्वनंदी

१ नदा गर्भज २ त्यक्तराज्यलक्ष्मीक ३ तीर्थ कृत्वा ४ रक्षा कुर्वत ५ विश्वभूतेरनुजस्य ६ युवराज जात । ७ विशाखभूतिपुत्र ।

विशाखनान्दिनः स्वांतवन भंक्त्वानुगृह्य तम् ॥
सपितृव्यस्तपः कुर्वन्मासक्षणपारणे ॥ ५ ॥

विश्वनदीनें उत्तम बगीचा बनविला होता. तो जबरदस्तीनें विशाखनदीनें घेतला. अर्थात् दोघामध्ये भांडण जुपलें. राजानें पुतण्याचाच पक्ष घेतला तेव्हा मुलगा पळून गेला त्यामुळे विश्वनदीला उपरति उपन्न झाली व त्यानें आपल्या काकासह सभूतमुनीजवळ दीक्षा घेतली. पुढें विश्वनदी महिन्याचें अनशनव्रत आचरून पारणें करण्यासाठीं मथुरा नगरीत गेला

प्रविष्टो मथुरां धेन्वा पातितः क्व सविक्रमः ।
इति तेनो पहसितो वेश्यासौधाग्रवर्तिना ॥ ६ ॥

बापाला व चुलत भावाला कीं जो गादीचा खरा वारस होता अशा दोघाना राज्य सोडून जाण्यास कारणीभूत झाला ह्मणून प्रजेनें त्या दुराचारी विशाखनदीला आमात्य वगैरेनी हकलून दिले होते ता नगरीतच वेश्येच्या घरीं होता. विश्वनदिमुनि रस्त्यान चालले असतां गाईचा धक्का लागून खाली पडलें ते वेश्येच्या गच्चीवरून विशाखनदीने पाहिलें व विश्वनदीस ओळखून ह्मणाला, 'कुठ आहे तो तुझा पराक्रम ?'

१ स्वेम्या वनपालभ्य आत्त वः द्गृहीत वन यन । स्वपिता विश्वनदिन कामभूपराजमपराध्य त निर्जेतु प्रस्थाप्य वनपालानभिभूय गृहीत नदनोपमतद्वन २ सग्राम तदाश्रयान्स्वयमुत्पाटितकपित्यवृक्षान्नाशयित्वा अनुगत्य त शिलास्तभमाश्रित्य स्थित तत्प्रहारेण त पातयित्वा विपादित मा भैषीरिति समाश्वास्य राज्य तद्वन च दत्वा प्रव्रज्या गृहीत्वा ३ पुत्राय राज्य दत्वा प्रव्रजितेन पितृव्येणसह सभूतगुरुसनिधौ तपस्यन् । ४ दुराचारत्वा दमात्यादिभी राज्यान्निर्घाटितेन जनस्य विगतेदीभूय तत्रागतेन ।

क्रोधाग्निदान तद्धात कृत्वाप सापितृव्यक ॥
महाशुक्र ततश्च्युत्वा पोदनशः प्रजापते ॥ ७ ॥

याने टोचून बोल्लेले ऐकून विश्वनदिमुनीला राग आला व तेथेंच तो मरण पावून महाशुक्रनामक स्वर्गांत देव झाला विशाखभूतिहि याच स्वर्गांत देव म्हणून होता पोदनपुरचा राजाप्रजापति व राणी मृगावती यांना पोटी त्रिपृष्टनामानें विश्वनदी जन्मला

पुत्र पितृव्यो विजया बलोऽभूदितरा हरि ।
त्रिपृष्टो जितसिंहोऽस्ता भव भ्रान्त्वा पुरा रिपुर्म् ॥८॥

विशाखभूतीचा जीव राजा प्रजापति व राणी जयवती याच्या पोटीं विजय नावानें जन्मला या प्रमाणें चुलत पुतणे सावत्र भाऊ झाले

त जातमलकाधीशमश्वग्रीवार्द्धचक्रिणाम् ॥
हत्वा स्वयम्प्रभाहेतोस्त्रिखण्डाम्भरतावनिम् ॥९ ॥
भुक्त्वागात्सप्तमीं सोरिर्व्हारभपरिग्रह ।
त्रिपृष्टो भूमिमस्तारि विजय पुनरर्हमीम् ॥१०॥

विशाखनदी अलकापुरीचा राजा अश्वग्रीव याच्या पोटीं जन्मला. त्रिपृष्ट व विजय पूर्वी बलभद्रनारायण होते ज्यानीं अश्वग्रीवला मारुन त्रिखण्डपृथ्वी पादाक्रान्त केली होती. स्वयप्रभाराणी खातर त्रिपृष्टानें

१ विशाखभूतिचर २ विश्वनदिचर ३ एकदा प्रजोपद्रवकारिण सिंह जित्वा स्थत ४ विशाखनदिन । ५ महातमःप्रभानरक भुज ६ अश्वग्री वरहित ७ मुक्तिलक्षणा भूमिमगात् ।

पुष्कळ पापाचरण केले व शेवटीं महातम प्रभा नावाच्या सातव्या नरकात गेला. अश्वग्रीवाचा जीवहि त्याच नरकात गेला. विजयानें विरक्त होउन दीक्षा घेतली व मोक्षास गेला

इति श्रीश्रेयस्तीर्थकराश्वग्रीव प्रतिवासुदेव विजयबलदेव त्रिपृष्टवासुदेवेतिवृत्तोत्तरं मेकादशम् ॥११॥

प्राग्द्वीपे वत्सकावत्या यो रत्नपुरपालकः ।
पद्मोत्तरोऽभूद्युग्मरणो युगन्धरजिनाश्रयात् ॥ १ ॥

पुष्करार्धद्वीपाच्या पूर्वेस मेरुपर्वतानजीक वत्सकावती देशातीळ रत्नपुरात पद्मोत्तर नामक राजा राज्य करीत होता. एकदा मनोहर-पर्वतावर युगधर तीर्थंकर आले असता त्यांच्याजवळ राजानें दीक्षा घेतली.

प्राप्तान्त्यनामा शक्रोऽथ महाशुक्रेऽथ नन्दन ।
वसुपूज्यस्य देवेऽङ्गे चम्पाया सार्वसंयमम् ॥२॥

त्यानें सोळा भावनाचें चिंतन करून व तप आचरून तीर्थंकरनामकर्म बांधलें. तेथून तो महाशुक्रनामक विमानात इंद्र झाला. नंतर चंपानगरचा राजा वसुपूज्य व राणी जयावती यांच्या पोटीं तो वासुपूज्यनावें करून जन्मला.

---

१ पुष्करार्द्धपूर्वद्वीप प्राग्विदेहे २ अभूत् ३ जयावतिर्भू ४ ययाख्यातचारित्र प्राप निर्वृतो ।

कुमार एव संसार तत्वाद्ध्यानादुपेत्य च ।
निर्वेगी तीर्थकृद्देयात्स श्रियं वासुपूज्यताम् ॥ ३ ॥

कुमार असतानांच त्यांना वैराग्य प्राप्त होऊन त्यांनीं दीक्षा घेतली. तपश्चर्या करून तीर्थ प्रवर्तित केलें व मोक्षाला गेले.

विन्ध्यशक्तिनृपो विन्ध्यपुरेऽभूदत्र भारते ।
सुषेणस्याथ कनकपुरेशो गुणमञ्जरीम् ॥ ४ ॥

या भरत खंडांत मलयदेशांतील विंध्यपुरात विंध्यशक्ति नामक राजा राज्य करीत होता. त्याचवेळीं कनकपुरांत सुषेणराजा राज्य करीत होता. त्याच्याजवळ गुणमजरी नामक नर्तकी होती.

नर्तकीरत्नकमाकर्ण्य चराद्दूतेन याचितम् ।
अददानमवस्कन्द्यं तं जित्वाजौ तदग्रहीत् ॥ ५ ॥

त्या नर्तकीरत्नाची कीर्ति ऐकून विंध्यशक्तीनें तिला आपणाकडे पाठविण्यासाठीं सुषेण राजाकडे दूत पाठविला. त्यानें तिला पाठ-विण्याचे नाकारल्यामुळे युद्ध करुन विंध्यशक्तीनें नर्तकी आणली.

तन्मानभङ्गान्निर्विद्य सुषेणः सुव्रताज्जिनात् ।
महापुरेशिना वायुरथेनामाचरत्तपः ॥ ६ ॥

मानभंग झाल्यामुळे सुषेणराजा खिन्न झाला त्यावेळीं सुव्रत जिनेंद्राजवळ महापुरच्या वायुरथराजासह दीक्षा घेऊन तपश्चर्या केली.

१ प्राप्य २ मुक्तोऽभूत् ३ वासुपूज्यस्यभावः वासुपूज्यता ता वासुपूज्य संबंधिनी ४ धाटयित्वा ५ त मुषेण । ६ महापुरस्यपुरस्वामिना ।

विमानेऽनुत्तर वायुरथोऽ भूत्प्राणते प्रभुः ।
निदानिकोऽन्योऽनुपमे देवो द्वारावतीपतेः ॥ ७ ॥

वायुरथमुनि प्राणतस्वर्गातील अनुत्तरविमानांत इंद्र झाला तेथून तो अनुत्तरविमानेश द्वारावतीचा राजा ब्रह्म व राणी उषा याच्या पोटीं द्विपृष्ट नावानें जन्मला

तुग्ब्रह्मणोऽचलाख्योऽभूत्पूर्वो राम-परो हरिः ।
द्विपृष्टाख्यो भवे भ्रान्त्वा भोगवर्धनपू पतिम् ॥ ८ ॥

सुषेणराजाचा जीव राजा ब्रह्म व राणी सुभद्रेच्या पोटीं अचळ नावानें जन्मला. हे दोघ बलभद्र व नारायण होते विंध्यशक्तीनें भोगवर्धननगरचा राजा श्रीधर याचे पोटीं तारक नावानें जन्म घेतला

तारकाख्य प्रतिद्विरीभूत गन्धेभयाचिनम् ।
हत्वारिं सोऽधधिस्थान तेनोमागाद्बलःशिवम् ॥ ९ ॥

तारक प्रतिनारायण होता तारकानें द्विपृष्ट व अचळ याच्याकडे असलेला प्रख्यात हत्ती मागविला तो त्यानीं न पाठविल्यामुळें तारकानें त्यांच्याशीं युद्ध केलें पण तो त्यात मारला जाऊन सात व्या नरकात गेला द्विपृष्टहि त्याच नरकात गेला अचळनें मात्र यामुळें विरक्त होऊन दीक्षा घेतली व तो मोक्षाला गेला.

१ स्वर्गे २ ३ विंध्यशक्तिघाते कृत निदान सुषेण प्राणतस्वर्गे ऽनुपमे विमाने ४ ब्रह्मणस्तुक पुत्र: ५ पूर्वो वासुदेवचर ६ पर: सुषेण ७ विंध्यशक्तिचर ८ द्विपृष्ट: ९ सप्तम नरक १० रिपुणासह ।

इत्याशाधरहब्धे त्रिपष्टिस्मृतिनाम्नि महापुराणान्तस्तत्वसङ्ग्रहे श्रीवासुपूज्यतारक प्रतिकेशवाचलाख्यबलद्विपृष्टाख्यकेशवेतिवृत्तोत्तरं पुराणं द्वादशम् १२

मेंतीन्य धातकीखण्डेमेरुप्रत्यग्विदेहगे ।
विषये रम्यकावत्यां यो महानगरेऽधिराट् ॥ १ ॥

धातकी खडात मेरु पर्वताच्या पश्चिमेस रम्यकावती देशातील महानगरात पद्मसेन नामक राजा राज्य करीत होता

पद्मसेनस्तपः सर्वगुप्तकेवलिसन्निधौ
गृहीत्वैकादशाङ्गस्तीर्थकृन्नाम बद्धवान् ॥ २ ॥

त्याने प्रीतिंकरवनात सर्वगुप्तकेवली आले असता त्यांच्या जवळ दीक्षा घेतली एकादशांगाचें अध्ययन करून तीर्थंकर नाम कर्म बांधिलें

सहस्रारेऽथ शक्रोऽभूत्ततः काम्पिल्यपत्तने ।
कृतवर्मनृपस्याभूत्सुतो हेमन्तसम्पदाम् ॥ ३ ॥

तेथून तो सहस्रार नामक बाराव्या स्वर्गांत इंद्र झाला पुढें काम्पिल्य नगरीचा राजा कृतवर्मा व राणी जयश्यामा यांच्या पोटी विमलनाथ नांवानें जन्मला.

त्रिलीनां वीक्ष्य निर्ग्रन्थी भूय ध्यानाप्तकेवलः ।
धर्मं प्रणीय सिद्धस्तं स्तुवे विमलवाहनम् ॥ ४ ॥

---

१ पश्चिम । २ जयश्यामागर्भज ।

एकदा हेमंतऋतूतील सृष्टिशोभा क्षणार्धांत नष्ट झालेली पाहून विमलनाथाना वैराग्य उत्पन्न झाले व त्यानीं निर्ग्रंथ बनून तपश्चर्या केली व धर्मतीर्थ चालू करुन सिद्धपदाला ते गेले त्या विमलवाहन तीर्थंकराची मी स्तुति करतो

योऽत्रापरविदेऽभूच्छ्रीपुरे नन्दिमित्रराट् ।
स सुव्रतव्रतमुने प्राप्त व्रतोन्त्यानुत्तर गत ॥ ५ ॥

याच भरतखंडाच्या पश्चिमविदेहक्षेत्रातील श्रीपुरात मित्रनंदी नामक राजा होता. एकदा तो सुव्रतनाथतीर्थंकराच्या दर्शनास गेला असता त्यांची बोधवाणी ऐकून विरक्त झाला व तप आचरुन सर्वार्थसिद्धि नामक स्वर्गातील अनुत्तरविमानात अहमिंद्र झाला

भरतेऽस्मिन्कुणालाख्य देशे श्रावस्त्यधीश्वरः ।
सुकेतुर्भोगसक्तोऽभून्निषिद्धोऽप्यसकृद्धितैः ॥ ६ ॥

या भरत क्षेत्रातील कुणाल देशात श्रावस्ती नामक नगरीत सुकेतु नामक राजा राज्य करीत होता तो फार भोगासक्त होता त्याचे नातलग, मंत्री व प्रजाजन त्याचा फार निषेध करीत

द्यूत दीव्यन्सवल्याद्य हारिताशेषवस्तुकः ।
सुदर्शनाचार्यवाचातपस्यन् तपसामुना ॥ ७ ॥

द्यूतादिव्यसनात त्याचें सर्वस्व गमावले तेव्हा पश्चात्ताप पावून त्यानें सुदर्शनाचार्यांच्या जवळ दीक्षा घेतली व तप आचारिले

१ मंत्रिबंधुवरै २ राष्ट्रविचक्षणैः प्रभृति ३ भेवयमह दीक्षा मां प्याभिवे मम न दाया न पतिष्यति ।

सबलाशुद्धे इत्यात्तनिदानो लान्तवङ्गतः ।
तावभूतां सुतौ भद्रनाम्नो द्वारवतीपतेः ॥ ८ ॥

या तपानें कला, गुण, चातुर्य व बल प्राप्त होवो असें निदान बांधून तो लांतवस्वर्गात देव झाला. तेथून द्वारावती नगरीचे राजा रुद्र व राणी पृथ्वी यांच्या पोटी तो स्वयंभू नावानें जन्मला

धर्मस्वयम्भूनामानौ रामविष्णू अथैकदा ।
मधुर्बलिचरः सोऽर्द्धचक्री वरपुरेशिना ॥ ९ ॥

मित्रनंदीराजा अहमिंद्रभवातून रुद्रराजाच्या सुभद्राराणीचे पोटीं धर्म नामें करून जन्मला. धर्म बलदेव होता व स्वयंभू वासुदेव होता ज्यानें धूतात सुकेतूला जिंकलें होतें तो राजा यावेळीं रत्नपुरचा मधु नामक राजा झाला होता. तो प्रतिवासुदेव होता.

केनापि प्रहितं राज्ञा प्राभृतं दूतघाततः ।
स्वयम्भुवा हृतं श्रुत्वा नारादात्तज्जिघांसया ॥१०॥

मधुराजाकडे दुसऱ्या राजाकडून काहीं भेट घेऊन जाणाऱ्या दोन दूताना स्वयंभूनें ठार मारून भेट हिरावून घेतली. तें वर्तमान ऐकून मधु त्या बलदेव व वासुदेवाबरोबर लढण्यास गेला

मुक्तचक्रोहतस्तेनै सप्तमीं भुवमाविशत् ।
पश्चात्स्वयम्भूश्चाधर्मादूर्ध्वे धर्मः सुनिर्वृतः ॥११॥

---

१ बलात्कारेण मुष्यें पश्चात्सुकेतुना दीक्षा गृहीता २ नंदिमित्रसुकेत्वू द्वौ ३ जात ४ द्वयोर्दूतौ निहत्य ५ तयोर्धर्मस्वयम्भुवोर्हन्तुमिच्छया ६ मधु. ७ स्वयम्भुवा ८ सप्तमीमाविशत् ९ मोक्ष गत. ।

त्या युद्धात स्वयंभूनें सोडलेल्या चक्रानें मधुराजा मारला गेला व तो सातव्या नरकात पडला. स्वयंभूसुद्धा त्याच नरकात गेला. त्यामुळें व्यथित होऊन धर्मबलदेवानें दीक्षा घेऊन मोक्षपद गाठलें.

मधुराराममदत्तादिभवी मेरुश्चमन्दरः ।
वारुणीपूर्णचन्द्रादिभवी विमलसद्‌घपौ ॥ १२ ॥

याचकाळात श्रीविमलतीर्थंकराचे मेरु व मदर नामक दोन गणधर होते. त्याची भवावली अशी—कौसल देशातील वृद्ध नामक गावात भृगायण नावाचा एक ब्राह्मण होता त्याच्या बायकोचें नाव मधुरा हिचाच जीव पुढें मेरुगणधर झाला. या ब्राम्हण दापत्याला वारुणी नामक मुलगी झाली हिचा जीव पुढें मदरगणधर झाला मधुराब्राम्हणी मेल्यानतर रामदत्ता राणी झाली ही सिंहसेन राजाची पत्नी. हिनेंच सुभूतिमंत्र्यानें भद्रमित्र शेठची बळकावलेली रत्नमंजूषा मोठ्या युक्तीनें शेठला मिळवून दिली ही राणी मेल्यानतर महाशुक्रस्वर्गात देव झाली तेथून ती धरणीतिलकनगरचा राजा मतिवेग व राणी सुलक्षणा याच्या पोटीं श्रीधरानामें करून जन्मली श्रीधरा पुढें अर्जिका बनली व मेल्यावर आठव्या कापिष्ठ स्वर्गात देवी झाली पुढें पृथ्वीतिलक नगरीचा राजा मतिवेग व राणी प्रियाकरिणी याच्या पोटीं ती रत्नमाला नामें करून जन्मली नतर तो जीव स्वर्गात अच्युत देव झाला. तेथून

१ मेरुभव २ रामदत्तादिभवो यस्य मेरो स ३ पुन श्रीविमलनाथगणधरौ जातौ ।

तो जीव अयोध्यानगरीचा राजा अर्हद्दास व राणी सुव्रता यांच्या पोटीं वीतभय नामें करून जन्मला हा बळदेव मेल्यानंतर लांतव स्वर्गांत आदित्याभ नामक देव झाला, हाच देव उत्तरमथुरानगरीचा राजा अनंतवीर्य व राणी मेरुमालिनी याचे पोटीं मेरु नांवानें जन्मला व विमलनाथ तीर्थंकराचा गणधर झाला. मधुराब्राह्मणीची मुलगी वारुणी मेल्यानंतर तिच्या रामदत्ताभवात तिचा पूर्णचंद्र नामक मुलगा होऊन जन्मली. पूर्णचंद्र दीक्षा घेऊन वारल्यावर वैडूर्यदेव झाला नंतर मधुरेच्या श्रीधराभवात तो देव यशोधरा नामें करून जन्मला तिचें सूर्यावर्ताशीं लग्न झालें व त्यांना रश्मिवेग नामक मुलगा झाला यशोधरा आर्जिका होऊन मेल्यानंतर आठव्या कापिष्ठ स्वर्गांत देवी झाली मधुरेच्या रत्नमालाभवात ही देवी रत्नायुधनामक पुत्र होऊन तिला जन्मली अयोध्येचा राजा अर्हद्दास व राणी जिनदत्ता याच्या पोटीं पुढें रत्नायुध मेल्यानंतर विभीषण नांवानें जन्मला हा नारायण मेल्यावर दुसऱ्या नरकात गेला तेथून तो अयोध्येचा राजा श्रीवर्मा व राणी सुसीमा याचे पोटीं श्रीधाम नांवानें जन्मला दीक्षा घेऊन तो मेल्यानंतर पांचव्या ब्रह्म नामक स्वर्गांत देव झाला. वीतशोकपुरचा राजा वैजयंत व राणी सर्वश्री याच्या पोटीं तो देव जयंत नांवानें जन्मला पुढें तो धरणेंद्र झाला शेवटीं हा धरणेंद्र उत्तरमथुरानगरीचा राजा अनंतवीर्य व राणी अमितमती याच्या पोटीं मंदर नामें करून जन्मला व विमलनाथ तीर्थंकराचा गणधर बनला याप्रमाणें हे दोन गणधर

मागील भवात सात्र भाऊच होते. वारुणीचा जीव बारा जन्मानन्तर मदर झाला आणि मधुरेचा जीव आठ जन्मानन्तर मेरु गणधर झाला.

जातौ सूच्येत तद्वंर्त्तं भरतेऽत्र खगाधपाक् ।
आनीय गन्धमालिन्या नदीपञ्चकसङ्गमे ॥ १३ ॥

वैजयतमुनि वनात प्रतिमायोग धारण करून बसले असता विद्युद्दष्ट्र नामक विद्याधराने पूर्वजन्मीचे वैर स्मरून त्याना भरतक्षेत्रातील विजयार्धपर्वताच्या पूर्वेस गंधमालिनीदेशात असलेल्या कुसुमवती, हरिवती, सुवर्णवती, गजवती आणि चडवेगा या पाच नद्याच्या संगमातील खोल पाण्यात आणून टाकले.

क्षिप्त्वा प्रोगैवरतो विद्युद्दंष्ट्रखेटेन मारित ।
खेटैस्तदीडितश्चान्यैः सञ्जयन्तः सुधर्मिर्मुनिः ॥ १४ ॥

त्याला इतर विद्याधरानीहि मदत केली.

तत्कल्याणेऽहिराँड्भतो निदानादागतोऽनुजं ।
तस्याङ्गं वीक्ष्य रुष्टोरिं सम्बन्धु हन्तुमुंद्यतः ॥१५॥

सजयत मुनीचा भाऊ जयत धरणेंद्र आपल्या भावाला झालेली पीडा पाहून विद्युद्दंष्ट्राला सर्व बाधवासह समुद्रात बुडवून मारू लागला.

१ तयोर्मेरुमदरयोः २ जम्बूद्वीपापरविदेहस्थविजयार्द्धे ३ दक्षिणतः सकाशादानीय अपाक् शब्दोऽत्राव्ययः । ४ श्रीभूतिभवे सिंहपुरे सिंहसेन राजेन बद्धात् । ५ श्रीभूतिचरेण ६ स चासौ ईडितस्तदीडित ७ सिंहसेन राजचरः ८ धरणेंद्रत्व प्राप्तः ९ जयतनामा १० नागपाशेन बद्ध्वा समुद्रे क्षेप्तु ।

आदित्याभसुरेणोक्त्वा सत्यघोषादिवृत्तकम् ।
वारितो मन्दराख्योऽभूद्गणी मेरुश्च स क्रमात् ॥१६॥

रामदत्तेने रत्नमजूषा भद्रमित्र शेठला परत दिली व श्रीभूति उर्फ सत्यघोष मन्त्र्याची लबाडी बाहेर आणल्यावर सिंहसेन राजानें त्याला शिक्षा दिली होती. त्यामुळें तो त्याचा वैरी बनला होता. मेल्यानतर तो मन्त्री अगधन नामक सर्प झाला. मेल्यानतर तो तिसऱ्या नरकात गेला. तेथून चमरहरिण झाला. पुढें कुक्कुट-सर्पयोनींत गेला. नतर पुन्हा तिसऱ्या नरकांत जाऊन अजगरयोनींत जन्मला. नतर तो भिल्ल झाला. तेथून तो भरतक्षेत्रातील भूतरमन नामक वनात गोशृग तापसी व त्याची बायको सखिया यांच्या पोटीं मृगशृग नावानें जन्मला. त्यानें पचाग्नि साधन केलें व विद्याधरवैभव पाहून तें निदान केलें. त्यामुळे तो वज्रदष्ट्र व विद्युत्प्रभा या विद्याधर जोडप्यापासून विद्युद्दष्ट्र नामकरून जन्मला. राजा सिंहसेन मेल्यानतर अशनिघोषनामक हत्ती झाला. तो मरून नतर श्रीधरदेव, रश्मिवेग, अर्कप्रभ वगैरे जन्म घेऊन चक्रपुरचा राजा चक्रायुध व राणी चित्रमाला याच्या पोटीं वज्रायुधनामें करून जन्मला. अशनिघोष हत्तीला विद्युद्दष्ट्रानेंच सर्पभावात दश करून मारलें होतें. राजा वज्रायुध मुनि होऊन प्रतिमा योग धारण करून तपश्चर्या करीत असता विद्युद्दष्ट्रानें भिल्ल-

१ रामदत्ता चरेण २ निषिद्धः ३ आदित्याभसुर मरुभूत् चक्रायुध सो मदरोऽभूत् ।

भवात त्याना ठार मारले होतें. तेव्हा तो जीव सर्वार्थसिद्धिस्वर्गांत अहमिंद्र झाला व नतर सजयत झाला अशा रीतीनें सजयतमुनि व विद्युद्दष्ट्राचे भगोभगींचें वैर असल्यामुळें विद्युद्दष्ट्रानें मुनिला विनाकारण सगमात बुडविलें असें धरणेंद्राला आदित्यादेवानें सत्यघोष व सिंहसेन भवापासून इत्तीवृत्त सागून समजाविल्यावर तो स्वस्थ झाला

इति श्रीविमलनाथधर्मस्वयभूमघुवृत्तगर्भसञ्जयन्तमेरुमन्दरचरितोत्तरं त्रयोदशम् ॥ १३ ॥

राजा प्राग्धातकीखण्डकच्छकावत्यवास्थितः ।
पुरे पद्मरथोऽरिष्टे य श्रित्वार्हत्स्वयमभात् ॥ १ ॥

धातकीखड द्वीपात मेरुपर्वताजवळ कच्छकावती देशात अरिष्ट नामक गावचा राजा पद्मरथ स्वयप्रभ तीर्थकराजवळ दीक्षा घेऊन त्याचाच आश्रय करता झाला.

तैपो बध्वा तीर्थकृत्त्व भुक्त्वाच्युतरमाच्युत ।
साकेते सिंहसेनस्य पुत्रोभूय विरज्य च ॥ २ ॥

वरीच तपश्चर्या करून त्यानें तीर्थकरनामकर्म बाधलें व सोळाव्या अच्युतस्वर्गात पुष्पोत्तर विमानात देव झाला तेथून तो अयोध्येचा राजा सिंहसेन व राणी जयश्यामा याच्या पोटी अनतनाथ नामें करुन जन्मला वरीच वर्षें राज्य करुन त्यानें दीक्षा घेतली

१ श्रित्वा आश्रित्य । २ षोडशस्वर्गजा लक्ष्मीं ३ जयश्यामाया ।

उल्कापातक्षणाज्जात कैवल्यस्तीर्थकृत्सतोम् ॥
माग्योऽनन्तमपदम्प्राप्यात्मनः पायादनन्तजित् ॥३॥

एकदा उल्कापात पाहून त्याला वराग्य उपन्न झालें व दीक्षा घेऊन त्यानें तपश्चर्या केली व सर्वज्ञ बनून सज्जनांत श्रेष्ठ झाला धर्मतीर्थ प्रवर्तित करून जे मोक्षाला गेले ते अनतनाथ तीर्थंकर आमचे रक्षण करोत.

वसुषेण पौदनेऽस्मिन्नृपो नन्दास्यं वल्लभा ॥
तां वीक्ष्य मलयाधीशस्तन्मित्रं चण्डशासन ॥ ४ ॥

याच भरत क्षेत्रातील पौदानपुरात राजा वसुषेण व राणी नदा राज्य करीत होती मलयदेशचा राजा चडशासन हा सुषेण-राजाचा मित्र होता नदाराणीला पाहून तो मोहित झाला.

कामार्तो हृतवद्भर्ता शोकार्तः सम्प्रबोधितैं ॥
श्रेयोगणं नुत्य कृत्वा सिंहनि क्रीडित तप ॥ ५ ॥

कामपीडित झालेल्या चडशासनानें तिला पळवून नेला तेव्हा राजा वसुषेण फार दुःखी झाला पण त्याचा निरुपाय होता म्हणून त्यानें जागे होऊन श्रेय नामक गणधराजवळ दीक्षा घेतली व सिंहनि क्रीडित नामक घोर तप त्यानें आचरिलें

१ सपुण्याणां मध्ये प्राज्येष्ठ । २ वसुषेणस्य भार्या नंदा ३ नदा ४ तस्य वसुषेणस्य ५ उपाय ता हृत्वा स्वपुर गत ६ वसुषेण ७ प्रबोधः जातो यस्य सः प्रबोधित ८ नुत्वा ।

ततो निदानतोऽगच्छत्सहस्रारं परस्थिंति ॥
प्राग्विदेहे नन्दनेऽभूत्पुरे राजा महाबलः ॥ ६ ॥

मी पुढील जन्मांत बलिष्ठ राजा व्हावे असे निदान बांधून वसुषेण मुनि मेल्यावर बाराव्या सहस्रार नामक स्वर्गांत देव झाला. विदेहक्षेत्रात नंदनपुरात राजा महाबल राज्य करीत होता.

सोऽपि तद्वत्तपः कृत्वा प्रजापालार्हदन्तिके ॥
शान्तस्तत्रैव देवोऽभूत्ततश्च्युत्वाऽभवत्सुतः ॥ ७ ॥

प्रजापाल तीर्थंकराजवळ दीक्षा घेऊन त्यानेंहि तशीच तपश्चर्या केली व बाराव्या सहस्रार नामक स्वर्गात देव झाला.

द्वारावत्यामभूत्सोमप्रभभूपस्य सुप्रभ ।
वसुषेणचरोऽस्यासीदनुज पुरुषोत्तम ॥ ८ ॥

तेथून तो द्वारावती नगरीचा राजा सोमप्रभ व राणी जयावती यांच्या पोटीं सुप्रभ नावाने जन्मला त्याच्या सीताराणीपासून त्याला पुरुषोत्तम नामक मुलगा झाला. ता वसुषेणाचा जीव होय.

तच्छ्रियं नारदाच्छ्रुत्वा काशीशो मधुसूदनः ।
तौ चण्डशासनभरौ तेनैवेभादिककरम् ॥ ९ ॥

काशीनगरीचा राजा मधुसूदन याने नारदापासून पुरुषोत्तम

१ भवान्तरेऽलप्स्य शासन वातो भूयासमिति संकल्प २ पद उत्कृष्टा स्थिति अष्टादशसमुद्रायु ३ जम्बूद्वीपस्थ ४ शांतनामा ५ सहस्रारे ६ द्वारावती च स्यात् । ७ तस्य पुरुषोत्तमस्य ८ चण्डशासनचरः ९ प्रचण्डाशासनपरौ १० नारदेनैवगजरत्नादिकर ।

व वसुप्रभ याचें वाढतें सामर्थ्य एकले. तेव्हा त्यानें हत्ती वगैरे कर-
भार वसूल करण्यासाठीं नारदाला पाठविलें.

प्रातिलोम्यं तयोःश्रुत्वाक्रुद्धस्तौ हन्तुमागतः ।
स हतो विष्णुना सारि क्ष्मांगतोन्त्यां बलेःशिवम्॥१०

त्याची उलट उत्तरें ऐकून तो त्याना मारण्यास गेला. तेव्हा पुरुषोत्तमानें त्याला मारले. पुढे पुरुषोत्तम मरून सातव्या नरकात गेला म्हणून सुप्रभला फार दुःख झाले. तेव्हा त्यानें सोमप्रभ तीर्थंकराजवळ दीक्षा घेऊन कठिण तप केले व तो मोक्षाला गेला.

इति श्री अनन्तसुप्रभपुरुषोत्तममधुसूदनेतिवृत्तोत्तरं चतुर्दशम् ॥ १४ ॥

यःसुसीमापुरे पूर्वे धातकीखण्डवत्सगे ।
नृपो दशरथःस्तावैदिन्दुग्रहणदर्शनात् ॥ १ ॥

धातकीखडाच्या पूर्वेस मेरुपर्वताजवळ विदेहक्षेत्रातील वत्सदेशात सुसीमापुरींत दशरथ नामक राजा राज्य करीत होता त्याला चंद्रग्रहण पाहून वैराग्य उत्पन्न झाले.

दीक्षितःस्तीर्थकृत्पुण्यं बध्वासर्वार्थसिद्धिगम् ।
शुचत्वाभानुमहाराज तोकौ रत्नपुरेऽजनि ॥ २ ॥

दीक्षा घेऊन त्यान सोळाभावनांचें चितवन केले व तीर्थंकर नामकर्म बांधले. तेथून तो सर्वार्थसिद्धि नामक स्वर्गांत अहमिंद्र

१ शुक्ल २ सप्तमीं ३ पश्चात् ४ सुत ५ सुप्रभागमें।

झाला, पुढें तो रत्नपुरचा राजा भानु व राणी सुप्रभा याच्या पोटीं जन्मला.

वीक्ष्योल्कां यानमारूढः संयमारूढकेवल ।
प्ररूढधर्मतीर्थोऽसौ धर्मो धर्मं तनोतु नः ॥ ३ ॥

एकदा उल्कापात पाहून धर्मनाथाना वैराग्य उपन्न झालें व त्यानीं दीक्षा घेउन तप आचरिलें धर्मतीर्थ प्ररूढ करून जे मोक्षाला गेले ते धर्मनाथतीर्थंकर आमचें रक्षण करोत.

मेरो प्रत्यगिह द्वीपे वीतशोकापुरीपतिः ।
नरादिवृषभस्तप्त्वा तपो दमवरान्तिके ॥ ४ ॥

मेरु पर्वताच्या पश्चिमेस याच धातकी खडांतील राजगृह नगरीत नरवृषभ नावाचा राजा होता, त्यानें दमवर मुनींजवळ दीक्षा घेऊन तप आचरिलें, मरणानतर तो सहस्रारनामक स्वर्गात देव झाला

सहस्रार समापास्मिंस्तथा राजगृहे नृप ।
सुमित्रो मल्लतादर्पो राजसिंहेन भूभुजा ॥ ५ ॥

त्याच राजगृहीचा राजा सुमित्र चागला मल्ल होता व त्यामुळें त्याला गर्व झाला होता राजसिह नामक दुसरा एक मल्लराजा राजगृहीस एकदा आला.

निर्जितो दौर्मुधा कृष्णाचार्यान्ते दुर्धरं तप ।
कृत्वा मृतो निदानेन माहेन्द्रेऽभून्महर्द्धिक ॥ ६ ॥

१ प्ररूढ प्रसिद्ध धर्मतीर्थ यस्य स २ पश्चिम ३ मल्लयुद्धन ४ सिद्धनि क्रीडितादिक ।

द्वंद्वयुद्धांत त्यानें सुमित्राला जिंकलें तेव्हां तो पार खट्टू झाला व कृष्णाचार्याजवळ जाऊन त्यानें दीक्षा घेतली सिंहनिष्क्रीडितादि घोर तपें आचरून त्यानें निदान बांधलें कीं आपण बलिष्ठ राजा व्हावें. मरणा नंतर तो चौथ्या माहेंद्र नामक स्वर्गांत महर्द्धिकदेव झाला.

औघोऽथ सिंहसेनस्य सूनुःखगपुरेशिनः।
सीरी सुदर्शनोऽन्योऽभूद्विष्णुःपुरुषसिंहकः॥ ७॥

खगपुरचा राजा सिंहसेन व राणी विजया यांच्या पोटीं नरवृषभाचा जीव स्वर्गांतून सुदर्शन नांवानें जन्मला त्याच राजाला अंबिकाराणीपासून सुमित्राचा जीव स्वर्गांतून येऊन विष्णु नांवानें झाला.

राजसिंहचरो भ्रान्त्वा ततो हास्तिनपू:पतिः।
मधुर्क्रीडाभिधो जज्ञे याचमानस्ततःकरम्॥ ८॥

राजसिंहमल्लाचा जीव अनेक योनींत जन्मत हस्तिनपुरचा राजा मधुक्रीड नांवें करून झाला व त्यानें सुदर्शन व विष्णु पुरुष सिंह राजाकडे करभार मागितला

केशवेन हतोऽगच्छद्वधिस्थानमर्न्तरि।
धर्मतीर्थकराल्लब्धवोधिःसिद्धिमगाद्बलः॥ ९॥

तेव्हां त्या दोघांनीं करभार नाकारल्यावर तो युद्धास आला व विष्णूकडून मारला गेला विष्णुहि नंतर मेला व सातव्या नरकांत गेला त्यामुळें सुदर्शनाला वैराग्य वाटून त्यानें

१ नरवृषभचर २ सुमित्रचर ३ तदनंतर ४ दडगभार्यस्यप्रधानमुखेन कृत्वा ५ पुरुषसिंहात् ६ पुरुषसिंहेन सह।

धर्मनाथतीर्थंकराजवळ दीक्षा घेतली व तपश्चर्येनें केवलज्ञान प्राप्त करून घेऊन तो मोक्षाला गेला.

निचिनपुरेराणमध्यग्रैवेयकमगात्तपः ।
तप्त्वा नरपतिर्वासुपूज्यान्ते कोशलापतेः ॥ १० ॥
मघवा यः सुमित्रस्य पुत्रो भूत्वा स चक्रिताम् ॥
भुक्त्वापाभयघोषाख्यकेवल्यन्ते परं पदम् ॥ ११ ॥

निचित्रपुरचा राजा नरपति नामक होता. त्यानें तप आचरून मध्यम ग्रैवेयक नामक स्वर्गांत अहमिंद्रपद मिळविलें. तेथून तो अयोध्येचा राजा सुमित्र व राणी भद्रा याच्या पोटीं मघवान नावानें जन्मला. तो चक्रवर्ती होता. बरेंच वैभव भोगल्यानंतर त्याला उपरति झाली व त्यानें अभयघोष जिनेंद्राची वाणी ऐकून दीक्षा घेतली. बरीच तपश्चर्या करून तो मोक्षाला गेला.

अयाऽच्युतादेत्य सूर्यवंशजोऽनन्तवीर्यजः ॥
चक्री सनत्कुमारोऽभूत्साकेतेऽत्यन्तरूपवान् ॥ १२ ॥

अयोध्येचा सूर्यवंशी राजा अनंतवीर्य व राणी सहदेवी याच्या पोटीं अच्युतनामक सोळाव्या स्वर्गांतील देवानें सनत्कुमार नावानें जन्म घेतला. हा मुलगा रूपवान असून चक्रवर्ती होता.

सौधर्मेन्द्रस्तुतं श्रुत्वा तद्रूप वीक्ष्य संसदि ।
द्वौ देवावूचतुस्तं भो चक्रिन् ! शृणु यथाश्रुतम् ॥१३॥

१ विचित्राख्यनगरस्य नाथो नरपतिनामा । २ सुमित्रस्य । ३ स्वरूप ।

सौधर्मेन्द्राच्या सभेंत सनत्कुमाराच्या रूपाची स्तुति केलेली ऐकून दोन देव ते प्रत्यक्ष पाहण्यास आले व खूष होऊन ह्मणाले,

रूपं तथैव ते हेतुर्न्यूनमद्येक्षणान्मनाक् ।
श्रुत्वेति चक्री निर्विद्य दीक्षितो वितपैश्चरन् ॥१४॥

हे चक्रवर्ति, तुझें रूप असामान्य आहे खरें पण आज आह्मी प्रथम पाहिल्या पेक्षा आता तें थोडेसें कमी झालें आहे. तें ऐकून त्याला वैराग्य उत्पन्न झालें व दीक्षा घेऊन त्यानें तपश्चर्या केली.

प्राप्तर्द्धिः प्रसहन्व्याधीन्सौधर्मेण पुन स्तुतः ।
वेपीभूयामरैः कश्चित्तं परीक्षितुमागतः ॥ १५ ॥

तपश्चर्येत तो दु ख न मानतां अनेक व्याधि सहन करू लागला ह्मणून सौधर्मेन्द्रानें त्याची पुन्हा स्तुति झाली. ती ऐकून एक देव वैद्याचा वेष घेऊन त्याची परीक्षा करण्यासाठी आला.

भो मुने ! हन्मि ते व्याधीनित्युक्तस्तेन सोऽवदत् ॥
शरीरस्पर्शमात्रेण पश्य शाम्यन्ति मे गदाः ॥ १६ ॥

हे मुने, मी तुझी व्याधि नाहींशी करतो असें देवानें ह्मटलें तेव्हा शरीराला स्वत स्पर्श करून मुनीनीं आपले सर्व रोग नाहींसें केले.

---

१ कारण किंतु वर्तते २ ईपत् ३ विशिष्ट ४ सङ्कृत्य विना सहमान ५ वैद्यवेष धृत्वा ६ हस्तस्पर्शेन स्वव्याधिं प्रशमय्य प्रत्यय उत्पादित ।

इर जन्मजरादीश्वेदासि वैद्य इतीरितैः ।
त स्तुत्वागात्स्वं गीं सोऽपि हत्वा कर्माण्यकायताम् १७

व ते त्यास ह्मणाले कीं तू वैद्य आहेस तर जन्मजरा-दिव्याधीचें निवारण कर तें ऐकून देव स्वर्गाला परत गेला व चक्रवर्ती सर्व कर्मांचा उच्छेद करून अशरीरी बनला ह्मणजे मोक्षाला गेला.

इति श्रीधर्मनाथसुदर्शनपुरुषसिंहमधुक्रीडमघव सनत्कुमारचरित पञ्चदशम् ॥१५॥

श्रीषेणो मलये योऽभूद्देशे रत्नपुरे नृपः ।
ईन्द्रोपेन्द्रौ सुतौ सिंहनन्दितानिन्दिताख्ययोः ॥१॥

मलय देशातील रत्नपुरांत श्रीषेण नामक राजा होता. त्याला सिंहनंदिता व अनिंदिता नामक दोन राण्या होत्या पहिलीचा मुलगा इंद्रसेन व दुसरीचा उपेंद्रसेन

पत्न्यो सोऽजीजनद्विप्रस्तस्त्रियो सत्यभामिका ।
सेपश्चाश्चेर्यमादित्यगत्यरिञ्जयचारणौ ॥ २ ॥

१ कथित २ देव ३ स्वर्गम् ४ चक्री ५ सिद्धत्वमगात् ६ इंद्र इंद्रमन सिंहनंदितापुत्र उपेन्द्र उपेन्द्रसेनाऽनिंदितापुत्र ७ पत्न्यो-र्भार्यायाविषये सुतौ अजीजनत् । ८ कपिल । ९ मगधदेशाचलग्रामवास्त-व्यविप्रधरणीजटसत्कदासीपुत्रस्य कपिलाख्यस्य पत्नी १० राजा ११ रत्नवृष्टि, पुष्पवृष्टि, सुरदुंदभिनि स्वन, सुवात, साधुवादश्चेति दानस्या-श्चर्यपंचक पचारच्चर्यसहित ।

८, मगधदेशातील अचलगावचा ब्राह्मण धरणीजट व ब्राह्मणी अग्निला याच्या पोटीं इंद्रभूति व अग्निभूति नामक दोन पुत्र जन्मले. त्या ब्राम्हणाचा कपिल नामक एक दासीपुत्र होता रत्नपुरच्या सत्यक ब्राह्मणानें जंबू ब्राह्मणीपासून झालेली सत्यभामा कपिलाला दिली तो श्रीषेण राजाच्या दरबारीं कांही दिवस होता पण त्याचें हीनकुल कळल्यावर त्याला हाकून देण्यात आलें रत्नपुरात एकदा आदित्यगति व अरिंजय नामक चारणमुनि आले त्याना राजानें आहार दान केल्यामुळें पांच आश्चर्यांची वृष्टि झाली (रत्नवृष्टि, पुष्पवृष्टि, सुरदुंदभीनिनाद, सुगंधीवारा, व जयजय कार हीं पांच आश्चर्यें होत)

सन्तर्प्याग्नि सोऽवेध्नात्पुण्य तांश्चानुमोद्य तद्वं ।
पुत्रावनन्तमेतियुद्धग्नाशावनु सोऽन्यदा ॥ ३ ॥

मुनीला आहारदान केल्यामुळ श्रीषेण राजाला व त्याला अनुमोदन दिल्यामुळें सिंहनंदिता, आनंदिता व सत्यभामा या तीघीना उत्तर कुरुभोगभूमींतील आयुष्याचें बंधन झालें कौशांबीनगरीचा राजा महाबल व राणी श्रीमती याची मुलगी श्रीकांता इंद्रसेनाला दिली होती तिच्याबरोबर अनंतमती नावाची दासी पाठवीली आली होती तिच्याशी उपेंद्रसेनाचा संबंध घडला

१, राजा २ निस्य अबध्नन् ३ दीयमान दान ४ इंद्रसेनपत्न्या श्रीकान्ताया विलासिन्ये अनतमतिनाम्न्ये युधि मम्ना आशा यकाभ्यां तौ निमर्चाहित्य

रंतुं गतौ वने घ्रात्वा विषपुष्पं मृतःसमम् ।
ताभिश्च धातकीखण्डप्राङ्मेरूदक्कुरावभूत् ॥ ४ ॥

त्यामुळें इंद्रसेन चिडला व दोघाचें युद्ध जुंपलें त्याना आरण्यांसाठीं राजा दोन राण्या व सत्यभामेसह गेला असता त्यांनीं एक विषारी फूल हुंगलें व ते चौघे तेथें मेले धातकीखंडात मेरु पर्वताजवळ उत्तरकुरु नामक भोगभूमींत राजा व सिंहनंदिता आणि अनिंदिता व सत्यभामा या चार जीवांचीं दोन आर्य जोडपीं जन्मलीं.

सिंहनन्दितया भोगान्भुक्त्वा तत्रार्यपार्थं स ।
सौधर्मेऽभूत्सत्यभामापत्नीकोऽनिन्दितौचर ॥ ५ ॥

त्या उत्तरकुरुभोगभूमींत सिंहनंदितेसह बराच काळपर्यंत भोग भोगून श्रीषेण सौधर्मस्वर्गांत देव झाला. अनिंदितेचा जीव आर्य व सत्यभामेचा जीव आर्या झाला होता. हें जोडपेंहि सौधर्म स्वर्गांत गेलें

आर्योऽपि तौ मिथःप्रीतौ श्रीपेणार्यचरोऽमरः ।
अत्रामितादितेजस्का द्विश्रणीद्तात्मिपाप्यभूत् ॥ ६ ॥

---

१ उदक्कुरौ २ पत्नीभूतया ३ अनिंदितारार्य तत्रार्योऽभूत् सत्यभामा च तस्य पत्नी । ४ श्रीषेणआर्यचरो देव श्रीप्रभनामा भानिलये विमाने जात । आर्यपत्नी च विद्युत्प्रभाख्या सिंहनंदितार्याचरी । तथा अनिंदितार्यचरो देव विमलप्रभाख्य विमाने जात । तत्पत्नी च शुक्लप्रभाख्या सत्यभामार्याचरी सिंहनंदिताचरी ज्योति प्रभा जाता । सत्यभामाचरी सुतारा जाता] ५ अस्मिन् भरतक्षेत्रे विजयार्द्धदक्षिणश्रेण्यां रथनूपुरचक्रवालपुरे ६ ज्योति प्रभा ।

ही आर्य जोडपीं परस्परांवर फार प्रेम करीत श्रीषेणाचा जीव श्रीनिलयविमानात श्रीप्रभनामक देव झाला व सिंहनंदिता विद्युत्प्रभानामक देवी झाली अनिंदितेचा जीव विमलप्रभानामक विमानात देव झाला व सत्यभामेचा जीव सुतारादेवी झाली चक्र वालरथनूपुरचा राजा ज्वलनजटी विद्याधर व राणी वायुवेगा याना स्वयंप्रभानामक पुत्री झाली सुरम्यदेशातील पोदनपुरचा राजा प्रजापति व राणी मृगावती याच्या उदरीं त्रिपृष्ट जन्मला याला स्वयंप्रभा दिली

त्रिपृष्टविष्णुर्मर्त्येऽस्य स्वयम्प्रभावृतस्सुखम् ।
सुतारा तत्स्वसौ श्यालीभूत श्रीविजयार्कयम् ॥ ७ ॥

पोदनपुरच्या प्रजापती राजास भद्राराणी पासून विजय जन्मला त्रिपृष्ट विष्णूला स्वयंप्रभेपासुन ज्योतिप्रभा नामक मुलगी झाली व विजयभद्र आणि श्रीविजयनामक दोन मुलगे झाले. स्वयंप्रभेला अर्ककीर्तिनामक भाऊ होता त्याची पत्नी ज्योतिर्माला, त्याना अमिततेज नामक पुत्र व सुतारानामक पुत्री झाली ज्योतिःप्रभा अमिततेजाला देण्यात आली व सुतारा श्रीविजयाला देण्यात आली.

तां हृतां प्राग्भवप्रेम्णाऽशनिघोषखगेशिना ।
प्रत्यानीयार्ह्वादेऽसयम विजयार्हत ॥ ८ ॥

१ अत्र भूमौ पित्रा सहागत्य २ सुख यथा भवति ३ अमिततेजसा भगिनी ४ विमलप्रभचर ५ सुतारा ६ संग्राम विधाय ७ गृहीत्वा ।

चमरचंचापुरचा राजा इंद्राशनि व राणी आसुरिका यांच्या पोटीं अशनिघोषनामक विद्याधर पुत्र जन्मला. त्यानें सुतारेला पाहून ताच तो मोहित होऊन तिला पळवून नेली. एक मायामृग निर्माण करून त्याच्या मागें त्यानें श्रीविजयला लावलें होतें वैतालीनामक विद्येला सुतारेचें खोटें रूप देऊन बसविलें होतें. श्रीविजय शिकार रीहून परत आल्याबरोबर साप चावल्याचें ढोंग करून वैताली मरून पडली सुताराच मेला असें मानून श्रीविजय शोक करीत होता इतक्यांत एका विद्याधरानें अशनिघोषाशीं लढून तिला आणून पोहोंचविली. विजय अरिहंताजवळ अशनिघोषानें दीक्षा घेतली. अमिततेज श्रीविजयाच्या मदतीस आला यानेंहि देशसंयम स्वीकारला

सं गृहीत्वा चिरं तप्त्वा मासायुःप्रार्यतो मृत ।
कृत्वाष्टाह्नमह सर्ल्येयामानतेऽभूत्रिदोनिनौ ॥ ९ ॥

देशसंयम घेऊन यानीं अष्टान्हिक पूजा केली एकम हिना आयुष्य उरलें असता यानें नंदनमुनीजवळ दीक्षा घेतली व अमिततेज तेराव्या आनत स्वर्गांत नद्यावर्त विमानात मणिचूल नामक देव झाला आणि श्रीविजयहि त्याच स्वर्गांत स्वस्तिक विमानात मणिचूलनामक देव झाला.

ततोऽत्र वत्सकावत्या प्रभाकर्या बलाच्युतौ ।
स्त स्मापराजितानन्तवीर्यौ स्तैमितसागरौ ॥ १० ॥

१ अमिततेजा २ सन्यासात् ३ अष्टान्हिक कृत्वा द्वाविंशतिदिन सन्यासेन ४ श्रीविजयेन सह ५ अमरगुरुमुनितो विश्वनंदिभवादित त्रिपृष्टस्य श्रुत्वा कृतविष्णुलक्ष्मीनिदानेन ६ स्तिमितसागरनृपपुत्रौ

जम्बुद्वीपांत पूर्वविदेहक्षेत्रात वत्सकावती देशातील प्रभाकरी नगरींत राजा स्तिमितसागर व राणी वसुंधरा यांच्या पोटीं रविचूलदेव अपराजित नामें करून जन्मला व त्याच राजाच्या वसुमती राणीस मणिचूलदेव अनंतवीर्य नावानें जन्मला.

सिद्धविद्यौ नर्तकीप्सुं दमितार्यर्द्धचक्रिणम् ।
हत्वा तत्र हरिर्भुक्त्वा महीं घर्मांऽहसोऽजनि ॥११॥

हे दोघे भाऊ परस्परावर प्रेम करीत राज्य करीत. बर्बरी व चिलातिका या दोन नर्तिकाचें नृत्य त्याना फार आवडे शिवमंदिर नगराचा राजा दमितारि याला त्या नर्तकीचा मोह पडला, त्यानें त्या मागविल्या. पण वरील दोघा भावानीं त्याना पाठविलें नाहीं व स्वत च विद्यादेवीच्या साहाय्यानें त्या नर्तकींचा वेष घेऊन गेले व राजाला संतुष्ट केलें. या वेषधारी दोन नर्तकी जवळ राजकन्या कनकश्रीला नर्तन शिकण्यास ठेवलें. तेव्हा हे दोघे भाऊ तिला पळवून घेऊन गेले. दमितारीलि सर्व प्रकार कळल्यावर तो प्रभाकरी नगरीवर चाल करून गेला अपराजित व दमितारीची लढाई जुंपली. अनंतवीर्यानें त्याला ठार मारलें. अनंतवीर्यनारायण मरून रत्नप्रभा नामक पहिल्या नरकात गेला.

रामोऽच्युतेन्द्रस्तपसा ततोऽहीन्द्रभुवा दृशौ ।
खगेट्भूतं तपः प्राप्यं तं निन्ये स प्रतीन्द्रताम् ॥१२॥

१ पालेन धर्माला जात २ अजनि ३ उत्पन्न सम्यक्त्वेन ४ अनंतं वीर्यवर ५ अच्युतेंद्र ।

त्यामुळें अपराजित बलदेवास फार दुःख झालें. त्यानें यशोधर मुनीजवळ दीक्षा घेतली. अवधिज्ञान उत्पन्न झाल्यावर एक महिनाभर अनशनव्रत आचरून तो अच्युतस्वर्गांत इंद्र झाला. स्तिमितसागर मेल्यावर धरणेंद्र झाला होता. त्यानें अनंतवीर्याच्या जीवास बोध केल्यावर पहिल्या नरकांतून निघून तो मेघनाद विद्याधर झाला. पुढें मुनि बनून मेल्यानंतर अच्युतस्वर्गांत प्रतींद्र झाला.

च्युत्वेन्द्रो मङ्गलावत्या चक्री वज्रायुधोऽभवत् ।
युवराजोऽन्यः सहस्रायुध क्षेमङ्करीपतेः ॥ १३ ॥

अपराजिताचा जीव स्वर्गांतून याच द्वीपांत मंगलावती देशांतील रत्नसंचयपुरचा राजा क्षेमंकर व राणी कनकचित्रा यांच्या पोटीं वज्रायुध नांवानें जन्मला. अनंतवीर्याचा जीवहि स्वर्गांतून येऊन त्याच राजाला लक्ष्मीमती राणी पासून सहस्रायुधनांवें करून झाला.

शुद्धदृक्सांवधिश्चक्री तपसापाहमिन्द्रताम् ।
सानुज पुष्कलावत्यामथासौ पुण्डरीकिणीद् ॥ १४ ॥

सम्यग्दर्शन प्राप्त करून घेऊन वज्रायुधानें क्षेमंकर अरिहंता

१ प्रतीन्द्र २ ईशानेंद्रस्तुत दर्शनविशुद्धिस्तच्छ्रवणादायातेन कृतवादेन विचित्रभूतदेवेन पूजितस्तथा विद्युद्दंष्ट्रखेचरखेटकृतोपसर्गे भुक्त्वा प्राप्तचक्रश्रीरच्च अनुगाम्यवधियुत । ३ उपरिमग्रैवेयकाधोविमाने सौमनसाख्ये ।

जवळ जाऊन भावामुलासह दीक्षा घेतली व ते दोघे ऊर्ध्वग्रैवेयक स्वर्गातील सौमनस नामक विमानात अहमिंद्र झाले. पुष्कलावती देशातील पुंडरीकिणी नगरीत राजा घनरथ व राणी मनोहरा याच्या पोटीं वज्रायुध अहमिंद्र मेघरथ नामें करून जन्मला.

जज्ञे घनरथान्मेघरथो दृढरथोऽपरः ।
भवोध्य कुक्कुटौ गृध्रकपोतौ चाप्य वन्यताम् ॥१५॥

अहमिंद्र सहस्रायुधहि राजा घनरथालाच मनोरमा राणीपासून दृढरथ नामेंकरून झाला. दोन कोंबड्याची झुंज दोन दासींनीं लावली व कोंबडे मेले त्याची भवावली मेघरथानें अशी सांगितली. हे दोन कोंबडे भद्र व धन्य नामक सख्खे भाऊ होते. आपापसात लढून मेल्यावर श्वेतवर्ण व नामकर्ण नामक हत्ती झाले. तेथें परस्पर लढून मेल्यावर ते जीव अयोध्याच्या गवळ्याचे घरीं रेडे झाले. तेथें झुंज खेळून मेल्यावर दोन मेंढे झाले व टक्कर खेळून मेले आणि या भवात कोंबडे झाले. मेघरथाच्या आश्रयास एकदा एक कबूतर आलें व पाठोपाठ गृध्रपक्षीहि आला व आपण क्षुत्पीडित असल्यामुळे कबूतर खाण्यास द्या म्हणाला. तेव्हा त्या दोघाची भवावली त्याने सांगितली. पूर्वभवात हे दोघे धनमित्र व नंदिषेण नामक वाणी होते व लढून मेले आणि गृध्रकपोत झाले. गृध्रकपोत मेल्यावर अनुक्रमें सुरूप व अतिरूप नामक व्यंतर देव झाले.

१ घनरथाख्यस्तीर्थंकर पुत्र २ द्वितीय ।

दत्तीज्यात्रतशीलाप्तपुण्यार्देपिस्तप श्रित' ।
पितुस्तीर्थकृतो बद्धतीर्थकृत्व.सहानुज ॥ १६ ॥

मुनीना आहारदान, उपवास, तीर्थकरपूजन वगैरे व्रतें आचरून मेघरथानें घनरथाजवळ दीक्षा घेतल्री एकादशागाचें अध्ययन करून त्याने तीर्थकरनामकर्म बाधलें दृढरथानेंहि दीक्षा घेतली

सर्वार्थसिद्धौ प्राप्त श भुक्त्वास्मिन् विश्वसनतुक् ।
काम. शान्तिरभूच्चक्री तीर्थकृच्चानुजानुजः ॥ १७ ॥

कुरुजागलदेशातील हस्तिनापुरात राजा अजितसेन व राणी प्रियदर्शना याच्या पोटीं जन्मलेला विश्वसेन नामें करून राजा राज्य करीत होता गधारदेशात गधार नगरचा राजा अजितजय व राणी अजिता याची मुलगी ऐरा विश्वसेनास दण्यात आली याच्या पोटीं मेघरथ स्वर्गांतून येऊन शातिनाथ तीर्थकर जन्मले दृढरथ चक्रायुद्ध होऊन जन्मला

चक्रायुधा गणेशर्थ जात्वीश स्व विभूपयन् ।
दृष्ट्वादर्शे निजच्छायाद्वयमुद्भूतबोधिक ॥ १८ ॥

अनिन्दिताराणी, विमलप्रभदेव श्रीविजय, देव, अनतवीर्य नारायण, नारकी मेघनाद, प्रतींद्र सहस्रायुध अहमिंद्र दृढरथ, अहमिंद्र इतक्या भवातून आलेल्या तो दृढरथाचा जीव चक्रायुध

१ पुण्येन प्राप्य राजर्षिजात २ पुत्र ऐरागर्भे ३ प्रथमनुज इदानीमपि अनुजश्चक्रायुध ४ भाविनि भूतवदुपचार ।

नगरीत राजा सिंहरथ राज्य करीत होता. एकदा दिवसा झालेला उल्कापात पाहून त्याला वैराग्य प्राप्त झालें व वृषभमुनींच्या जवळ दीक्षा घेऊन त्यानें तप आचरिलें. षोडश भावनाचें चिंतन करून त्यानें तीर्थंकरनामकर्म बांधलें.

यद्धतीर्थकरत्वोऽगादन्त्यौं दिवमतःसुतैः ।
यो भूत्वा सूरसेनस्य कुरुराजस्य हस्तिने ॥२॥

शेवटीं समाधिमरण साधून तो सर्वार्थसिद्धि विमानात अहमिंद्र झाला. तेथून कुरुजांगल देशातील हस्तिनापुरचा राजा सूरसेन व राणी श्रीकांता याच्या पोटीं तो कुंथुनाथ नामेंकरून जन्मला.

प्राप्य चक्रिश्रियं जातु रन्त्वागच्छन्वनान्मुनिम् ।
दृष्ट्वा तप स्थं भुक्त्वेन्द्रश्चक्रित्वे एष मोक्ष्यते॥ ३ ॥

त्याला चक्रवर्तित्व प्राप्त झालें. एकदा तो मत्र्यासह वनक्रीडा करून येत असता त्यानें एक तपस्वी पाहिला. असें तप केलें असता चक्रवर्तीचें वैभव प्राप्त होतें व मोक्षहि मिळतो असें कुंथुनाथानें सांगितलें.

इत्येव मन्त्रिणा पृष्टो दृष्टपूर्वभवस्तपः ।
कृत्वार्हन्त्यं गतश्चक्रे तीर्थं कन्थुं नमामि तम् ॥ ४ ॥

मंत्र्यानें विचारलेल्या प्रश्नास वरील उत्तर देऊन कुंथुनाथाना पूर्वभवातून केलेल्या तपश्चर्येचें स्मरण झालें. नंतर दीक्षा घेऊन त्यानीं

१ सर्वार्थसिद्धि २ श्रीकांतागर्भे ३ कश्चिदातपयोगस्थ ४ चेत्कदाचि दस्मिन्भवे न मोक्ष्यते तर्हि इन्द्रचक्रित्वे भुक्त्वा मोक्षं यास्यति ।

तप आचरून केवलज्ञान मिळविलें व धर्मतीर्थ सुरू करून मोक्षा-ला गेले त्या कुंथुनाथाना मी नमस्कार करतो.

इति श्रीकुन्थुनाथस्य सप्तदशम् ॥ १७ ॥

कच्छाक्षेमपुरे तद्वेयोऽभूद्धनपतिर्नृपः ।
नन्दतीर्थकरात्तप्तसंयमोर्जिततीर्थकृत् ॥ १ ॥

कच्छ देशातील क्षेमपुरात धनपतिनामक राजा राज्य करीत होता. त्यानें नंदतीर्थंकराची बोधवाणी ऐकून दीक्षा घेतली व तप-श्चरण करून तीर्थंकर नामकर्म बांधलें.

गत्वा जयन्तमागत्य हस्तिनेशात्सुदर्शनात् ।
मार्मिजन्मात्रचक्रश्रीः शरन्मेघक्षयेक्षणात् ॥ २ ॥

तेथून तो जयंत नामक विमानांत अहमिंद्र झाला व पुढें हस्तिनापुरचा राजा सुदर्शन व राणी मित्रसेना याच्या पोटीं जन्मला. अरनाथाना चक्रवर्तीपद प्राप्त झालें पुष्कळ वर्षे ऐश्वर्य भोगल्यावर त्याना शरदृतूतील ढग एकदम निल्याला गेलेले पाहून वैराग्य उत्पन्न झालें.

आदाय संयमं लब्ध्वा केवलं धर्मदेशनात् ।
विश्वमुद्धृत्य यःसिद्धः स्मरामि तमरं प्रभुम् ॥ ३ ॥

दीक्षा घेतल्यावर त्याना केवलज्ञान प्राप्त झालें धर्मतीर्थ प्रव-

१ जंबूद्वीपस्थ विदेहे २ ऊर्जित पाठ ऊर्जितमुपार्जित ३ मित्रसेनागर्भे ४ चक्रश्रीर्यस्य स प्राप्तजन्मा ।

र्तिन करून त्यांनीं भव्यजीवाचा उद्धार केला व मोक्षपद मिळविलें त्या अरनाथाचें मी स्मरण करतों

भूपालाख्यो नृपोऽत्रासीज्जितो युद्धेऽरिभिस्तपः ।
सम्भूतान्ते स कृत्वागान्महाशुक्रं निदानवान् ॥८॥

याच भरतक्षेत्रांत भूपाळ नामक राजा होता एका युद्धात त्याचा पराजय झाल्यामुळे खिन्न होऊन त्याने संभूतमुनीजवळ दीक्षा घेतली व खूप तपश्चर्या करून त्यानें निदान केलें कीं आपणाला चक्रवर्तिपद प्राप्त व्हावें. समाधिमरण साधल्यानंतर तो महाशुक्र नामक दहाव्या स्वर्गांत देव झाला

सहस्रबाहुरिक्ष्वाकुः साकेते ऽजनि तत्प्रिया ।
जाता चित्रमति कन्याकुब्जराट्पारतात्मजा ॥९॥

कौशल देशातील अयोध्यानगरींत इक्ष्वाकु वंशाचा सहस्रबाहु राजा राज्य करीत होता त्याच्या राणीचें नाव चित्रमति ती कुब्ज देशाच्या पारत नामक राजाची मुलगी होती

तत्पुत्रं कृतवीरश्च तापसस्तत्पितृव्यज ।
जमदग्निर्दृढग्राहिहरिशर्मचरामरौ ॥ ६ ॥

त्यांना कृतवीर नामक पुत्र झाला राजा सहस्रबाहूचा काका शतबिंदु यांना पारत राजाची बहिण श्रीमती दिली होती.

१ एकीभूतबहुशत्रुभि २ भूयासं चक्रित्वमिति ३ पारतनृपस्य पुत्री चित्रमति ४ सहस्रबाहुनृपस्य ५ सहस्रबाहो पितृव्य शतबिंदुस्तस्य भार्या श्रीमती सा पारतस्य भगिनी तस्या श्रीमत्या पुत्र जमदग्नि

त्याना जमदग्नि नावाचा पुत्र झाला बालपणींच त्याची आई मेल्या-
वर त्यानें दीक्षा घेतली व तपश्चरण केलें दृढग्राहा राजा व हरि
शर्मा या नावाचा ब्राम्हण हे दोघे मित्र होते

अपुत्रस्य गतिर्नास्तीत्यापेच्या कीचकाकृती ।
परिणायितवन्तो त रेणुकीं पारताह्गजाम् ॥७॥

दृढग्राहानें निनदीक्षा घतली हरिशर्मा तपस्वी होऊन मेल्या
नतर ज्योतिषी देव झाला तपस्याचें तप अशुद्ध असतें व जैन
मुनींचेंच तप खरें ही गोष्ट नोतिषदेवाला दाखवून देण्यासाठी
सौधर्मदेवानें दोघानाही चिमणीचें रूप देऊन जमदग्नीच्या दाढी
मिशात नाऊन वास्तव्य केलें निपुत्रिकाला शुभगति नाहीं
असें त्या चिमण्या आपसात बोलू लागल्या तें ऐकून जमदग्नि
तपश्चर्या सोडून कन्याकुब्ज देशाच्या राजाकडे गेला तो
राजा त्याचा मामा होता त्याला आपली लग्न करण्याची
इच्छा जमदग्नीनें सांगितली पण कान्यकुब्ज देशाच्या राजानें
त्याचा धि कार केला तरी पण आपली मुलगी रेणुका त्याला दिली.
हा प्रकार पाहून चिमणीरूपी ज्योतिषदेवाची खात्री झाली कीं तप
स्यांचें तप अशुद्ध असतें.

सा कामधेनुपरशू स्वाग्रजारिंजयान्मुनेः ।
स्वाकृताणुव्रता लभ ज्ञात्वा यातं स्वमाश्रमम् ॥ ८ ॥

१ द्वौ जमदग्नि पाणिग्राहितवन्तौ २ पुराणेषु ३ आमर्यादाया पशिवि
शेषमिथुनभूतौ ४ चित्रगतिभगिनी। ५ हे विन्ये लभ ६ आगत ।

रेणुकेचा भाऊ अरिंजयमुनि एकदा तिला भेटावयास आला असता तिनें त्याच्यापासून सम्यग्दर्शनासह अणुव्रतें प्राप्त करून घेतली. जाताना त्यानें कामधेनु व परशु भेट देऊन तो स्वस्थानीं परत गेला.

राजा सनाभिःसम्नुतो भोजितो जमदग्निना ।
तं हृत्वा कामधेनुं तां लात्वायातः फलादिकं ॥९॥

एकदा सहस्रबाहुराजा आपले भाऊबंद व कृतवीर नामक मुलासह जमदग्नीच्या आश्रमास आला असता राजाबरोबर्यातहि दुर्मिळ असे त्याचें आदरातिथ्य करण्यात आले कामधेनूमुळें तो तें करू शकला. राजानें ती कामधेनू मागितली. जमदग्नि देईना ह्मणून त्याला ठार मारून ती घेऊन गेला

आहृत्यायानिन्द्रराम सानुजस्तत्सुतें क्रुधा ।
हत्वा निःसप्तकृत्वान्याक्षत्रियांश्चाभुनग्भुवम् ॥१०॥

जमदग्नीचा इंद्रराम व श्वेतराम असे दोन पुत्र होते. ते फळें गोळा करण्यास गेले होते. परत आल्यावर तें दृश्य पाहून ते रागावले. ते दोघे अयोध्येत जाऊन सहस्रबाहु व कृतवीराशीं लढले आणि सहस्रबाहूस ठार मारून कामधेनु परत घेऊन आले. नंतर त्यांनीं रागानें एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली व स्वतः पृथ्वीचें राज्य भोगलें

१ सहस्रबाहु २ गत ३ आहृत्य ग्रहीत्वा ४ जमदग्निपुत्र ५ पालयामास ।

हृत्वा तद्विधुरे चित्रमतिं माग्देवगर्भिणीम् ।
शाण्डिल्यस्तापसोऽन्यस्य सुबन्धुमुनिसन्निधौ ॥ ११ ॥

भूपाळ राजाचा जीव महापुत्र नामक दहाव्या स्वर्गांत होता तो सहस्रबाहूची राणी चित्रमती इच्या पोटांत होता. चित्रमतीचा भाऊ शाडिल्य नामक तपस्व्याला ही गोष्ट कळताच त्यानें तिला सुबंधु मुनीजवळ नेऊन ठेविली.

तदग्रजः सारयितु जगाम स्वमठं तदा ।
वनदेवीभिराशल्यात्रात सुतमसूत सा ॥ १२ ॥

आपल्या मठाचें रक्षण करण्यासाठीं शाडिल्य परत निघून गेला. इकडे चित्रमति बाळंतीण झाली व वनदेवतांनीं तो पुत्र चक्रवर्ती होणार असल्यामुळे त्याचें रक्षण केलें.

षोडशाब्दे वयं भार्या चर्ग्रीद्द मत्पथ शृणु ।
साग्निचुल्लीगतस्थूलदिलोसघृतमपमान् ॥ १३ ॥
उष्णानपूपानादाय भक्षयिष्यत्ययं शिशुः ।
इति सोऽसान्त्वयेत्पृष्टो निर्ग्रन्थस्ता मुदुःखिताम् १४

सुबंधुमुनींना तिनें मुलाचें भविष्य विचारलें असतां ते म्हणाले कीं सोळावे वर्षीं हा चक्रवर्ती होणार आहे. याचें लक्षण हें

१ गर्भिणी २ सहस्रबाहुमरणदु:ख ३ भूपालचरमहाशुक्रामरण गर्भगत ४ सस्याप्य । ५ चित्रमतिज्येष्ठभ्राता शाडिल्य ६ स्वमठमभाण्डार-णार्थं ७ रक्षित ८ आश्विमासे ९ विवाहरचना १० कटाह ११ सुबन्धुमुनि १२ सान्त्वयामास ।

की, जळल्या चुलीवरील उकळते तूप असलेल्या कढईतून हातानें पुन्या काढून घेऊन तो तशाच कढत कढत खाईल. म्हणून निश्चित रहा. असें सांगून निर्ग्रंथ मुनीनें त्या दुःखित मातेचें सांत्वन केलें.

तत:प्रत्येत्य शाण्डिल्यस्तां नीत्वा समुता मठीम् ।
सुभौमनाम्ना शस्त्रस्तत्प्रयोगैश्चायुजत्सुतम् १५ ॥

नंतर शांडिल्यानें परत येऊन मुलासह आपल्या बहिणीला मठांत नेलें. त्याच नाव सुभौम ठेऊन शस्त्रांचें सप्रयोग शिक्षण त्याला देण्यास सुरवात केली

रामो यस्याश्रितोऽन्वर्स्थुःक्षनदन्ताःस ते रिपुः ।
जातो यतस्त्वेप्सुंहितो निमित्तज्ञेन निर्ममो ॥ १६ ॥

इकडे परशुरामाला निमित्तज्ञानें सांगितलें कीं तुम्ही मारलेल्या राजाचे दांत ज्याच्या प्रभावानें जेवत असतांना भातासारखे होतील तो तुमचा शत्रु समजा. तेव्हा आपलें हित इच्छिणाऱ्या परशुरामानें भोजनशाळा घातली.

स नहिरयोध्यायास्त परिव्राजकाकृतिम् ।
तत्राश्चन्त सं निश्चिन्त्य नर्थेत्रोच्चैतुमुग्रत ॥ १७ ॥

१ पश्चादागत्य २ शाभना मुनिपादरजसा भूमिरलंकृता जात इति सुभूमो भवेत् । ३ भोजन पूर्वंत यस्य पुंस ४ करमान्न भान्तु ५ त्वत्रिहतक्षत्रियदंता ६ आत्मनो हितवाञ्छक ७ निमित्तकुशलात्मेन रामो भणित ८ मत्र अग्रदानशाला निष्पादयामास ९ निदर्शयितिवे पथारिण १० स नागो न अभन् त तत्राभत ११ राम १२ मारयितु ।

अयोध्यानगरीच्या बाहेर त्याने घातलेल्या भोजनशाळेत एकदा परिव्राजकाच्या वेषात असलेला सुभौम आला व त्याने भात झाल्ले ते दात खाले नाहीत परशुरामाला हे वृत्त कळल्याबरोबर तो त्याला ठार मारण्यास उद्युक्त झाला

तत्कालसिद्धचक्रेण हतस्तेनेभवर्तिना ।
तपसा क्रीतचक्रिश्रीरसास्वादनलम्पट ॥ १८ ॥

त्यावेळ तेथें गधनारण हत्ती आला व चक्राहि निर्माण झाले त्या हत्तीवर बसून सुभौमाने त्या तपश्चर्येनें प्राप्त करून घेतलेल्या चक्रवर्ती पदाचें वैभव भोगण्यास चटावलेल्या परशुरामासह चक्रानें लढण्यास सुरवात केली व त्याला ठार मारले.

स सूपकारमन्येद्युर्दत्तवन्त सुदाम्लिकाम् ।
रसायनाख्यां तद्वैरिर्कोपितोऽघातयत्कुधीः ॥ १९ ॥

पुढे एकदा अमृतरसायन नामक आचाऱ्याने रसायन नावाची अम्लिका (एक भोज्य पदार्थ) सुभौमाला खाण्यास दिली असता स्वयपाक्याच्या शत्रूंनीं चिथविल्यामुळें रागाचे भरात त्याने त्यास ठार केले

इमं वध्यासमित्याचचल्योऽसौ पुण्यलेशतः ।
ज्योतिर्लोकेऽमरो वैरात्कुज्ञानी ज्योतिषोऽजनि॥२०॥

याला मी ठार मारीन असें निदान करून तो आचारी मेला व थोडें पुण्य बाकी असल्यामुळें ज्योतिर्लोकात ज्योतिष देव झाला.

१ स नासौकालस्तत्काल २ गधगजारूदन ३ नाम्नी ४ सूपकारशत्रु

दिव्यैःफलैःप्रवेश्याब्धि पोतेनामारयत्स्वयं ।
प्राग्जन्माकृतिमादर्श्य वैरं चोक्त्वाक्षिपत्सुने ॥२१॥

ज्योतिषदेव वैश्यरूपानें कांहीं दिवस दिव्य फळे पुढें सुभौमाळा आणून देऊं लागला. राजाला त्याची चटक लागली पण आतां तीं मिळणे शक्य नाहीं तरी तुम्ही मजबरोबर वनात चला ह्मणजे अधिक मिळतील. राजा फलाच्या आशेनें त्याचेवर विश्वास ठेवून निघाला जहाजातून जात असता आपलें पूर्वीचें आचार्याचें रूप देवानें दाखवून सुभौमाला ठार मारलें.

सुतौ रामौ जामदग्नी रौद्रध्यानादधोऽगमत् ।
सहस्रबाहुस्तत्पुत्रो लोभात्तिर्यग्गतिं गतौ ॥ २२ ॥

याप्रमाणें जमदग्नि मुनीचे मुलगे इंद्रराम व परशुराम रौद्रध्यानाने नरकांत पडले व सहस्रबाहु आपल्या पुत्रासह लोभकषायामुळें तिर्यंच गतींत जन्मले.

राजपुत्रास्तपोऽत्रैर्कथकाराशयेशल्यवान् ।
सुकेतोः प्राप्य सौधर्मं च्युतौ चक्रपुरेशिनः ॥ २३ ॥

सुकेतु राजाच्या आश्रयानें पुडलाकाचा जीव निदानपूर्वक तप आचरून सौधर्म नामक पहिल्या स्वर्गात देव झाला व तेथून तो भरतक्षेत्रात चक्रपुरच्या इक्ष्वाकुवंशाचा राजा वरसेन व राणी लक्ष्मीमती याच्या पोटीं पुंडलीक नावानें जन्मला.

१ परुषवचोभिस्तिरस्कुर्वन् २ जमदग्नेः पुत्र ३ कृतवीर ४ जंबूद्वीपभरत ५ चित्ते शल्यवान् ६ मित्रवर्मसुदर्शनचरौ ।

इक्ष्वाकोर्वीरसेनस्य तावभूतां सुताविह ।
नंदिषेणो बलः पूर्वं पुंडरीको हरिः परः ॥ २४ ॥
त्याच राजाच्या वैजयंती राणीपासून नंदिषेण बलदेव जन्मला व पुंडरीक वासुदेव होता.

पद्मावतीमिन्द्रपुराधीश्वरोपेंद्रसेनजाम् ।
तेमूढवन्तमारेण्यं सुकेतुर्निचक्रभृत् ॥ २५ ॥
इंद्रपुरचा राजा उपेंद्रसेन याने आपली मुलगी पद्मावती पुंडरीकाला दिली. या लग्नाचें वृत्त ऐकून सुकेतूचा नातू जो निशुंभ नामें चक्रपुरचा राजा झाला होता, फार संतापला.

निशुम्भारयः क्रुधा युध्यन्हतस्तेनापि साङ्गिपर्न ।
हरिस्तमःप्रभां राम:शिरघांपाच्छिर्वं गतः ॥ २६ ॥
तो पुंडरीकाशी लढण्यास गेला व त्याच्याकडून मारला जाऊन तम प्रभा नरकास गेला. पुष्कळ वर्षे राज्यैश्वर्य भोगून पुंडरीकही त्याच नरकात गेला. त्याच्या वियोगामुळे नंदिषेणाला वैराग्य प्राप्त झाले, तो दीक्षा घेऊन तपश्चरण केल्यानंतर मोक्षाला गेला.

इति श्रीअरनाथसुभौमचक्रिनन्दिषेणबलपुंडरीकविष्णुनच्छत्रुनिशुम्भवृत्तोत्तरमष्टादशम् ॥ १८ ॥

प्राङ्मेरौ कच्छकावत्यां वीतशोकपुरेऽधिराट् ।
योऽन्न वैश्रवणो जज्ञे स सुगुप्तगुरोर्गिरा ॥ १ ॥

१ पुंडरीक २ परिणीतवन्त ३ अर्धचक्री चक्रपुरेशोपकश्च ४ युद्धं कुर्वन् सन् ५ पुंडरीकेण ६ सन् ७ षष्ठनरकं गत ८ जम्बूद्वीपपूर्वमंदरस्य ।

जम्बूद्वीपात मेरुपर्वताच्या पूर्वेस कच्छकावती देशांतील वीतशोकपुरात वैश्रवणनामक राजा राज्य करीत होता सुगुप्ताचार्यांकडून त्याने अणुव्रतें घेतलीं होतीं.

उपात्ताणुव्रतोऽभ्यस्तरत्नत्रयविधानक ।
जातु वर्षागमे द्रष्टु वनश्रेणीं व्रजन्वटम् ॥ २ ॥

तो रत्नत्रयव्रतधारी होता एकदा पावसाळ्याचे प्रारम्भी वन शोभा पाहण्यास तो गेला असता त्यानें एक वटवृक्ष पाहिला

पृथदरोन्नतं दृष्ट्वा नानापक्षिकुलाकुलम् ।
प्रशस्याग्रवन गत्वा रुत्यागच्छन्निरीक्ष्य तम् ॥ ३ ॥

त्यावटवृक्षाचा बुन्धाच विस्तीर्ण पाया होता व बुधा फार मोठा होता त्यावर अनेक जातींच्या पक्ष्याच थवे होते वनशोभा पहात तसाच तो पुढे गेला. परततांना त्यानें ते वटवृक्ष पुन्हा पाहिला.

विद्युता भस्मितं प्राज्ञनराग्योऽनुचरंस्तप ।
श्रीनागयतिसान्निध्य तीर्थकृत्त्वमुपार्ज्य च ॥ ४ ॥

त्यावर वीज पडून तो छिन्नविच्छिन्न झाला. त्यामुळ त्याला वैराग्य झाले त्यानें श्रीनागमुनीपाशी दीक्षा घेउन तपश्चरण केलें व तीर्थंकर नाम कर्म बांधलें

६ उपात्त सुगुप्ताचार्याचा गृहीत अणुव्रत येन । ७ वनूह स्थान ।

माप्तोऽपराजित तस्माच्च्युतोऽत्रे मिथिलापते ।
वैङ्गो कुम्भस्य पैत्रोऽभूदिक्ष्वाको॰ स्वेंश्ग्रह ॥ ५ ॥

समाधिमरण साधल्यानतर तो अपराजित नामक अनुत्तर विमानात अहमिंद्र झाला पुढें याच भरतखडात वगदेशात मिथिला नगरीचा इक्ष्वाकुगोत्राचा राजा कुभ व राणी प्रजावती याच्या पोटीं मल्लिनाथ नामें करून तो जन्मला

पुरापशाभा दृष्ट्वासौ श्रिय स्मृत्वापराजिताम् ।
विरक्तस्तपसार्हन्त्य प्राप्ता मल्लि पुनातु न ॥ ६ ॥

आपल्या लग्नासाठीं शृंगारलेल नगर पाहून व अपराजित स्वर्गीतील वैभव आठवून मल्लिनाथाना वैराग्य उत्पन्न झालें व दीक्षा घेऊन धर्मतीर्थ प्रवर्तित करण्यास यानीं अर्हत्पद मिळविलें ते मल्लिनाथ तीर्थंकर आमचे रक्षण करोत

श्रीपुरऽभूत्सुकच्छाया प्रजापालोऽत्र साश्रित ।
उल्कापाताच्छिवगुप्त तपो भुक्त्वाच्युतेन्द्रताम् ॥७॥

याच जबूद्वीपात सुकच्छा देशातील श्रीपुरचा प्रजापाल नामक राजा होता एकदा उल्कापात पाहून त्याला वैराग्य उत्पन्न झालें शिवगुप्त जिनराजाजवळ त्यानें दीक्षा घेतली व बरीच तपश्चर्या करून तो अच्युत स्वर्गांत देव झाला

१ भारते २ वगदेश ३ प्रजावतीगर्भे ४ त्रिभुवनराजक ररय विवाहे सति । ५ दृष्ट्वा ६ शिवगुप्ताचार्येण प्राप्त दैवगुप्त

काशीशे पद्मनाभस्य पुत्रोऽस्यं तृतीयेऽजनि ।
चक्री पद्मोऽर्द्धविलयान्सयमेच्छुः सुकेतुना ॥ ८ ॥

तेथून तिसरा जन्म त्यानं काशीचा राजा पद्मनाभाचे पोटीं पद्म नावानें घेतला तो चक्रवर्ती झाला पुष्कळवर्षे राज्यवैभव भोगल्या वर एकदा आलेले ढग एकाएकीं नाहींसे झालेले पाहून त्याला वैरा ग्य उत्पन्न झालें तेव्हा सुकेतुन त्याला पुष्कळ नास्तिक विचार सांगून पराङ्मुत्त करण्याचा प्रयत्न केला

तुल्वृद्धेन चार्वाकमतनाशक मनोज्य तम् ।
सुकेत्वादिनृपैं सर्वा तपस्तेपे शिवोऽभवत् ॥ ९ ॥

पण पद्म चक्रवर्तीनं चार्वाकादि नास्तिक मतांचें खडन करून समाधिगुप्त नामक मुनिराजाजवळ सुकेतु यरे राजासह दीक्षा घेतली आणि तो बराच तपश्चर्या करून मुक्त झाला

वीरोऽयोध्याधिपाऽमात्याद्विरम्यैतत्सुताविमौ ।
श्रीयोग्याविति ता त्यक्त्वा स्नेहेन स्वानुजाय स॰ १०

अयोध्येच्या राजास दोन पुत्र होते पण त्यांच्यावर राजाचे प्रेम नसल्यामुळें त्यानं आपल्या भावाला युवराजपदावर बसविलें

यौवराज्यपदं मादात्ततस्तौ कुपितौ भृशम् ।
मन्त्रिणानेन तत्रारा निषिद्धावित्यत श्रितौ ॥ ११ ॥

१ कार्यान्तरस्य २ भवे ३ मत ४ चार्वाकमतत्यागानंतर सह ५ सिद्धा मुक्तमाभवत् ६ पितुनाम्न ।

शिवगुप्ताद्धमतीर्थे तप सौधर्ममापतु ।
तत्राद्योऽग्निशिखस्त्वीराकाशशोऽभूत्सुतो बलः ॥१२॥
हे कृत्य आमात्याचेंच आहे अशी राजपुत्राची ठाम समजूत होऊन त्यानीं त्याच्याशीं वैर बांधलें. पुढें त्यानी शिवगुप्त मुनिजवळ दीक्षा घेऊन तपश्चरण केले आणि समाधिमरण साधून सौधर्म स्वर्गांत सुविशाल नावाच्या विमानात देव झाले. तेथून काशीचा राजा अग्निशिखाला अपराजिताराणी पासून एक व केशवनी राणी पासून एक असे दोन पुत्र झाले.

नंदिमित्रो हरिर्दत्त श्चान्त्योऽन्यो मंदिरं पुरं ।
मंत्री स्वेद्रो बलेन्द्राख्य सोऽभूत्क्षीरोदसंज्ञकम् १३
नदमित्र बलदेव झाला व दत्त वासुदेव झाला. आमात्याचा जीव विजयार्ध पर्वतावर मदर नामक नगराचा बलींद्रनामक राजा झाला.

याचमानो गजं लब्धमहाविंयन मातुर्लात् ।
दत्तनागाद्धत सोऽ न्त्यं श्वभ्रं सारिर्दलोऽन्युतिम्
नदिमित्राजवळ क्षीरोद नावाचा हत्ती होता. तो बलींद्राने मागितला. तुमच्या दोन मुली आम्हाला द्याल तर हत्ती देण्याचे पाहू असें उत्तर त्यानीं पाठविल्यामुळे बलींद्र रागावला व तो लढण्यास आला. दत्त वासुदेवाची आई केशवनी राणीचा भाऊ केसरी

१ श्रीधर्मनाथमतान २ आगामावनाम्नो नृपस्य। ३ जिनमन्दिर ४ दक्षिणश्रेणीपुरनामपुराधिपाद् ५ मुनि ।

[1]विक्रम नावाचा सुरकांता नगरीचा राजा होता. या मामापासून सिंहवाहिनी व गरुडवाहिनी या दोन विद्या त्यांना मिळाल्या व याचे जोरावर दत्तानें त्या नरेंद्रास ठार मारलें नंतर दत्तहि मेला व तो सातव्या नरकांत गेला. त्यामुळे विन होऊन नंदिमित्रानेंहि संभूत भगवानाजवळ दीक्षा घेतली व तपश्चरण करून मोक्षास गेला.

इति श्रीमल्लिनाथतीर्थकरपद्मचक्र नंदिमित्ररामदत्ताख्यकेशवतच्छत्रुबलींद्रचरित्रावसानमेकोनविंशम् १९.

हरिवर्मात्र चम्पेश सर्वज्ञानन्तवीर्यतः ।
तत्त्वं श्रुत्वास्तसङ्गोऽभूत्प्राणतेन्द्रोऽन्त्यनामयुक्॥१॥

अंगदेशांतील चंपापुरीत हरिवर्मा नावाचा राजा होता. अनंतवीर्य मुनिराजापासून धर्म ऐकून त्यानें दीक्षा घेतली. षोडशभावनांचें चिंतन करून त्यानें तीर्थकर नामकर्म बांधलें समाधिमरण साधल्यानंतर तो प्राणत नामक चौदाव्या स्वर्गांत इंद्र झाला.

हरिवंशे सुमित्रस्य पुत्रो राजगृहेशिनः ।
स भूत्वा क्ष्माभयन्नागगर्जितात्स वनस्मृतेः ॥ २ ॥

राजगृह नगरींत हरिवंशाचा राजा सुमित्र या नांवाचा होता. त्याच्या पट्टराणीचें नाव सोमा तिच्या पोटीं मुनिसुव्रतनाथ जन्मास आले. एकदा मेघाचा गडगडाट सुरू झाला तेव्हां जंगलाचें स्मरण होऊन राजवाड्यातील हत्तीनें नागपिंडें सोडून दिले.

१ सोम गर्भे ॥

गजं ग्रासमगृण्हन्तं श्रावयित्वा पुराभवम् ।
आसीत्तालपुरेशस्त्वं नाम्ना नरपतिर्नृपः ॥ ३ ॥
कुधी कुपात्रदानेन जातो हस्ती वनं स्मरेः ।
न मागृत्तमिति प्राप्यं श्रावकत्वं विरक्तवान् ॥ ४ ॥

तें वृत्त एकून मुनिसुव्रतनाथ नीं पूर्वभवावळी सांगितली हे हत्ती तू तालपुरचा नरपति नामक राजा होतास कुपात्री दान दिल्यामुळें या जन्मीं गज झलास वनाचें स्मरण तुला होत आहे, पण पूर्वजन्म जाणित नाहींस तेव्हा आता श्रावकाची व्रतें घे. तेव्हा गजानें ती व्रतें घेतली.

प्रपद्य साम्यं कैवल्यं लब्ध्वा तीर्थं व्यधादसौ ।
मुनिसुव्रतनाथोनःसुव्रताय प्रसीदतात् ॥ ५ ॥

मुनिसुव्रतनाथानाहि हत्तीच्या व्रतग्रहणामुळें वैराग्य प्राप्त झाल्यावर बरेंच तपश्चरण केल्यावर त्याना केवलज्ञान झालें धर्मतीर्थ प्रवर्तित करून ते मोक्षाला गेले ते मुनिसुव्रतनाथ सुव्रतासाठीं आमच्या वर प्रसन्न होवोत

नराभिरामेऽनन्तार्हत्तीर्थ नरपुरेश्वरः ।
सनत्कुमार तपसा प्राप्य भोगपुर प्रभो ॥ ६ ॥

अनंतनाथ तीर्थंकराच्या वेळीं नररत्नगरीचा राजा असलेला जीव समाधिमरण साधून सनत्कुमार नामक तिसऱ्या स्वर्गात सुविशाल विमानात देव झाला तेथून भोगपुरचा राजा पद्मनाभ व राणी ऐरा यांच्या पोटीं तो जीव हरिषेण नावानें जन्मला

---

१ स्मरसि २ न स्मरसि ३ प्रार्थयित्वा ४ मनोहर ५ तृतीय स्वर्ग ॥

इक्ष्वाकोःपद्मनाभस्य हरिषेणोऽभवत्सुतः ।
तत्पितानन्तवीर्येशाद्यति सं श्रावकोऽप्यभूत् ॥ ७ ॥

अनन्तवीर्य भगवान् मनोहर उद्यानात आले असता त्य च्य जवळ पद्मनाभ राजानें दीक्षा घेतली व हरिषेणानें श्रावकव्रतें घेतली.

चक्रादीन्यसिधस्तस्य पितुःकेवलसम्भवे ।
त प्राच्यार्चितचक्रोऽसौ चिद्रत्नान्यापसप्त च॥ ८ ॥

पद्मनाभाला जेव्हा केवलज्ञान झाले तेव्हा हरिषेण चक्रवर्ती च्या आयुधशाळेत चक्र, छत्र, तलवार व दंड आणि कोठारात काकिणी, चर्म व मणि अशी एकदर सात अजीवरत्ने निर्माण झाली व सात सजीवरत्नेंहि प्राप्त झाली.

निधीन्नदीमुखोत्थाश्च गणबद्धामरार्पितान् ।
भुक्तश्रीजीर्त्वसौ राजा कृतनन्दीश्वरार्चनः ॥ ९ ॥

गणबद्ध नामक देव नदीच्या मुखातील नऊनिधि संपत्ति घेऊन आले या सर्व देणग्याचा स्वीकार करून चक्रवर्तीपदाचा उपभोग घेतला व नंदीश्वराचें पूजन करता झाला

अन्तेऽन्हु पोषित सौधतलस्थो ग्रहण विधो ।
दृष्ट्वात्तदीक्ष.श्रीनागात्तपसान्त्या दिव गतः॥

अनशन व्रत करून गच्चीवर बसला असता चद्रग्रहण पाहून पाहून त्याला वैराग्य उत्पन्न झालें. सीमित पर्वतावरील श्रीनागमुनि

१ वीतभून् २ हरिषेणचक्री ३ सर्वार्थसिद्धि ॥

जवळ दीक्षा घेऊन तपश्चरण केल्यावर तो सर्वार्थसिद्धि स्वर्गाला गेला.

जातौ दाशरथी रामलक्ष्मणौ बलकेशवौ ।
तद्वृत्तं बहुवक्तव्यमित्यतःपृथगुच्यते ॥ ११ ॥

दशरथ राजाला राम व लक्ष्मण नामक बळदेव व वासुदेव झाले. तें वृत्त फार मोठें आहे ह्मणून ते स्वतंत्रपणें सांगितलें जात आहे.

॥ अथ रामायणम् ॥

जातोऽत्रान्त्यतनौ रत्नपुरे राज्ञःप्रजापतेः।
तुक्चन्द्रचूलस्तन्मित्रं विजयाख्यश्च, मन्त्रितुक् ॥१२॥

याच भरत क्षेत्रांतील मलयदेशांत रत्नपुरचा प्रजापति व राणी गुणकांता यांना चंद्रचूल नामक मुलगा झाला. त्याचें प्रेम सचिवाच्या विजय नामक पुत्रावर फार होतें.

विवाह्यमानां कौबेरींश्रीदत्तेनौतिनायिनीम् ।
कुबेरदत्तां श्रुत्वासौ समित्रो लातुमैच्छतः ॥ १३ ॥

रत्नपुरच्या नगरशेट कुबेराने आपली मुलगी कुबेरदत्ता त्याच नगरांतील वैश्रवणशेठ व गौतमा याचा मुलगा श्रीदत्त याला देण्याचें ठरविलें. ती फार सुंदर असल्यामुळें तिला पळवून आणण्यासाठीं विजय नामक मित्रासह चंद्रचूल निघाला.

१ चरमशरीरस्य राज्ञः अंते भवा अत्यानिर्नुतस्य सः २ कुबेरस्य वणिक्पुत्री ३ गौतमावैश्रवण पुत्रेण ४ महापापिष्ठ स्वनुचरात् ५ स्वसात्कर्तुं ।

वणिक्पूत्कारतो राज्ञादिष्टेन पुररक्षिणा ।
जिघांसितः स्वयं हन्तुं तं जित्वा मन्त्रिणो नृपम् १४
वध्यावेवेति संरब्धं महाबलगणेशिना ।
संयमे लान्ततरतीरं तपस्यन्पुरुषोत्तमम् ॥ १५ ॥

सर्व वाण्यानीं राजाकडे तक्रार केल्यावर राजानें ग्रामरक्षकास त्या दोघा युवकाचा वध करण्याची आज्ञा दिली. पण ग्रामरक्षकाने त्याना जिंकून राजाकडे आणलें. प्रधानानें त्या दोघा युवकाना महाबल गणधराकडे नेलें. महाबलगणधराकडून ते दोघे मारले गेले अर्थात् त्याना दीक्षा दिली. दीक्षेनंतर ते खडतर तपश्चरण करू लागले.

जित्वा दिश स्वनगर विशन्तं वीक्ष्य केशवम् ।
ईदृग्भूयामितीद्धश्रीस्तृतीय कल्पमापिवान् ॥ १६ ॥

तेथील सोमप्रभ नामक राजाला सुदर्शना राणीपासून सुप्रभ व सीताराणीपासून पुरुषोत्तम असे पुत्र होते ते दोघे प्रतिनारायणाला मारून आले होते या केशव पुरुषोत्तमाला दिग्विजय करून येताना पाहून चंद्रचूलमुनीनें आपणहि असा व्हावे असे निदान बांधल मेल्यावर तो सनत्कुमारनामक स्वर्गात कनकप्रभ विमानात विजयनामकदेव झाला व विजय मुनि मेल्यावर त्याच स्वर्गातील मणिप्रभविमानात मणिचूलनामक देव झाला

१ इतु वाछित २ कुमार ३ मारितौ गणशिना ४ प्रयत्नादिष्ट यथा भवति तथा ५ सम्यग्यमभूमिं स्मशान पक्ष संयमभूमिं चारित्र प्रति ६ तप कुर्वन् चन्द्रचूल । ७ अनतजिनतीर्थे वीश्र ८ इद्ध श्रीयस्य ।

ततःकाश्यां सुबालाया देव्यां दशरथाद्वल ।
रामोऽभूद्विजयाकोऽन्यं केकय्यां लक्ष्मणो हरि ॥१७

पुढें काशी नगरीचा राजा दशरथ व राणी सुबाला याच्या पोटीं मंत्रिपुत्र विजयचा जीव रामनामें करून जन्मला. त्याच *राजाला केकयीराणीपासून राजपुत्राचा जीव लक्ष्मण नावानें झाला* राम बलदेव होता व लक्ष्मण वासुदेव

महाकालासुरीभूतस्तपसा मधुपिङ्गल ।
जज्ञेऽहन्सुलसांवरात्सामात्य सगरं द्विजैः ॥ १८ ॥

पूर्वी चक्रवर्ती हरिषेण तपानें सर्वार्थसिद्धिमध्यें जन्म्यानंतर हजार वर्षांनीं अयोध्यानगरींत सगर नामें राजा झाला. सुलसा देवीच्या स्वयंवरास तो गेला असता मधुपिंगल नामक एक सुंदर कुमार तेथें आला होता तेव्हा मत्सरग्रस्त होऊन त्याला त्यानें दूषित लक्षणाचा ठरवें होतें त्यामुळें चिडून मधुपिंगल स्वयंवरमंडपातून चालता झाला व त्यानें खट्टू होऊन दीक्षा घेतली मेल्यानंतर तो महाकाल नामक व्यंतर देव झाला तो सगराच्या वंशाचा अमात्यासह नाश करण्यास सज्ज झाला व्यंतरदेव ब्राह्मणाचा वेष करून सगराकडे येऊन म्हणाला तुझ्या शत्रूचा नाश व्हावा व राज्यलक्ष्मी वाढावी अशी तुझी इच्छा असेल तर तू यज्ञ कर मो[illegible] होऊन सगरानें यज्ञ केला व नरकांत पडला

१ तृतीय [illegible] २ चन्द्रचूल ३ द्विजरूपधारी महाकालासुर स्वयं ब्रह्मा भूत्वा परन[illegible] कृत्वा शत्रुच्छेदलक्ष्मानिमित्तयज्ञे हन्तिस्म ।

अस्मत्पुरी पुरेत्येत्य सतुग्दशरथोऽवसत् ।
आयोध्यां भरत देव्यां शत्रुघ्न चान्यजीजनत् ॥१९॥

राजानें काशी सोडून आपल्या वंशाच्या अयोध्येत वास्तव्य केलें त्याला एका राणीपासून भरत नामक पुत्र झाला व दुसऱ्या एका राणीपासून शत्रुघ्न झाला.

भारते धातकीखण्डे प्राचि सारसमुच्चये ।
देशे नाकपुरे राजा नरदेवो वृषंश्रुतेः ॥ २० ॥

धातकीखंडात भरतक्षेत्रातील सारसमुच्चय देशात नाकपुरचा राजा नरदेव नामक होता. त्यानें धर्मोपदेश ऐकून अनंत गणधराजवळ दीक्षा घेतली

प्रव्रज्योग्रं तपः कुर्वन्खगेट्चपलवेगतः ।
कृत्वा निदानं सौधर्मं गत्वाऽतोऽजनि रावण ॥२१॥

त्यानें उग्र तप केलें पण चपलवेग विद्याधराचा पाहून त्याचें वैभव आपणाला असावें असें निदान केलें व मेल्यानंतर सौधर्म स्वर्गात देव झाला तोच पुढें रावण झाला

पौलस्त्यं समियो रन्तु सोऽगाद्रूप्याद्रिकानने ।
विद्यासिध्युद्यता तत्रालकेशामितवेगजाम् ॥ २२ ॥

जंबुद्वीपांत भरतक्षेत्रांत विजयार्ध पर्वताच्या दक्षिणश्रेणींत मेघकूट नामक नगर आहे तेथें विनिमीच्या वनांतील सहस्रार

१ पुरा पूर्वं एत्य पुरी अस्मदीया इति कारणादेव आगत्य २ पूर्व मदर ३ अनंतार्यगणधरात् ४ पुलस्त्यस्य अपत्य मेघनिया।

त्या दुष्ट दशाननानें तिला कोठें तरी नेउन सोडण्याची आज्ञा केली. एका पेटींत पुष्कळ द्रव्य व पत्रासह तिला ठेऊन मारीचान नेगी व मिथिलानगरात दूर नेऊन ती पेटी पुरली

कर्पद्भिस्तद्भुवं सीरे सौगांयार्नाय दीन्तिताम् ॥
उद्धृत्य जनको लेखाज्ज्ञाततत्वो ददौ मुदा॥ २६ ॥

दैवयोगानें त्याच जागीं घर बांधण्यासाठीं एक जमीन नांगरू लागले असता त्यांना ती पेटी सापडली व त्यांनीं ती जनक राजाला नेऊन दिली पेटी उघडल्यावर पत्रावरून जनकाला सर्व कळलें

सीतारव्या वसुधादर्व्य पण्डिता सा पुपोष ताम्॥
सोपि भूगहगा प्रेम्णा गुणयन्ती कला कला॥ २७॥

त्यानें आनंदानें ती मुलगी वसुधाराणीच्या स्वाधीन केली तिचे नाव सीता ठेऊन तिचें ती सवर्धन करू लागली व त्याबरोबर तिच्या कलाहि वाढू लागल्या

तां यौवनोल्लासतुङ्गा याचमानपु भूरिपु।
दृष्ट्वमा जनकोऽन्यदुःसदस्युचे चमूपतिम्॥ २८॥

तारुण्याच्या उल्हासानें वाढत चालल्या तिला पाहून बरेच जण तिला मागणी घालू लागलेले पाहून सभेत राजा दुरात्मतीला म्हणाला

१ हले २ आवासनिमित्त ३ मारिचि मनिपी मुला ४ पडिना ५ यया रावणा न वेत्ति ६ मनोहरा ७ दुरात्मति सेना।

यज्ञे हुता मारुत्सुलसावाजीभसगरादयः ।
सदेहा स्वर्ययुरिति श्रूयते तत्क्रियेत सः ॥ २९ ॥

पूर्वी यज्ञांत सगर, सुलसा, हत्ती, घोडे, हुत केले म्हणून ते सदेह स्वर्गाला गेले असें ऐकिवात आहे म्हणून तो यज्ञ करावा.

तच्छ्रुत्वाख्यत्स साध्वेतत्किन्त्वेप विधिरासुर ।
विहन्यते नागखगैरेव शङ्काऽत्र रावणात् ॥ ३० ॥

राजाचें बोलणे ऐकून कुशलमति म्हणाला हा विचार चांगला आहे. हा यज्ञ महाकालासुराने सांगितला आहे त्याचा नाग, खग वगैरे नाशाचे दोर न रावण विध्वंस करील अशी शंका आहे.

सीता रामाय दास्याम इत्युक्त्वा रामलक्ष्मणौ ।
तद्रक्षार्थं तदानेयौ मिथिलेशस्तदाभ्यधात् ॥ ३१ ॥

रामाला जानकी सीता देऊ असें सांगून रामलक्ष्मणाला यज्ञ रक्षणासाठी आणावे. कुशलमतीचें हें बोलणें जनकानें मान्य केलें.

दूतांस्तदुक्तं श्रुत्वाप्तैः कोशलेशो व्यचारयत् ।
तं च श्रेयोऽनुमन्धित्वात्तदा पुत्रभजन्मसंसम् ॥ ३२ ॥

कोशल देशाला दूत आमन्त्रणासाठीं पाठविण्यात आला. दशरथ राजानें सल्लामसलत केली सर्वांची संमति मिळाल्यानंतर त्याना पाठविण्याचें ठरलें

१ महाकालासुरेण प्रोक्त २ विघ्नते ३ जिनशासनरक्षकातीयैर्नागैः खगैर्नाथानुग्रहस्मर्तृनाद् ४ चनूनितिवाक्यमभ्युपगच्छतिस्म ५ जनक सदस्य ६ पुरोहितमन्त्रिभिः सह ७ दशरथः ८ आप्तैः ९ रामलक्ष्मणयार्थमरक्षार्थं मिथिलायां प्रयाण १० मन्यते स्म. ११ व्याचपुरपौराणां संविभागेन

वैराग्यक्षान्त्यनशनै कामक्रोधोदराग्निषु ।
हुतात्मयज्ञं निर्वान्ति वनस्थाःश्रमणा इति ॥२३॥

कामाग्नि, क्रोधाग्नि व उदराग्नीमध्ये वनात राहणारे श्रमण अनुक्रमानें वैराग्य, क्षांति व अनशन या आहुती देऊन आत्मयज्ञ करतात व मुक्त होतात हा आर्षयज्ञ होय.

आ ऽनार्षःस यत्रार्हद्गणिकेवलिवर्ष्मणाम् ।
संस्काराग्निषु गन्धादीन्हुत्वा सिध्यन्ति गेहिनः ॥२४

तीर्थकर, गणधर व इतर केवलीच्या शरीराच्या संस्काराग्नीत गंधादिके करून गृहस्थ यज्ञ करून सिद्ध होतात हा अनार्ष यज्ञ होय. असे हे यज्ञाचें आर्ष व अनार्ष नामक दोन प्रकार आहेत.

हिंसायागन्तु सगरविश्वभ्वादिद्विषां व्यधात् ।
दुर्गत्यै पर्वतमुखेनासुरस्तत्स दुष्यताम् ॥ २५॥

राजा सगर व त्याचा मंत्री विश्वभू वगैरेचा द्वेष्टा महाकाल नामक व्यंतरदेवाने त्याना दुर्गति प्राप्त व्हावी म्हणून पर्वताच्या द्वारें हिंसात्मक यज्ञ सुरू केले ते दुर्गतिलाच कारण होतात. क्षिरकदंब ब्राह्मणाजवळ त्याचा मुलगा पर्वत, नारद नामक परदेशी विद्यार्थी व राजपुत्र वसु विद्यापारगत झाले. पर्वत शब्दाचे अर्थ विपरीत करीत असे त्यामुळें तो टीकेस पात्र होई

१ नृलोके सिद्धाः सिद्धयति सेत्स्यान्ति. २ तीर्थकरगणधरेतरसर्वज्ञ शरीराणा हुत्वा विधिवत्प्रयुज्य सिद्धयति क्रमेण मुच्यत ३ सगरमन्त्रिमद्वेदराग्निमुख ४ अश्रद्धेयतया रामस्योपदिश्यता ।

अजैर्होतव्यमित्यत्र नारदेन तिरस्कृते ।
पर्वतोऽसुरतो यज्ञे तीर्थे सोऽघातयत्पशून् ॥ ३६ ॥

तीन वर्षांच्या जुन्या यवधान्यानें यज्ञ करावा कारण त्या यवाना अंकुर फुटत नाहींत व म्हणून ते हिंसेस कारण होत नाहीं असा नारदानें अर्थ केला. अज म्हणजे यव नसून बकरा होय व होमांत त्याचा बळी द्यावा असा पर्वतानें अर्थ केला व तो यज्ञांत पशूंचा घात करूं लागला त्यामुळें पर्वत सर्वांकडून तिरस्कारला गेला

महाकालश्चतुःषष्टिसहस्रासुरराट्शठ ।
तं कृत्वाध्यापयत्षष्टिमृच्सहस्राण्यथर्वणि ॥ ३७ ॥

महाकाळ व्यंतरदेवानें अथर्ववेदांत साठ हजार ऋचा बनवून पर्वताला पढविल्या.

वसुःश्वभ्रमगाज्जगाङ्गिरिति साक्ष्यां सपर्वतः ।
सर्वार्थसिद्धिं चाहिंसाधर्मेण नारदोऽगमत् ॥ ३८ ॥

वसु राजानें मोहवश होऊन पर्वताच्या मताला होकार दिला. ते सर्व नरकांत गेले. अहिंसा धर्मामुळें नारद मात्र सर्वार्थसिद्धिनामक *स्वर्गाला गेला.*

रामोऽथ सर्वसामग्र्यापि नादिष्टःसलक्ष्मणः ।
गत्वा विदेहास्तद्देशे क्रतुं निष्ठाप्य तत्सुताम् ॥ ३९ ॥

---

१ यवबीज च त्रिवर्षमनमित्यभिधीयत । तद्विकरण सन्तार्चिमुख देवार्चन विदु २ क्षीरकदम्बाध्यापकशिष्यस्य दशातपापतन ३ शिष्टभार्या पौरसमक्ष प्रमाणबलेन निगृहीत । ४ स पवन पाठयति स्म ५ साक्षीदानेन ६ जनकस्य ।

दशरथाच्या आज्ञेवरून सर्व सामग्रीसह रामहि लक्ष्मणाला बरोबर घेऊन विदेह देशाला गेला. तेथील जनक राजाला यज्ञात मदत करून त्याच्या मुलीशीं लग्न करून आला.

निवावोढश्रियं प्राप्त साकेतं परिणायितः ।
तातेनान्या राजकन्याःसप्त षोडश लक्ष्मण ॥ ४० ॥

लग्नानंतर राम अयोध्येला परत आला तेव्हा वसंतऋतु सुरु झाला. दशरथाने आणखी सात कन्याशीं रामाचे लग्न लावलें व सोळा कन्याशीं लक्ष्मणाचे लग्न लावलें.

देवोदितोदितं कार्यं गन्त्वा पुर्योत सानुज ः ।
इति रामेण विज्ञप्तोऽमुञ्चयुक्त्योदित पुन ॥ ४१ ॥

लक्ष्मणासह रामानें क्षात्रियोचित देवकार्य केलें. काशींत राज्य स्थापण्यासाठीं जाण्यास रामानें परवानगी मागितली असता प्रथम मोहानें दशरथाने ती नाकारली पण युक्तीनें समजाविल्यानंतर आर्क.

राज्येऽभिषिच्य तं तातो यौवराज्ये च लक्ष्मणम् ।
विभूतत्त्वावधिष्ठायं काशीमत्युदितौ भृशम् ॥ ४२ ॥

दशरथानें रामाला राज्याभिषेक केला व लक्ष्मणाला युवराज-पद दिलें. आणि आता काशींत राज्य स्थापा म्हणून दशरथानें त्यांना सांगितलें. तेथें त्यांची अतिशय उन्नति झाली.

गत्वा नन्दनवैचित्र्याख्यं जातु तद्वनं ।
क्रीडित्वा प्रेयसीयुक्तौ स्थिताविन्द्रमर्तेन्द्रवत्॥ ४३ ॥

१ गुरूपरपरागतकार्ये २ क्षत्रियधर्मादिसमर्थनानन्तरम् ३ ततस्मा द्राज्याभिषेकानंतर ४ उद्दिश्य काश्यामधिष्ठान व्यमवेति सकस्य ।

काशींत राज्य स्थापून नंदनवना प्रमाणें सुंदर चित्रकूट ।
वनात राण्यासह इंद्र व प्रतींद्रप्रमाणें रामलक्ष्मण क्रीडा करते झाले.

नारदस्तौ तथा दृष्ट्वा चरणैषी प्राप्य रावणम् ।
प्रलोभ्य सीतारूपोक्त्या चक्रे तं हर्तुमुत्सुकम् ॥४४॥

कलहप्रिय नारदानें त्यांना तसें आनंदमग्न पाहिले व रावणाकडे जाऊन सीतेच्या रूपाची त्याच्यापुढें इतकी स्तुति केली कीं तो लोभाविष्ट होऊन तिचें हरण करण्यास उत्सुक झाला.

मुक्तयां सूर्पणखया च्छद्मयान्वीक्ष्यबोधिताम् ।
सीतां हर्तां समारीचः पुष्पकेणासदत्स खे ॥ ४५ ॥

त्यानें मारीचाशीं चर्चा केली व शूर्पणखेला सीताहरणाचें कानावर पाठविलें. त्या महातान्या शूर्पणखेनें सीतेला शोधून काढली. ती रामावर पूर्ण अनुरक्त असून शीलवती आहे असें तिनें रावणास सांगितलें. तेव्हा तो रावत चिढून पुष्पक विमानात बसून मारीचासह निघाला.

तेन मारीचहेमणास्ता रामेण वियोजिता ।
तद्रूपेणाभ्यागतं स्वं नीता शिबिकया वनम् ॥ ४६ ॥

मारीचानें हेममृगाचें रूप घेऊन रामाला सीतेपासून मृगयामिषानें दूर नेलें आणि रावणानें रामाच्या रूपानें येऊन पालखींतून सीतेला नेलें.

---

१ मारीचेन सह मन्त्रयित्वा प्रेषितया २ पतिव्रतात्वेन परीक्ष्य संबोधिता सीता तद्वचनविरक्ता ।

तद्वृत्तं श्राविता शोकान्मूर्च्छितोन्मूर्च्छ्य लंभिता ॥
खगीभिरुज्झवागुक्तौ रामक्षेमश्रवावधि ॥ ४७ ॥

लंकेंत आल्यानंतर रावणानें रामरूप सोडलें. तेव्हां त्याला पाहून ती मूर्च्छित झाली. ती शुद्धीवर आल्यानंतर विद्याधर स्त्रिया तिची समजूत घालूं लागल्या. पण रामाचें कुशल कळेपर्यंत मी कांहीं बोलणार नाहीं असें म्हणून तिनें मौन धारण केलें.

तदोत्पातोदयादानैशासतः पथ्यमाक्षिपत् ।
शस्त्रशालां द्विचक्रो नाज्ञासीत्स द्विगुणोदय ॥४८॥

तेव्हां लंकेंत सर्वत्र उत्पात होऊं लागले. रावणाच्या आयुधशाळेंत उत्पात करणारें चक्ररत्न निर्माण झालें. त्या चक्राचें फळ त्याला माहीत नव्हतें. त्या सीतेचा स्वीकार करूं इच्छिणाऱ्या रावणाला तिला सोडून देणेंच पथ्यकर आहे असें म्हणून सुज्ञांनीं सांगितलें.

गृहीत्वा रोहिणीं राहौ गतेऽभ्राम्यच्छशीत्यहम् ।
स्वप्नेऽद्राक्षनिति मृगाद्दृहीन्वा जानकीं गते ॥ ४९ ॥

इकडे मायामृग नाहींसा झाल्यावर राम चित्रकूटवनांत परत आले व सीता तेथें नाहीं असें पाहून दुःखी झाले. त्या रात्रीं दशरथाला स्वप्न पडलें कीं राहू रोहिणीला नेल्यानंतर चंद्र उगाच

१ चतना पाप्य २ प्रार्थनावाक्यै स्वराज्यादिक प्रतिदर्शितलोभ सा अधोमुखी ३ खखगीर्जाता मौनेन स्थिता ४ अहं उक्ता भवामि राम कुशलवार्ताश्रवणानंतर अहं ब्रुवे नान्यथा ५ ग्रहण । सीतास्वीकारणकयवस्य ६ माह । ७ द्वितीय स्थाग तस्योत्पातभूत न जानाति स्म ॥

भटकत होता या स्वप्नावरून जानकीला घेऊन रावण गेला असें समजलें

रावणे राघवो वाराणस्या दिष्टं पुरोधसा ।
पिना मस्थापिताल्लेखादाश्वस्त सोऽरुपद्विषे ॥ ५० ॥

पुरोहिताने रामाला काशीत तें स्वप्न सांगितलें. पित्यानें उल्लेखिलेल्या स्वप्नाच्या अर्थावरून रावणानें सीता नेली हें नक्की कळल्यामुळे शत्रूवर राम खूव रागावला.

अथेत्य नेमतुः खेटौ तं तत्रैकोऽवदत्प्रभो ! ।
सुग्रीवोऽहं सुहृन्मेऽ यं विक्रान्तोऽमितवेगवाक् ॥५१॥

इतक्यात दोन विद्याधरांनी येऊन रामाला नमस्कार केला. त्यापैकीं एक म्हणाला, हे प्रभो ! मी सुग्रीव व हा माझा पराक्रमी मित्र अमितवेग.

खगाद्रेपाक्किलकिले रामवाली सद्माग्रजः ।
पुरे क्रमागतात्रैवराज्यात्तेनाहता गतः ॥ ५२ ॥

विजयार्ध पर्वताच्या दक्षिणेस असलेल्या किष्किंध नामक नगरात बलीन्द्र विद्याधर राज्य करीत होता. त्याला प्रियगुसुंदरी राणीपासून वाली व सुग्रीव नामक दोन पुत्र झाले त्याने राज्य सोडताना वालीला गादीवर बसवून मला युवराजपद दिलें पण वालीनें तेंहि हिसकून घेऊन मला हाकलून दिले

सम्मेद ससरवा मार्च्य जिनार्चास्तत्र नारदात् ।
ज्ञात्वा पदाप्ति त्वत्पादत्रागां तत्प्रसीद भो ॥५३॥

एकदा मी मित्रासह सम्मेदशिखरास गेलो असता जिनपूजन केलें. तेथें नारदाकडून कळलें कीं रामचंद्रापासून आम्हाला स्वपद-प्राप्त होईल म्हणून आम्ही सेवेसाठीं हजर झालो आहोत तर महाराज आमच्यावर कृपा करा.

प्रेषो ममेत्यादिशच्चैनं प्रियां मे गवेषय ।
तदुक्तो हनुमान्लङ्कां गत्वा भूत्वालिरभ्रमत् ॥५४॥

तर मग मी तुझाला पाठवितो. माझ्या प्रियेचा शोध करा असें रामानें सांगितल्यावर हनुमान लंकेला गेला व तेथें भुंगाच्या रूपानें फिरू लागला.

वनेऽथतां शिंशपाधोऽद्राक्षीद्रामोक्तलक्षणाम् ॥
सप्तमेऽन्हि तदाऽत्रैत्य मंदोपे मञ्जरीगिरा ॥ ५५ ॥

तेव्हा त्यानें रामानें सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त अशी सीता शिसवीच्या झाडाखालीं बसलेली पाहिली सीतेला आणून सात दिवस झाले होते म्हणून तिचे मन पालटलें कीं नाहीं ते पाहण्या साठीं रावणानें मंजरीनामक दासीला सायंकाळीं पाठविलें

स्वयं चाभ्यार्थिनां सीतामनिच्छन्तीं वृथा खगेट् ।
तां जिघांसुर्निषिद्धोऽगान्मन्दोदर्या दुराग्रही ॥ ५६ ॥

मंजिरीनें सीतेला समजाविलें कीं रावणाला पांच हजार राण्या असून तुला तो चाहतो व तो तुला पट्टराणी करील. आता रामाची

---

१ कदाचिना राक्षिसेनिच्छु । २ स्वस्थान गत ३ सीता भक्षा-र्येवेतिमहाविष्ट ।

आशा सोड. तिचें तिनें ऐकलें नाहीं ह्मणून क्रुद्ध होऊन रावण स्वत. आला व ह्मणाला कीं, तू न मानशील तर तुला मी बटीक बनवीन व ठार मारीन. तरीहि ती वश होईना. तेव्हा तिला मारण्याचें ठरविलें. पण मदोदरीनें त्याचा निषेध केला, तेव्हां तो दुराग्रही रावण निघून गेला.

साध्वी चेतया जनन्या सतीधुर्ये प्रसीद माम् ।
भुङ्क्ष्व रक्ष वपुःपत्या युङ्क्ष्वेत्युक्तपि नाब्रवीत् ५७

हे सतीशिरोमणे माझ्यावर प्रसन्न हो. आपल्या देहाचें रक्षण करून घे व आहार घे तुझी रामचद्राशी भेट होईल असें पुष्कळ विनविलें तरी ती बोलली नाहीं. मदोदरीनें त्याला तिला रामाकडे पाठीव असाच सल्ला दिला.

माता त्वेषा ममेत्यास्थचिन्तयती मनट्रकम् ।
तनान्येष्वपि यातेषु वानरीभूय रक्षकान् ॥ ५८ ॥

मदोदरीला आपल्या मुलीची आठवण झाली व रावणाच्या मुलावर आलेली ती मुलगीच ही सीता तर नसेल असा तिला सशय आला. ही मला आईसारखीच वाटते असा विचार करीत सीता बसली असता व मदोदरी निघून गेल्यावर वानरी विद्येनें वानर बनून व द्वारपालकानां दूर हाकलून हनुमान सीतेजवळ गेला.

दूरीकृत्यांशुमामत्वा श्रीमत्साङ्कुकरण्डकम् ।
मुक्त्वाग्रे कुशली राम इत्यूचे तामदश्च्छलम् ॥५९॥

१ मदोदर्या २ रामेणैतच्छद्मीर योन्य ३ परिवारजोषु ४ प्रसरेणुमात्रगामकरणास्वाग्रेदत्ताङ्गुलीयकम् ।

सर्व अडथळे दूर करून व नमन करून हनुमानानें श्रीवत्साकरण्डक तिच्यापुढें ठेवला. व रामकुशल आहे असें त्यानें सांगितलें.

न वेत्युद्धाव्य तद्रामनामाङ्कां वीक्ष्य मुद्रिकाम् ।
स्वैकगम्यं च पत्रार्थं निश्चित्यासौ मुदालपत् ॥ ६०॥

हा रूपांतर करून आलेला रावण तर नव्हे अशी सीतेला शंका आली. पण रामनामांकितमुद्रिका पाहून व पत्रातील आशय जाणून तिची खात्री झाली व ती ह्मणाली—

मे त्वं पितेति सोऽवादीन्नैवं त्वं स्वामिनी मम ।
शक्नोम्यद्यैव नेतुं त्वां परं नाज्ञात्र मे प्रभो ॥६१॥

तू मला वडिलासारखा आहेस. तेव्हा हनुमान ह्मणाला. नाहीं. तू माझी धनीण आहेस. आजहि मी तुला नेऊ शकतो. पण रामाची मला तशी आज्ञा नाहीं.

हत्वारिं नेष्यतांशस्तों तच्छ्रियाभोज्यमम्ब तत् ।
ॐ इत्युक्त्वा तया मुक्तःप्रगेद्रोत्य स प्रभुम् ॥ ६२ ॥

तो शत्रुचा नाश करूनच त्याच्या संपत्तीसह सती अशा तुला घेऊन जाईल व त्यामुळे त्याची कीर्ति होईल ह्मणून हे माते [१] तू आहार सेवन कर. तिनें त्याचे ह्मणणें मान्य केलें व तिचा निरोप घेऊन सकाळीं हनुमान रामाकडे आला.

---

१ आत्मनैव शत्रु योग्य । २ प्रशस्ता त्वा ३ अगी कृत्य ४ विवार्जित ५ प्रग प्रभाते ।

सीता द्रष्टेति पृच्छन्तं नत्वा दृष्टेत्युवाच सः ।
तस्मै सैनापत्यमधिराज्यं चेन्द्रतुजे ददौ ॥ ६३ ॥

सीता पाहिलीस काय म्हणून रामानें विचारताच होय पाहिली म्हणून हनुमानानें उत्तर दिलें व सर्व समाचार सांगितला. तेव्हां रामानें त्याला आपले सेनापति पद देऊन सुग्रीवाला अधिराज पद दिलें.

सोऽभुक्त्वांगदमन्त्रैत्वं सीतां याच्योऽनुकूल्य सः ।
बिभीषणेन भोज्याच सत्युक्त्वा संस्रगेद् भटम् ॥६४

अंगद म्हणाला की, सामदामादि मार्गांनी प्रथम सीतेला मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लंका बिभीषणाची आहे. त्याच्याकडून रावणाला समजाविलें पाहिजे. तेव्हां विजय, कुमुद, रतिगति मनोवेग वगैरे सह तो विद्याधर हनुमान रामाकडून पाठविला गेला.

गत्वारिम्नेन साम्नोक्तो योग्यं पे सोऽब्रगम्यमाम् ।
स्त्रीरत्नं स्वांचकारतु मां जित्वैतंत्त्यजत्विति ॥६५॥

शत्रू जवळ जाऊन तो साम्नवादानें यांच्याशीं बोलला. पण रावण म्हणाला की, हे रत्न माझ्याच योग्य आहे. म्हणून मी हरण करून आणलें आहे. रामाला मला जिंकूनच तिला न्यावें लाग—. एरव्हीं मी त्याग करण्यास तयार नाहीं.

१ सुग्रीवाय २ अणुमान ३ पुनः प्रश्नित ४ भवान् रावणानुजो बिभीषण ५ लंका भवतो भगिनी ६ मनोवेगादि विद्याधरभट चतुष्टययुक्त रावण प्रति गत्वा ७ रावणः ८ राम म शान्त्या स्त्रीरत्न स्वीचकार तर्हि एतु आगच्छतु राम ९ त्यक्ष्ये ।

ध्रुवं श्वा क्षिप्त उत्कुप्य भर्टनिर्वासितोऽमुना ।
मुक्तो विभीषणेनार्या पारयित्वा तयैत्य सः ॥६६॥

हनुमानानें रावणाला यथेच्छ निरस्कारिले व धिक्कारिलें. तेव्हा रागावून रावणानें त्यास धक्के मारित हाकलून दिले. पण बिभीषणानें हनुमानाचें सांत्वन केलें. हनुमानानें मदोदरी तर्फे सीतेला आहार घेण्यास लावलें. मग तो रामाकडे परत आला.

तद्दण्डेऽद्धयद्रामं प्रस्थायाथ शरद्यसौ ।
निर्मूल्य वालिं नीत्वात्र सुग्रीवं तत्पदे व्यधात् ॥६७॥

हनुमानानीं सांगितलेले हे वर्तमान ऐकून रावणाचा बीमोड करण्यासाठीं रामाने सेना सज्ज केली व शरदृतूत तो निघाला सुग्री वाला युवराजपदावरून व हनुमानाला सेनाधिपपदावरून काढा. मी तुह्माला सर्व मदत करतो असें वालीचे आलेले पत्र अमान्य करून रामानें त्याला ठार मारून सुग्रीवाला गादीवर बसविलें.

सिद्धप्रज्ञप्तिना सोऽपि भक्तैर्विद्याःखगैर्व्रत ।
सज्जभूखेचरचैर्ययोऽघृष्यैः शत्रुमध्यगात् ॥ ६८ ॥

१ हनुमता भेददडवाग्भिस्तिरस्कृत शुनकवत् २ उत्कृष्ट मुद्ध्वा । ३ सभाया. सगलग्रह नि कासित ४ समाश्वास्य विसृष्ट ५ सीता ६ अष्टमदिने मदोदर्या कृत्वा पारणा कारयित्वा ७ दडैकसाध्यो रावण. ८ रामस्य प्रयाण कारयित्वा ९ खदिरवने हत्वा १० वालिराज्ये. ११ तत्कालसाधितप्रज्ञप्ति विद्येन सुग्रीवेण १२ तत्क्षणाराधितपूर्वसिद्धविद्यावै १३ कोटिचतुरशीति लक्षा सख्यै भूगोचरै, अर्धाष्टकोटिसख्यैश्च खेचरैर्वेष्टित १४ राम ।

प्रज्ञप्तिनामक विद्या ज्याला साध्य आहे असा सुग्रीव, निरनिराळ्या विद्या ज्यानीं हस्तगत केल्या आहेत अशा अनेक विद्याधरासह आणि पायदळ चार कोटी ब्याशीलक्ष सेना घेऊन रामाबरोबर निघाला व ते सर्व शत्रूजवळ आले.

नानिच्छन्तीमभजयान्यां स्त्रीमित्येकव्रतस्य ते ।
सीता सुताग्रवंशस्य युक्तात्मीया न वांछितुम् ॥६९॥

नाखूष असलेल्या परस्त्रीचा मी अंगिकार करणार नाहीं असें व्रत असलेल्या तुला हे रावणा आपली मुलगी सीता भोगण्याची इच्छा धरणें बरें नव्हे आपल्या सुवंशाला हे शोभत नाहीं असें रावणाला बिभीषण ह्मणाला.

तद्रामायार्प्यतां नीत्वेत्याचक्षाणःसंहृत् क्रुधा ।
भ्रात्रा निर्वासितोऽभ्येत्य श्रितो रामं बिभीषिण ७०

ह्मणून सीता रामाकडे नेऊन दे असा त्यानें सल्ला दिला. त्यामुळें रागावून रावणानें बिभीषणाला हाकलून दिलें. ह्मणून त्यानेंहि रामाचा आश्रय घेतला.

अथोपाब्धिनिविष्टेन रामेणानुमतोऽणुमान् ।
वपिसैन्यैर्वनं भंक्त्वा दग्ध्वायातो बहिःपुरम् ॥७१॥

समुद्राजवळ आल्यानतर रामाच्या आज्ञेवरून हनुमान वानर सेनेकडून वन तोडून व लंका पेटवून आला.

---

१ भ्रातमाणः २ भ्राता ३ सागरतटे ४ देवाह गतो परिमसमीति ज्ञातः ५ बहिरिका लंकां ।

तत्सुग्रीवात्तविद्यौ तल्लंघिताब्धी बलासुतौ ।
आवास्यौपपुरं वीरेण द्विर्षां सिद्धिमास्थताम् ॥७२॥

सुग्रीवाकडून प्राप्त झालेल्या विद्याबलानें समुद्र तरून जाऊन राम व लक्ष्मण शत्रुनगरीजवळ आले. हनुमानामुळें त्याना या कामात यश आलें.

ततोऽरिणौ कृता सहरणेनेत्याक्षिप्तक्रुधा ।
चक्रमादाय तच्छीर्षं चिच्छेद लक्ष्मणोऽनु तत् ॥७३॥

रामलक्ष्मणानीं रावणाबरोबर घनघोर युद्ध केलें. तेव्हा रावणानें रागानें सोडलेलें चक्रच घेऊन लक्ष्मणाने त्याच्यावर फेंकलें. व त्याचा शिरच्छेद केला.

प्रीत्याप्तैर्योजितो रामः सीतयाऽरिपदे न्यधात् ।
विभीषणं सुरैर्गाङ्गैरभिषिक्तश्च लक्ष्मण ॥ ७४ ॥

रामाला त्याची सीता त्याच्या आप्तजनांनीं भेटविली. रावणाच्या राज्यावर विभीषणाला बसविलें व लक्ष्मणाला देवानीं त्रिखंडाधिशपदावर अभिषेक केला.

कोटिकाख्यशिलोद्धृत्या तुष्टैर्दिव्यासिमोप सः ।
स्वानन्दात्साग्रजो जित्वा दिशोऽयोध्यां श्रितोऽतपत्७५

१ ताभ्या सुग्रीवहनुमद्भ्या प्रजप्तिकृतविमानेनावतारितसमुद्रौ २ रामलक्ष्मणौ ३ सैन्य बहिर्मुक्त्वा ४ सुभटेन शत्रूणा द्विषा हनुमता कृत्वा ५ रावणेन ६ क्षिप्त ७ चक्र ८ सुग्रीवविभीषणादिभि ९ गगाजल १० हर्षे प्राप्तात् ११ सौनदनामान ।

कोटिका नामक शिळा लक्ष्मणानें उचलली तेव्हां सुनद नामक यक्षानें संतुष्ट होऊन सौनद नांवाचा खास तलवार लक्ष्मणाला दिली तेथून ते अयोध्येकडे जाऊन राज्य करूं लागले

एकदा सपरीवार शिवगुप्तजिनाद्धल[१] ।
धर्मं श्रुत्वा सानुजोऽभूदिष्टिमाप्य प्रभायुत. ॥ ७६ ॥

त्यानीं मनोहर नामक वनात शिवगुप्त जिनराजापासून सद्धर्माचें श्रवण केलें निरूपम दर्शन करून ते तेजस्वी बनले

तत कतिपयाद्वान्ते सान्तःस्योनुर्जी प्रभू ।
कृत्वा काशी गतौ पुत्रपौत्रैर्यस्तौ ननन्दतुः ॥ ७७ ॥

भरत व शत्रुघ्न या बधूसह अयोध्येंत का ी वर्षे राज्यैश्वर्य भोगून व त्याना राज्य देऊन रामलक्ष्मण काशीला गेले व तेथें पुत्रपौत्रासह आनंदात राहिले

दृष्टस्वप्नतया मृत्वा महारागेण लक्ष्मणः ।
गतो रावणवच्छ्वभ्रं तच्छाक्रान्त प्रभुर्द्धी ॥ ७८ ॥

एकदा लक्ष्मणाला तीन स्वप्नें पडली मस्ती आलेल्या हत्तीन मोन वटवृक्ष पाडला हें एक राहूनें ग्रासलेला सूर्य रसातळाला गेला हें दुसरें रक्ता चुनेगच्ची राजवाड्याचा एक भाग पडला हें तिसरें

१ सीतापुत्रादियुक्त २ राम इष्टिमाप्य प्रमया तजसा युतोऽभव ३ भरतशत्रुघ्नौ ४ स्वामिनौ ५ रहितौ ६ मत्तेभ भग्नवटा, राहुग्रस्तार्को भूपात, प्रासादैकदेशभग्नसादन लक्ष्मणस्य महारोगेण मरण द्वितीयेन र्योग्य विनाश तृतीयेन रामप्रव्रज्या च पुरोहितेन रहस्युक्त ।

पहिल्या स्वप्नाचें फल ह्मणून लक्ष्मणाला असाध्य रोग झाला, दुसऱ्या स्वप्नामुळें वैभव नष्ट होईल व तिसऱ्या स्वप्नाचें फल ह्मणून रामचंद्र दीक्षा घेईल. त्याप्रमाणेच घडलें. रावणाप्रमाणे लक्ष्मण मेला व त्याच्या शोकामुळें प्रगल्भबुद्धीच्या रामानें दीक्षा घेतली.

लक्ष्मणौ पृथिवीचन्द्रे राज्यं न्यस्याजितंजये ।
सीतात्मजेऽष्टमे यौवराज्यश्च मिथिलेशवत् ॥ ७९ ॥

लक्ष्मणाचा मुलगा पृथ्वीचंद्र याला गादीवर बसविण्यात आलें सीतेच्या सर्वांत लहान अजितंजय नामक आठव्या पुत्राला युवराजपद देण्यात आलें. मिथिलादेशहि त्याच्याच वांट्याला आला.

साकेतमेत्य सिद्धार्थवने श्रित्वा वलस्तप ।
शिवगुप्तजिनात्सिद्धः सम्मेदेऽणुमदादियुक ॥ ८० ॥

नंतर रामचंद्र अयोध्यला गेले व शिवगुप्त जिनराजापासून दीक्षा घेऊन त्यांनीं खूब तपश्चर्या केली व सम्मेदशिखरावर ते मोक्षाला गेले. हनुमान वगैरेहि तेथेच मुक्त झाल

विभीषणादयश्चानुदिश चयुस्तपोवलात् ।
सीताच्युतं गतान्य तु यथास्वं स्वर्गमासदन् ॥८१॥

बिभीषण, हनुमान, सुग्रीवादि आपआपल्या तपाबलाप्रमाणें

१ लक्ष्मणस्य अपत्य लक्ष्मणिस्तस्मिन् २ मिथिलाधिपत्ययुक्तं ३ देव्यो राजानं कुमाराश्च सह दीक्षिता द्व पुन आवर्त्तभूतौ शिवगुप्त जिनेन रामे मातबोधिते गृहीतसयमौ पृथिवीचंद्राजितजयौ ।

अनुदिश स्वर्गाला गेले. सीता अच्युत नामक स्वर्गात गेली व इतरहि आपापल्या कर्मानुसार स्वर्गाला गेले.

इति श्रीमुनिसुव्रततीर्थकरहरिषेणचक्रिरामलक्ष्मण रावणचरितोत्तरं विरामः ॥ २० ॥

देशेभूदत्र कौशम्ब्यां सिद्धार्थः श्रावकोत्तमः ।
श्रुत्वा स्वतातसंन्यासं महाबलजिनादसौ ॥ १ ॥
संन्यस्य बध्द्वा नामान्त्यं भुक्त्वा शर्मापराजिते ।
मिथिलेशस्य भूत्वाह विजयाख्यस्य तुग्महान् ॥ २

जम्बूद्वीपात, भरतक्षेत्रात, वसदेशातील कौशाबी नगरात राजा पार्थिव व राणी सुंदरा पोटीं सिद्धार्थ नामक राजा होता. तो उत्तम श्रावक होता. पार्थिवानें महाबलजिनाजवळ दीक्षा घेतली. व तो समाधिमरण साधून मरण पावला हें ऐकून सिद्धार्थ राजानें मुनिवर नामक अवधिज्ञानी साधूजवळ दीक्षा घेतली व एकादशांगाचें अध्ययन व षोडश भावनांचें चिंतवन करून तीर्थकरनामकर्म बांधले आणि तो अपराजित नामक उत्तम अनुत्तरविमानात अहमिंद्र झाला. वंगदेशातील मिथिलानगरींत राजा विजय व राणी वप्पिला यांच्या पोटीं नमिनाथ तीर्थंकर होऊन तो अहमिंद्र जन्मला

शुक्त्वा मेघागमे रन्तुं गजारूढो वनं व्रजन् ।
नत्वा सौधर्मदेवाभ्यां नभःस्थाभ्यामितीरितः ॥३॥

१ भरते २ राजा ३ वंगदेशे ४ अह शब्दस्य अहमिन्द्र एव ५ वप्पिला गर्भे ६ जन्मतो द्वितीयदिने समवसरण गताभ्यां ।

त्यांनीं बराच वर्षें राज्यवैभव भोगलें. एकदा वर्षाऋतूच प्रारंभीं हत्तीवरून ते वनश्री पाहण्यास गेले असता, सौधर्म स्वर्गांतील दोन देव आले व वंदन करून ह्मणाले,

आवाभ्यां वत्सकावत्यामिहार्हदपराजितात् ।
श्रुत्वाद्य भावितीर्थेशं देवं त्वां द्रष्टुमागतौ ॥ ४ ॥

जबुद्वीपाच्या पूर्वविदेह क्षेत्रातील वत्सकावती देशात सुसीमा नगरींत अपराजित विमानाहून अपराजित नामक तीर्थंकर उत्पन्न झाले आहेत. त्याच्या दर्शनास सर्व देव गेले होते. तेथें असें ऐकले कीं, अपराजित स्वर्गांतूनच मिथिला नगरींत जन्मलेले नमिनाथ भावी तीर्थंकर आहेत. ह्मणून आम्ही आपल्या वंदनास आलों.

तच्छ्रुत्वा त्यक्तराज्योऽसौ तपसा प्राप केवलम् ।
तीर्थं प्रवर्तयामास नमिमेनं नमाम्यहम् ॥ ५ ॥

तें ऐकून शहरात परत आल्यावर त्यांनीं वैराग्ययुक्त होऊन राज्य सोडलें व दीक्षा घेऊन तपश्चरण केले. आणि ज्यांनी धर्मतीर्थ प्रवर्तित केलें त्या नमिनाथ तीर्थंकराना मी नमस्कार करतो

द्वीपेऽत्रैरावते जात श्रीपुरेशो वसुन्धरः ।
पद्मावतीप्रियामृत्यार्वरधर्मजिनान्तिके ॥ ६ ॥

जबुद्वीपाच्या उत्तरेस महाऐरावत क्षेत्रातील श्रीपुरचा राजा वसुंधर व राणी पद्मावती याना विनयधर नामक पुत्र होता. पद्मावती

१ जबूद्वीपे स्थितायां २ देववचन ।

राणी मारल्यामुळें राजा फार कष्टी झाला व त्यानें वरधर्म नामक सर्वज्ञदेवाजवळ दीक्षा घेऊन बरीच तपश्चर्या केली.

स संयम्य महाशुक्रं गतः कोशाम्ब्यधीशिन ।
विजयस्य सुतो जातो जयसेनो रथाङ्गधृत् ॥ ७ ॥

शेवटीं समाधीमरण साधून तो महाशुक्रनामक विमानांतील देव झाला. तेथून तो वत्सविजय देशांतील कोशांबी नगरीचा राजा विजय व राणी प्रभाकरी यांच्या पोटीं जयसेन चक्रवर्ती होऊन जन्मला.

सौधाग्रस्थ सशब्दोल्कापातं तप्त्वा तपो जिनात् ।
वरदत्ताज्जयन्तेऽ भूद्देवःप्रायोपवेशन ॥ ८ ॥

पुष्कळ वर्षे राज्यवैभव भोगल्यावर एकदां तो गच्चीवर बसला असता मेघ गडगडाटासह उल्कापात झाला तेव्हा त्याला वैराग्य प्राप्त होऊन वरदत्तनामक केवलीभगवानाजवळ त्यानें दीक्षा घेतली आणि बरीच तपश्चर्या करून समाधिमरण साधल्यानंतर तो जयंत नामक अनुत्तर विमानांत अमृत पिणारा अहमिंद्र झाला.

इति श्रीनमिनाथजयसेनचक्रिचरितावसानमेकविंशम्

विन्ध्येऽत्र मगधे जातो भिल्लो भार्यास्य वागुरा
विमलामलबुद्ध्याख्यौ चारणौ मारयंस्तदा ॥ १ ॥
भवतोऽन्यो राजगृहे श्रेष्ठी वृषभदत्तक ।
तयेत्युक्त्वा निषिद्धोऽसौ जातौ तौ श्रावकावुभौ ॥२

१ चक्री २ वीक्ष्य ३ अमृतभोजी ।

जंबुद्वीपांत, भरतक्षेत्रांत मगधदेशांत, विंध्यपर्वतावर एक भिल्ल रहात होता. त्याच्या बायकोचें नाव वागुरा होतें. निमलबुद्धि व अमलबुद्धि नामक दोन चारण मुनींना त्या भिल्लानें ठार करण्याचा विचार केला पण या चारणमुनींचा वृषभदत्त नामक एक भक्त राजगृहनगरींत आहे असें वागुरेनें त्याला सांगितलें व मुनिवध पासून तिनें परावृत्त केलें. उपदेशामुळें तें भिल्लदांपत्य पश्चात्ताप पावून श्रावक बनलें.

वल्मीके तुम्बकफलं गृण्हन्दष्टोऽहिनान्यदा ।
निदानेन मृतः सोऽभूत्तस्यैव श्रेष्ठिनोऽङ्गजः ॥ ३ ॥

सापाच्या वारुळांतील तुंबरु फळ घेत असतांना त्या भिल्लाला साप चावला व तो मेला. मरतांना दुर्भनिदान बांधल्यामुळें तो त्याच श्रेष्ठीच्या पोटीं जन्मला.

इभ्यकेतुःस कनकप्रभां तन्नृपजां भजन् ।
तद्वतो दत्ततद्राज्यं नाकुर्विर्त्तकरा शुचा ॥ ४ ॥

त्याचें नाव इभ्यकेतु. राजगृहीच्या जितशत्रु राजानें आपली मुलगी कनकप्रभा त्याला दिली. पुढें राजानें दीक्षा घेऊन राज्यहि त्याला दिलें. वागुरेचा पती मेल्यामुळें ती कष्टी झाली व साप चावून मेली.

१ जितशत्रुनाम्नो राजगृह नृपस्य पुत्रीं परिणीत २ तया स्वय वरीकृत्य वृत. ३ जितशत्रुराजेन प्रव्रजत मगधाधिपत्य दत्त भजन् ४ नार्गुर्वल्मीक ५ भर्तृवियोगशोके वागुरा ।

वागुराथाहिना दष्टा मृत्वा तत्संचिवोऽभवत् ।
त्रयोऽपि तपसा जातास्ते सौधर्मे सुरोत्तमाः ॥ ५ ॥

वागुरा मेल्यावर इभ्यकेतुची सचिव म्हणून जन्मली. हे दोघे व श्रेष्ठी मेल्यानंतर सौधर्म स्वर्गात देव झाले.

पुष्करार्धापरे प्रत्यग्गन्धिलायां ततोऽभवत् ।
खगा उदक्तटे सूर्यप्रभेट् सूर्यप्रभात्मजाः ॥ ६ ॥

पुष्करार्धद्वीपात, पश्चिमविदेहक्षेत्रात, गन्धिलदेशातील सूर्यप्रभ नगराचा राजा सूर्यप्रभ व राणी धारणी याना तीन पुत्र झाले.

चिन्तामनश्चपलगत्याख्या वेगपर्णे जिताम् ।
तप श्रिता प्रीतिमतीमनु तेऽथ तपोऽभजन् ॥ ७ ॥

चिंतागति, मनोगति व चपळगति असे ते तीन पुत्र होत. त्याच गन्धिल देशातील अरिंदम नगरीचा राजा अरिंजय व राणी अजितसेना याना प्रीतिमती नावाची मुलगी झाली. ती मेरूपर्व ताला प्रदक्षिणा घालण्याच्या शर्यतींत चिंतागती तिच्याहून श्रेष्ठ ठरला म्हणून त्याला वरमाळा घालण्यास तयार झाली पण त्यानें ती आपल्या लहान भावाना घालण्यास सांगितलें यामुळें तिला खेद होऊन तिनें निवृत्तानामक आर्यिकेजवळ दीक्षा घेतली तेव्हा

१ इभ्यकेतुमन्त्री २ मन्दिरस्थविराचार्यात्सूक्तं श्रुत्वा गृहीतेन तपसा ३ सूर्यप्रभनगरस्य राजा सूर्यप्रभस्तस्य राज्ञी धारिणी तस्या । इभ्यकेतुकन कप्रभामात्रिचरा क्रमेण चिन्तागतिमनोगतिचपलगतयो जाता ५ मतिशाया सर्वेषु विद्याधरेषु जिनेषु चिन्तागतिनैव ता जिनां दृष्ट्वा त निमित्तीकृत्य ।

वरील तीन्ही भार्यानींहि दमवर नामक मुनीजवळ दीक्षा घेऊन तप आचरिलें.

सामानिकास्तु माहेन्द्रे चिन्तागतिपुरस्सरा ।
द्वीपेऽत्रगन्धिलासिंहपुरेड्जातोऽपराजितः ॥ ८ ॥

तेथून ते चौथ्या स्वर्गांत सामानिक देव झाले पुढें मनोगति व चपलगति, जबुद्वीपात, पूर्वविदेहक्षेत्रात पुष्कलावती देशातील गगनवल्लभ नगरीचा राजा गगनचद्र व राणी गगनसुदरी याच्या पोटीं अमितगति व अमिततेज नावानें जन्मले चिंतागतिहि सिंहपुरचा राजा अपराजित नावें करून जन्मला.

श्रुत्वान्यदा सम पित्रो सिद्ध विमलवाहनम् ।
ता तदर्चा वीक्ष्य भोक्ष्यामित्याग्र सश्रितो नृपः ॥९॥

त्याच्या बापाचें नाव अर्हद्दास व आईचे नाव जिनदत्ता एकदा मनोहर नामक उद्यानात विमलवाहन तीर्थंकर आले असता त्याचा बोध ऐकून त्यानें दीक्षा घेतली. पुढें वरीच तपश्चर्या करून तीर्थंकरासह तो मोक्षाला गेला यामुळें अपराजित फार कष्टी झाला व पुन्हा मला दर्शन दिल्याशिवाय मी अन्न ग्रहण करणार नाहीं असे व्रत घेऊन तो बसला आठ दिवस उपोषण घडल्यावर यक्षपतीने त्याची कृत्रिम रूपें दाखवून त्याला दर्शन दिलें त्याने त्याचें पूजन करून उपवास सोडला.

१ यूय वय च जाता' २ भवान् ३ फाल्गुननंदीश्वरपर्वणि ४ अर्हद्दासेन सह ५ तयोरर्हद्दासविमलवाहनयोर्मूर्तिम् ।

तत्र शत्राज्ञया यक्षपतिर्विमलवाहनम् ।
तस्य सन्दर्शयामास साक्षात्कृत्वा महाशुभः ॥ १० ॥
नन्दीश्वराह्निकं कृत्वा धर्म स्वान्त-पुरं व्रजन् ।
चैत्यालयस्थौजसरी खगभूतौ तप श्रितौ ॥ ११ ॥

नंदीश्वरपूजन त्यानें केलें. इतक्यात शाळा चैत्यालयात दोन चारण मुनी भिळे ते अमितमति व अमितनेज हाते त्यानीं दीक्षा घेतला होती

चारणावागतौ दृष्ट्वामितादिगतितेजसौ ।
मार्च्य दृष्ट्वा युवा कार्पात्पुरस्तरानादिमो गणी ॥१२॥

या अमितमति व अमिततेज चारणमुनींना पाहून व पुजन अपराजित ह्मणाला की, तुम्हाला मी कोठें तरी पाहिलें आहे तेव्हा अमितमति चरणमुनि ह्मणाले

भागुरत मासमात्रायुरस्य सथाविर्तोऽर्हत ।
इष्ट्वा द्वाविंशति-नक्तमापापरगन ॥ १३ ॥

राजा, तुझ आयुष्य आता एक महिना उरले आहे आर्ता पूर्वजन्मीच तुझा भाऊच आहात व त्याच्या मरणासमरणानंतर आह्मी दीक्षा घतली तें ऐका असें ऐकितानें आठ दिवस जिनेश्वर पूजन करून व बावीस दिवस प्रायोपवेशन करून समाधिमरण साधून

जाताऽच्युतन्द्राऽथ नृप सुमतिष्ठोऽस्त हास्तिन ।
यगाधरर्पिनानासपञ्चाश्चर्य श्रितम्नप ॥ १४ ॥

१ मनागतिचरन्यानिचरो । २ स्वयमभाम्यदद्गरकम कथित ३ मदान्मासमनायु ४ मासिना ५ अष्ट दिनानि जिनान्पूजयित्वा ।

तेथून तो राजा सोळाव्या स्वर्गात पुष्पोत्तर विमानात अच्युतेंद्र झाला. पुढे तो कुरुजांगल देशांतील हस्तिनापुरचा राजा श्रीचंद व राणी श्रीमती यांना सुप्रतिष्ठित नावाने पुत्र झाला. त्याने यशोधरमुनींना आहारदान दिल्यामुळे त्याला पंचाश्चर्याची प्राप्ति झाली.

सुमन्दिराज्जिनादुल्कापातेे व्योतोन्त्यनामयुक्।
मृत्वा समाधिना चाभूज्जयन्त लवसत्तमः ॥ १५ ॥

पुष्कळ राज्यवैभव भोगल्यावर एकदा तो गच्चीवर बसला असता उल्कापात पाहून त्याला वैराग्य उत्पन्न झाले व त्याने सुमंदर नामक तीर्थंकराजवळ दीक्षा घेऊन एकादशांग वाचले व षोडश-भावनांचें चिंतवन केले. त्यामुळे तीर्थंकरनामकर्म बांधून तो समाधिमरण साधल्यावर जयंत नामक अनुत्तरविमानात अहमिंद्र झाला.

हरिवंशेऽन्धकवृष्णेर्मार्कण्डेयान्वयेऽग्रतुर्के।
समुद्रविजय सूर्यपुरेऽनेमि सते स्सुतः ॥ १६ ॥

भरतक्षेत्रांत हरिवर्षदेशांतील भोगपुरचा राजा प्रभंजन व राणी मृकंडू यांना सिंहकेतु नावाचा पुत्र झाला. त्याचें लग्न विद्युन्मालेशी झाले. त्याच्या वंशात हरिगिरी, हेमगिरी, वसुगिरी वगैरे राजे होऊन गेले. कुशार्थ देशाच्या शौर्यपुरचे राजा सूरसेनाला शूरवीर नामक मुलगा होता. त्याच्या भार्येचे नाव धारिणी. हिच्या-

१ सति २ प्रसिद्ध ३ देवोत्तम ४ दशाना पुत्राणा आद्यो दशार्हः ५ शिवाद व्यामभूत्

पासून त्याला अंधकवृष्णि व नरवृष्णि असे दोन पुत्र झाले. अंधक-वृष्णीला सुभद्राराणीपासून दहा मुलगे व दोन मुली झाल्या. पहिला मुलगा समुद्रविजय, त्याला शिवादेवीपासून अपराजिताचा जीव अहमिंद्र, नेमिनाथ तीर्थंकर झाला

द्वारवत्यामभूत्पाणिग्रहे बुद्धो मृगेक्षणात् ।
तं प्रव्रज्याप्तकैवल्यं कृततीर्थं नुमःशिवम् ॥ १७ ॥

द्वारवती नगरींत राजमतीच्या पाणिग्रहणाचे वेळीं मांसाहाराच्या मेजवानीकरिता आणलेले हरिण पाहून नेमिनाथाना वैराग्य उत्पन्न झाले. व त्यानीं दीक्षा घेऊन आणि कठोर तप करून धर्मतीर्थ प्रवर्तित केलें. नंतर जे मोक्षाला गेले त्या कल्याणकारक नेमिनाथ तीर्थंकराना आम्ही नमस्कार करतो.

भिल्लेभ्यकेतुसौधर्मदेवचिन्तागतीष्टमाहेन्द्रे ।
अपराजितोऽथाच्युतेंद्रःसुप्रतिष्ठो जयन्तजो नेमि ॥१८॥

भिल्ल, इभ्यकेतु, सौधर्मदेव, चिंतागति विद्याधर, चौथ्या स्वर्गांतीलदेव, अपराजित, सोळाव्या स्वर्गांतील अच्युतेंद्र, सुप्रतिष्ठित व जयंत विमानातील अहमिंद्र इतक्या भवानंतर नेमिनाथ झाले.

दीले छायेक्षणाद्भाभ्यां नीतो भार्त्रापिता तप ।
सशङ्खःसर्वनिर्नामा स्वयम्भूदर्शनात्कृत ॥ १९ ॥

कुरुदेशातील पलाशकूट गावात सोमशर्मा नामक एक ब्राह्मण

१ माहेंद्रेण इव २ नदिनामा द्विज ३ विमलतीर्थे स्वयंभू नाम्नो वासुदेवस्य दर्शनात् कृतनिदान ।

होता. त्याच्या मुलाचें नाव नंदी. त्याला मामाची मुलगी लग्नासाठीं न मिळाल्यामुळें व त्याच्या अशक्ततेबद्दल लोकांत टीका झाल्यामुळें वैतागून त्यानें आत्महत्या करण्याचा निश्चय केला. शैलपर्वतावर आत्महत्येसाठीं तो गेला पण त्याची छाती होईना. तेथें निर्नामिक व शंख अशा दोन शिष्यासह द्रुमषेण नामक मुनिराज विहार करून आले होते. शंखानें नंदीला योग्य बोध करून दीक्षा घेवविली. पुढील दुसऱ्या जन्मात नंदीचा जीव शंख व निर्नामिकाचा बाप होणार असें त्यानीं द्रुमषेण मुनिवरापासून ऐकलें.

निदानस्तपसा प्राप्तौ महाशुक्रं ततो बलः ।
पद्म-शंखचरः सूर्यपुरेऽभूद्वसुदेवतः ॥ २० ॥

शंखानें शुभनिदान बांधलें व निर्नाम्यानें अशुभनिदान बांधलें. नंदीसह हे दोघे तपश्चर्येनंतर समाधिमरण साधून महाशुक्र विमानातील देव झाले. नंदीचा जीव स्वर्गांतून च्यवून वसुदेव झाला. सौरीपुरात वसुदेवापासून देवकीला निर्नाम्याचा जीव कृष्ण चक्रवर्ती म्हणून झाला व त्यालाच रोहिणीपासून शंखाचा जीव बलभद्र नामे करून झाला.

रोहिण्यां कृष्णो देवक्यां मधुरायां हरिर्विभौ ।
तद्द्विडासीज्जरासन्धो ब्रह्मदत्तोऽथ चक्रभृत् ॥ २१ ॥

कृष्ण व बलराम याचा शत्रु जरासंध अर्थात् तो प्रतिनारायण होता. नऊ नारायणानंतर ब्रह्मदत्त नामक चक्रवर्ति होऊन गेला.

कौशाम्ब्यामुद्धतोजातः कुमारोऽन्यतुजो रुजन् ।
निर्वासितः पत्तिपत्या वसुदेवमसेवत ॥ ५ ॥

कौशांबी नगरांत मंदोदरीनें त्याचें पालन पोषण केलें. पण तो लोकांच्या मुलांना हाणमार करी म्हणून त्याला तिनें घराबाहेर घातलें. तो सूरीपूरला गेला व तेथें वसुदेवाचा नोकर बनला.

जरासन्धेन राज्यार्द्धेतरां जीवद्यशोभिधाम् ।
दातुं मतां जितवतेजय्यं सिंहरथं रिपुम् ॥ ६ ॥

पोदनपुरचा राजा सिंहरथाला जो कोणी जिवंत धरून आणून देईल त्याला अर्धे राज्य व कलिंदसेनेपासून मला झालेली जीवद्यशा नामक मुलगी मी देईन असें जरासंधानें जाहीर केलें.

मॉर्दत्सोर्वसुदेवश्च वीक्ष्यतांदुष्टलक्षणाम् ।
जितो मत्पत्तिनानेन स कंसेनेति बोधितः ॥ ७ ॥

वसुदेवानें पराक्रम गाजवून सिंहरथाला पकडलें व जरासंधाच्या स्वाधीन त्याला केलें. तेव्हा त्याने अर्धे राज्य व जीवद्यशा त्याला देऊं केली. त्या मुलीची वैधव्य प्राप्तीचीं लक्षणें पाहून कंस नामक या माझ्या नोकरानें सिंहरथाला धरून आणलें आहे म्हणून त्यालाच ती मुलगी द्या असें वसुदेव म्हणाला.

तेनेमन्दोदरीप्राक्षमञ्जूषापत्रवाचनात् ।
ज्ञातवंशाय द्रावतस्मै स राज्यार्द्धा सुतामदात् ॥ ८ ॥

१ परपुत्रान २ चपेटामुष्टिदण्डाधैः । ३ राज्यार्द्धेन कृत्वा तरां सार्वि-र्यां ४ प्रतिज्ञाना ५ दिग्जयावशेषे आत्मना जेतुमशक्यं ६ पोदनेशं ७ जरासंधस्य कन्या दानुमिच्छों सिंहरथ मर्पयामास ८ बाधजालास्ये-तिबाधितः बद्ध इत्यर्थः ९ जरासंधेन ।

कंसाच्या कुलाची चौकशी करण्यात आला तेव्हा मदोदरीनें पेटी पत्रासह हजर केली. त्यामुळें कुलाचा उलगडा होऊन अर्थी खुषीनें जरासंधानें आपली मुलगी व अर्धे राज्य कंसाला दिलें.

गृहीत्वा मधुरां बध्वा प्रक्षेपाद्रिक्त वैरतः ।
पितरौ गोपुरे न्यस्य कृत्वा सूर्यपुरात्मभुम् ॥ ९॥

मला जन्मत च माता पित्यानीं यमुनेत सोडलें ह्मणून रागारागानें कंस तसाच मथुरेला गेला ती आपल्या ताब्यात घेतली व त्यानें मातापितरांना वेशीवर टांगलें टांगून तो वसुदेवाला बरोबर घेऊन गेला

वसुदेव देवसेनां देवकीमनुजां निजाम् ।
स्वीकार्य भूत्यापा मुदास्ताशामना ददौ ॥ १०॥

देवसेन राजाची मुलगी देवकी, आपली चुलत बहीण वसुदेवाला त्यानें दिली व विवाहविधीनें तिचा स्वीकार वसुदेवानें केला.

अतिमुक्तमुनिर्जातु भिक्षार्थं गृहमागत ।
देवकी तेऽनुजा साधो! पुष्पजानेन वाससा॥ ११ ॥

एकदा अतिमुक्त मुनि भिक्षेसाठीं आले असता जीवयशा त्या मुनीला ह्मणाली, ही पहा तुमची बहीण कामभोगवस्त्रानें तुमच्याकडे अभिलाषानें पहात आहे.

---

१ यमुनायां बालक्षेपाधिक्य २ विवाह विधिना ग्राहयित्वा ।

स्वेहां व्यनक्त्यनेनेति तत्पत्न्यां नर्मणोदित ।
तामूचेऽस्याः सुतो रण्डांत्वां कर्तेति निशम्य तत् १२

तिने अशी आपली चेष्टा केलेली ऐकून मुनींनी शाप दिला कीं, हिचा मुलगा तुला विधवा करील.

तत्र छिन्ने तथैतेन कर्ताप्यपितृकामिति ।
तच्छ्रुत्वामर्दितं पद्भ्यां तेन महीमिमाम् ॥ १३ ॥

तेव्हा तिनें रागावून त्या भोगवस्त्राचे तुकडे तुकडे केले. तेव्हा मुनींनीं पुन्हा शाप दिला कीं तुझ्या बापालाहि मारून तो तुला अनाथ करील. मग तिनें ते तुकडेहि पायाखालीं तुडविले तेव्हा मुनि म्हणाले कीं, तो देवकीपुत्र तुझ्या भावाचेंहि राज्य घेऊन चक्रवर्ती होईल.

भोक्ता त्रिखण्डामिति तच्छ्रुत्वाकसेन तन्मुखात् ।
देवक्या स्वगृहे सूतिं याचितोऽमस्त तत्पतिः॥१४ ॥

तो त्रिखंडपृथ्वीचा शास्ता होईल हें मुनिवचन कळल्यावर कंसानें देवकी माहेरींच बाळंत होऊ दे असें वसुदेवास कळविलें व त्यानें तें मान्य केलं.

देवकीवसुदेवाभ्यां भोजयित्वान्यदा मुनिः ।
दीक्षां नौ स्यान्न वेत्युक्त सोऽवोचत्सप्त वां सुता ॥१५॥

१ आत्मचेष्टा २ कस भार्यया ३ देवक्या ४ तस्मिन्वस्त्रे ५ मुनिवचनं श्रुत्वा ६ जीवद्यशसा ७ वसुदेव ८ आवयो ९ युवयो ।

पुढें एकदा वसुदेव देवकीनें अतिमुक्त मुनींना आहारदान करून आम्हींहि दीक्षा घेऊं कीं नाहीं म्हणून विचारलें. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं तुम्हाला सात पुत्र होतील.

भवितारो यमास्तेऽत्र त्रयोऽन्यत्रातिवर्धिताः ।
सेत्स्यन्ति पश्चिमश्चार्धचक्री भावीति भावितं ॥ १६॥

पहिलीं सहा तीनदा जुळीं होतील व तीं दुसरीकडेच वाढतील शेवटला मात्र अर्धचक्री होईल असें भावित त्या भविष्यवेत्त्या मुनींनीं सांगितलें.

अलका भद्रिलश्रेष्ठीनिर्यमैर्नैगमर्षिणा ।
सद्योजातमृतेरिन्द्रादेशेन परिवर्तनार्थं ॥ १७ ॥

भद्रिल नगरांतील वैश्यपुत्री अलका त्याचेंलीं बाळत होत जाईल. इंद्राच्या प्रेरणेनें नेगमर्षिदेव त्या जुळ्याची आदलाबदल करील.

त्रीन स्वर्क्षीयमान्कंसः शिलायां सोऽत्वधीत्क्रमात् ।
सप्तमे मास्यतोऽज्ञात कृष्णोऽथ स्वगृहेऽजनि ॥१८॥

तीन खेपेच्या सहा पुत्रांना कंसानें शिळेवर आपटून ठार मारलें. चौथ्या खेपेस ती माहेरी बाळंत न होता घरीं झाली व त्याचा पत्ता न लागावा असा बंदोबस्त करण्यात आला.

पोष्टुं नन्दगृहे कृष्णं हरन्सीरीयरन्पिता ।
छत्रं गोभूतात्पदेवीशृङ्गोद्यन्मणिदीपिका ॥ १९ ॥

१ युगलं २ चित्तशी मुनि ३ नाम्ना दवेन ४ देवक्या अत्र अन्या सुतान्मृतान्मुक्त्वा देवकीपुत्रान् जयीतोलकाग्रे स्थापनात् । ५ भगिनीपुत्रान् ६ द्वौ द्वौ पुत्रौ जातौ सत्य शिलापदेनाघातयन् ७ वृषभाकारेण प्राप्त ।

बलराम आणि वसुदेवानें कृष्णाला नंद गवळ्याच्या घरीं जतन करण्याचा पाठवावें असें ठरविलें. रातोरात मुलाला त्यांनी पोहोचतें केलें. वसुदेवाने त्याचेवर छत्र धरलें होतें. बलदेवानें त्याला हातात धरलें होतें नगरदेवतेनें गायीचें रूप घेऊन मणिमय शिंगाना उजेड पाडला होता

यान्तौ निशीथे तत्पादस्पर्शोद्‌घाटितगोपुरौ ।
सम्भ्रान्तोक्ततदर्थोग्रसेनाशीर्वादमोदितौ ॥ २ ॥

मथुरेच्या वेशी मुलाच्या पादस्पर्शानें एकदम उघडल्या. उग्रसेनाला त्याच वेशीवर डागलें होतें त्याला रात्री दरवाजे उघडलेले पाहून आश्चर्य वाटलें त्याला सर्व हकीकत कळल्यावर त्यानें त्याला आशीर्वाद दिला

यमुनादत्तपन्थानौ सद्योजातात्मजार्पणम् ।
नन्दद्दष्टस्वाभ्ययान्त पृष्टवाज्ञाततदर्थ कौ ॥ २१ ॥

यमुनेनें द्विभग होऊन त्याना वाट करून दिली. नुक्तीच जन्मलेली कन्या घेऊन नंद येत असलेला त्याना वाटेंत भेटला. देवतेनें मला ही कन्या आज रातोरात आपणाकडे पोहोचविण्यास दिली आहे असें त्याने सांगितल्यावर त्याना आशय कळला.

तस्मै दत्वा स्वडिम्भं त डिम्भा लात्वागतौ गृहम् ।
तदेत्य कंसस्तां वीक्ष्य शुग्ननासां व्यधाद्बलात् ॥२२॥

१ अतर्कितापवनगुपुरोद्‌घाटयक्षुक्तितोक्त २ वक्रनासा ।

ती मुलगी घेऊन व आपला मुलगा त्याच्या स्वाधीन देऊन ते दोघे घरीं परत आले. तेव्हा कंस आला न त्यानें तिचें नाक दाबून तिला नकटे केलें

सा तपःस्था स्थिता विन्ध्ये व्याधजग्धाऽगमद्दिवम् ।
हस्ताङ्गुलीत्रयी तस्या कृत्वाऽर्चिविन्ध्यवासिनी ॥२३॥

तिला गुप्त तळघरात वाढविली व मोठी झाल्यावर बाहेर काढली. आपलें निकृत स्वरूप पाहून ती लाजली व सुव्रतानामक अजिकेजवळ दीक्षा घेऊन तिने विंध्यपर्वतावर राहून तपश्चर्या चालविली शेवटीं तिला वाघाने खाल्ले. तीन बोटें पडलेली होती. ती पाहून तेथील जंगली लोकाना आश्चर्य वाटले व त्यानीं विंध्यवासी देवी म्हणून त्या बोटाची पूजा सुरू केली.

पृष्टो दृष्ट्वा महोत्पातात्कंसेन वरुणोऽब्रवीत् ।
जातस्तेऽरिरिति श्रुत्वा तं ध्यायन्यतनादिभि ॥२४॥

एकदा मथुरेत बरेच उत्पात झाले. तेव्हा वरुण नामक ज्योतिष्यानीं त्याला सागितले कीं, तुझा शत्रु निर्माण झाला आहे. तें ऐकून पूतना वगैरे देवताना त्याच्या तपासण्यासाठीं त्याने पाठविले.

प्राक्सिद्धाभिस्तद्वधेष्टफलाभिःसप्ताभि श्रितः ।
स तांद्रिरो विभङ्गैर्न तं ज्ञात्वाथ विकृत्यं ताः ॥२५॥

१ उद्भकायोत्सर्गेण स्थिता २ भक्षिता ३ व्याधजनपदेर्देवतेनिभणित्वार्चिता ४ अरिचिंतयन्क्व० ५ पूर्वजन्म ६ वस ७ कंसवचनेन ८ मिथ्यावाधिना ९ विक्रिया माताः ।

त्यानें पूर्वीच्या जन्मी प्रसन्न करून घेतलेल्या व या जन्मात इष्ट फळ देणाऱ्या याच देवता होत. त्या सात देवतानीं मायारूपें धारण केलीं. निमगज्ञानानें कृष्णाला मात्र ओळखलें.

मात्रन कशुभद्रन्द्वतालरासभिकार्वताः ।
जिघांसन्त्यस्त्राशक्ति कंसमूचिरे ॥ २६ ॥

या सात देवानीं माता, गाडी अर्जुन वृक्षाची जोडी, ताळवृक्ष, गाढव, व घोडा अशी क्रमानें रूपें धारण करून कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्या असमर्थ ठरल्या.त्यानीं कंसास येऊन तसें सांगितलें.

द्रष्टुं स्वविक्रमं हन्तुं रौद्रकृष्णवृषाकृते ।
आयातोऽरिष्टदेवस्य जातु ग्रीवां बभञ्ज सः॥ २७ ॥

आपला पराक्रम दाखविण्यासाठीं अरिष्टदेव बाळाच्या बैलाचें रूप घेऊन कृष्णाला मारण्यास आला. पण कृष्णानें त्याची मान मोडून टाकली.

तच्छ्रुत्वा गोमुखीनामोपवासउद्यनाय तम् ।
पितरौ स्मार्चतो सिश्चद्वलक्षांम्वा क्षरत्कुचाम् ॥२८॥

देवकीवसुदेवानीं त्याच्या पराक्रमाच्या वार्ता ऐकून गोमुखी उपवास केल्याच्या मिषानें गवळ्याचे घरी ते आले. तेथें त्यानीं त्याची

१ यशोदारूपम विरस्तनी माता २ त द्युमलासमर्थमस्माक ३ हरि पराक्रम ४ कृष्णीरामभवन ।

पूजा केली. तेव्हा देवकीच्या स्तनातून आपोआप दुग्धधारा पडल्या.

गोवर्धनमहावृष्टौ छत्रीचक्रेऽयदा गवाम् ।
सोऽहिशय्याधनुः शंखान्पूर्वदेवेगृहजान्स्वयम् ॥२९॥

एकदा अतिवृष्टि झाली असता कृष्णानें गोवर्धन पर्वताचीच छत्री करून गायींचे रक्षण केलें. मथुरेंतील प्राचीन जिनालयाजवळील ग्रामदेवतच्या मंदिरात अहिशय्या, धनुष्य व शंख ही तीन रत्नें कृष्णाला दिसली.

दृष्ट्वा साध्यान्ददाम्येषां साधयित्रे सुतामिति ।
कंसे तद्धोपितेऽसौ तान्मान्वनोऽसाधयन्महान् ॥३०॥

त्या अहिशय्येवर चढून जो कोणी धनुष्याला बाण लावील व शंख वाजवील त्याला मी माझी मुलगी देईन. तेव्हा स्वर्भानु राजाचा मुलगा भानु याच्या नावानें कृष्णानें त्या तीही गोष्टी केल्या. त्यानीं प्रत्यक्ष पाहिले होते ते म्हणू लागले की हें भानूचें काम नसून दुसऱ्या कुमाराचें आहे. तेव्हा कंसानें त्या कुमाराला शोधून आणण्याची आज्ञा केली.

ततः कंसभयात्नष्टे गोष्ठे केनाप्यनुद्धृतम् ।
तनोद्धृत्य हरिःशैलस्तंभं लेभे जनाशिषः ॥ ३१ ॥

त्या आज्ञेमुळें भिऊन नंदगवळी गाव सोडून गेला ज्यागावी ते जाऊन राहिले तेथें एक दगडी खांब होता तो कोणीहि उचलू शकत नव्हते. तो कृष्णानें उचलला व सर्वांची शाबासकी मिळविली.

---

१ मथुरास्थापनार्थे जिनालयाते पूर्वदिशि पुरदेवतागृहे समुत्पन्नान् ।

प्रत्यागते व्रजे भक्त्वा महानागं पितुर्गिरा ॥
कंसं सहस्रपत्राणि ससरोजान्युपाहरत् ॥ ३२ ॥

काहीं दिवसानीं नदगवळी स्वग्रामीं परत आला. तेव्हा त्याला छळण्यासाठीं कालियसर्प ज्याची राखण करतो तें सहस्रकमळ आणून दे अशी आज्ञा कसाने केली नदाच्या आज्ञेने कृष्ण नें नागास जिंकून तेहि आणून दिले.

अथाहूतो नृपेणामामर्द्दनन्दो व्रजन्गजम् ।
भंक्तोत्खातरदाहत्य कृष्णेनोक्तजयो द्युतत् ॥३३॥

आपल्या मल्लामह एका कुस्तीसाठीं येण्यास नदगवळ्याला कसानें आज्ञा केली त्याप्रमाणे काहीं मल्ल व कृष्णासह तो मथुरेत प्रवेश करीत असता त्याच्यानर मदोन्मत्त हत्ती सोडण्यात आला. कृष्णानें त्याला त्याचाच दात उपटून त्या दातानेंच मारलें.

गत्वासभा नियुद्धेऽसौ त प्रायुंक्त नृपाज्ञया ।
सोऽपि रदगं मनिश्यर्द्धा चाणूरं कंसमप्यहन् ॥ ३४

मल्लाचे आखाड्यात ते गेले. चाणूराशीं कृष्णाची कुस्ती जुपली. एका क्षणात त्यानें त्याला चीत्त केलें. तेव्हा स्वत कस द्वंद्वयुद्धास सज्ज झाला. कृष्णानें त्याला कुस्तीत ठार मारून टाकले.

स नाकिमुक्तपुष्पार्घोविपाश्वं यपितरौ वरे ।
नम्रैर्नृपैर्वृत प्रीतःस्वैश्च सूर्यपुरं ययौ ॥ ३५ ॥

१ कालीयनाग २ नीलवान्कस प्रति ३ दलेन ४ व्यक्त हरितिवा ५ नाकिभिर्देवै ६ बंधन छित्वा ७ स्वजातिभि ।

सर्व देवानीं त्यायावर पुष्पवृष्टि केली. त्यानें आपल्या माता-पिताना बंधमुक्त केलें. अनेक माण्डलिक राजे व आपल्या नातलगां-सह तो सूर्यपुराम गेला.

तज्जीवद्यशसःश्रुत्वा क्रुद्धेतान्हन्तुं यदून्सुतान् ।
ज्ञात्वा चक्री जितान्कालयवन प्राहिणोत्स्वजम् ३६

जीवयशेनें जरासंधाला कंसवधाची हकीगत सांगितली तेव्हा त्यानें अपराजिताला व आपल्या मुलाना भारी सेनेसह पाठविले पण पराजित झाला असे ऐकून कायल्यवनाला यानें पाठविले

श्रुत्वायान्तमजय्यं त गत्वाब्धौ यादवाःस्थिताः ।
प्रदीप्याग्निं पृथु वास्थान्मार्गे तत्कुलदेवता॥३७॥

कालयवन चालून येत आहे असें ऐकून सर्व यादव सूरीपुर हस्तिनापुर, मथुरा वगैरे गावें सोडून समुद्रकिनारीं गेले कालयवन याच्या मागे लागला तेव्हा यादवाच्या कुलदेवतेन म्हातारीचें रूप घेऊन खूप दावा ल पेटविला आणि ती म्हातारा जाळतच बसली कालयवनानें हा काय प्रकार आहे म्हणून विचारल्यावर तुझ्या भीतीनें माझ्या यादवपुत्रानीं प्राम याग करून स्वतःला जाळून घेतले आहे. त्याचा हा दावानळ आहे अस उत्तर दिल

वृद्धा मत्पुत्रयर्देव प्रविश्याग्निं भयान्मृता
इत्युक्तोऽस्तियाहद्युर्गत्वा तात तथावदत् ॥ ३८ ॥

१ कंसवधाधिक प्राहितान् २ पुत्र ३ वृद्धा आह मत्पुत्रा यादवाश्च अथवा हे मत्पुत्र हे कालयवन ४ विघट्यति स्म ।

झातारीच्या त्या बोलण्यावर निश्वास ठेवून कालयवन परतला व जरासंधाला त्यानें अभिमानानें आपल्या दराऱ्याचें वर्तमान सांगितलें.

कृष्णःकृताष्टोपवासो वत्सारायोपाब्धिर्नैगमम् ।
आरुह्याश्वाकृतिमेनं सिन्धुं सोऽखण्डयत्सुरेद् ॥३९॥

कृष्णानें समुद्रकांठीं आठ दिवसाचें अनशनव्रत आचरलें तेव्हा नैगमदेवानें येऊन त्याला सांगितलें कीं, घोड्याच्या आकाराचा एक देव येईल त्यावर बसून तू समुद्रात बारा योजनें जा. तुझ्यासाठीं तेथें एक नगरी बनेल. त्याप्रमाणें अश्वरूपी देव आल्यावर कृष्ण त्यावर स्वार होऊन समुद्रांतन गेला. त्यामुळें समुद्र दुभग्न एक बेट बनलें.

तत्र शक्राज्ञया यक्षश्चक्रे द्वारवतीं पुरीम् ।
वसतस्तत्र कृष्णादीन्नेमिकल्याणिकोर्जितान् ॥४०॥

इंद्राच्या आज्ञेवरून कुबेरानें त्या बेटावर द्वारकानगरी वसविली. तेथें कृष्णादि यादव रहात असताना नेमिनाथ तीर्थंकराचीं गर्भ व जन्म कल्याणिकें झालीं.

कुरुवंशे हास्तिनेशाज्जातो व्यास पराशरात् ।
तत्पुत्रो धृतराष्ट्रोऽन्यः पाण्डुश्च विदुरोऽपरः ॥४१॥

हस्तिनापुरात कुरुवंशाचा शक्ति नामक राजा राज्य करीत होता. त्याला शतकी नामक राणीपासून पराशर नामक मुलगा

१ सुरस्य सदयचररय देवस्य स्वामी हरिः २ सत्यवतीगर्भे ।

झाला. त्याचा मुलगा व्यास. व्यासाला सुभद्रा नामक स्त्रीपासून धृतराष्ट्र पांडु व विदुर असे तीन पुत्र झाले.

धृतराष्ट्रो नरपतिर्वृष्णिपुत्र्यां शतं सुतान् ।
दुर्योधनादीन्गान्धार्यां ख्यातवीर्यानजीजनत् ॥४२॥

वृष्णि राजाची मुलगी गांधारीपासून धृतराष्ट्र राजाला दुर्योधनादि शंभर मुलगे झाले.

कामसुद्राधरे पाण्डौ कन्यां कुन्ती गते रहः ॥
जातमुद्धृत्य कालिन्द्याः कर्णं चम्पाधिपोऽपुपत् ॥४३

वज्रमाली नामक विद्याधर हस्तिनापुराजवळ वनक्रीडा करीत असतां आंगठी हरवली व ती पांडूला सापडली. पांडूने त्याला ती दिली. तेव्हा ही आंगठी जवळ असली म्हणजे वाटेल तेव्हां गुप्त होतां येते असे विद्याधरानें त्याला सांगितले. तिचा उपयोग करून कुंतीनामक कुमारीशीं पांडू अदृश्यपणे संभोग करून आला. मुलगा जन्मल्यावर त्याच्या कानात कुंडल घालून पेटींत पत्रासह ठेऊन ती यमुना नदींत सोडून देण्यांत आली. चंपापुरचा राजा आदित्य यास ती पेटी सापडली. त्या बाळकाचें पालनपोषण केलें.

युधिष्ठिरादीन्सोऽनूढ्वा तामेवान्धकवृष्णिजाम् ।
त्रीन्कुन्त्यां मद्यां नकुलःसहदेवस्तुजोऽसृजत् ॥ ४४ ॥

---

१ व्यासस्य पुत्राः सुभद्रागर्भजाः २ गांधारीनाम्न्या ३ उग्रसेन-देवसेनमहासेनानुजाया । ४ उपभुक्तवान् ५ कुंडलरत्नकवचलेखपत्र युक्त मञ्जूषाया क्षिप्त कुंतीपरिजनैः ६ राधाकर्णग्रहणादादित्येन चंपाधिपेन कृत कर्ण संज्ञं चापुषत् राधाख्यायै स्वपत्न्यै दत्वाऽपुषत् ७ पुत्रानेवं पंच असृजत् अजीजनत् ।

पुढें पंडु राजाचा विवाह त्याच अन्धकवृष्णीच्या कुंतीनामक मुलीबरोबर झाला. व तिच्यापासून त्याला युधिष्ठिर, अर्जुन व भीम असे तीन आणि कुंतीपासून नकुल व सहदेव झाले.

दुर्योधनादयो व्याजं जरासंधमथाभजन् ।
युधिष्ठिरादय कृष्णं विपक्षक्षपणोद्यतम् ॥ ४५ ॥

दुर्योधनादिकानीं कपटी जरासंधाचा पक्ष घेतला व युधिष्ठिरादिकानीं शत्रूचा नाश करण्यास उद्युक्त झालेल्या कृष्णाचा पक्ष घेतला.

मागधैःसन्मणीन्राजगृहे वीक्ष्योपदीकृतान् ।
ते चक्रिणेति क माक्षा इति पृष्टा जगुःभर्म। ॥ ४६ ॥

मगधदेशातील कांहीं वैश्य समुद्रमार्गानें व्यापार करीत असता द्वारकेस आले व तेथील वैभव पाहून चकित झाले. तेथें त्यानीं रत्नमाणिकाची खरेदी केली व स्वदेशीं परत गेले. जरासन्धरानाला तीं रत्नें त्या व्यापाऱ्यानीं दाखविली व हीं कोणत्या देशातील आहेत असें त्यानें विचारलें असता ते म्हणाले,

मध्येऽब्धिद्वारवत्यास्ते दिव्या यदुंसभर्तृका ।
तत्रं वायुवशात्प्राप्तैर्दृष्टास्माभिरथार्जिता ॥ ४७ ॥

आम्हीं नेहमींच्या मार्गानें प्रवास करीत असता वाऱ्यानें भलतीकडे नेले गेलों. तेव्हा आम्ही द्वारावती बेटास लागलों. हें बेट राजा

१ मगधदेशचे व्यापारी. २ यदुना हरिणा सभर्तृका सनाथा। ३ अब्धौ ।

कृष्णानें सनाथ केलें आहे. ते फार भरभराटींत आहे तेथून आम्ही हीं रत्नें आणलीं.

श्रुत्वैतत्प्रभृशं क्रुद्धो युष्मान्प्रत्याह दर्भदान् ।
इति नारदाचारोक्त्या ज्ञात्वा यातं निषूदितुम् ॥ ४८

यादवाचें नाव ऐकल्याबरोबर जरासंध चिडला व तें वैभवशाली वर्णन एकून नर त्याचा नाश करण्यासाठीं एकदम निघाला. नारदानीं तो चालून येत असल्याचें वर्तमान कृष्णाला सांगितलें. माझ्या जावयाला मारून पळून जाऊन लपून बसलेले असून वैभवाचा डौल मिरविणारे मत्तपाल हे यादव आहेत असें जरासंध ह्मणाऱ्याचेंहि नारदाने कृष्णाला सांगितलें

यामोऽरिं त्वं पुरीमेता रक्षेति स्वरचैःस्मृते ।
ॐ मित्युक्तवतःस्मित्वा नेमेर्ज्ञात्वा जय मिताल् ४९

या नगरीवर शत्रु चालून येत आहे. तू तिचं रक्षण कर असें श्रीकृष्ण नेमिनाथाना ह्मणाले तेव्हा ते ओम् ह्मणून हसले. त्यावरून आपणाला जय मिळणार असें त्याना वाटलें

कुरुक्षेत्र गत क्षिप्रं स्वर्बलैरपरैररिम् ।
हत्वा तन्मुक्तचक्रेण जितारिरविशत्पुरीम् ॥ ५० ॥

आपलें व मित्रराजाचें सैन्य एकत्रित करून कृष्ण कुरुक्षेत्राला गेला. तेथें घनघोर युद्ध झालें. जरासंधानें सोडलेल्या चक्रानेंच

१ मज्जमातर हत्वा प्रपलाय्य प्रगोपने स्थितत्वान्मिथ्यागार्विग चर्की इत्याह २ हठु ३ स्वरपशाने भांठु ४ पाडवादिसेन्ये ५ जरासंधमुक्तचक्रेण

त्याला कृष्णानें मारलें. याप्रमाणें जय–मिळवून त्याने नगरींत प्रवेश केला.

चक्रशक्तिगदाशङ्खधनुर्दण्डासयो हरेः
रुक्मिण्याद्यष्टदेव्योऽस्त्रीसहस्राणि षोडश ॥ ५१ ॥

चक्र, शक्ति, गदा, शख, धनुष्य, दड, तलवार वगैरे श्रीकृष्णाची दिव्य अस्त्रे होती रुक्मिणी त्याची पट्टराणी असून त्याला सोळाहजार स्त्रिया होत्या.

रत्नमालागदासीरमुशलान्यथ सस्मित.ः ।
देव्यश्चासन्बलस्याष्टौ मिथ प्रीतौ सुख स्थितौ ॥ ५२

रत्नमाला, गदा, नांगर, मुसळ, ही बलदेवाचीं आयुधे होतीं त्याला आठ हजार स्त्रिया होत्या. ते सुखानें एकमेकावर प्रेम करीत काळ घालवीत होते

जात्वद्यान्ते जलक्रीडामनोहरसरोवर ।
सडक्रान्तैर्यादवैः श्रे तत्राभून्नेमिभामयोः ॥ ५३ ॥

एकदा सर्व यादव मनोहर सरोवरात जलक्रीडा करण्यास गेले. तेथे नेमिनाथ व सत्यभामा याचा मनोहर सवाद झाला.

सल पःसेचनाद्यन्ते लाडीद क्षालयेति वाक् ।
सत्यभामा प्रतिस्नानवस्त्र नेमि स्वमाक्षिपत् ॥ ५४ ॥

१ अथ महादेव्य इत्त पृजिचा वा २ बलभद्रस्याष्टौ सहस्राणि ३ शारत्काल ४ नामैतत् ५ जलक्रीडावसाने ६ उक्त्वा ।

पाण्यग्रहक्षणेऽन्यद्युःस्वराज्ये नाशशङ्कया ।
मृगानारुध्य वृत्त्या ता शिक्षयित्वा स रक्षकान्॥५८

पाणिग्रहणाचे वेळीं दुसरे दिवशीं कृष्णाला अशी शंका आली कीं, नेमिनाथ आपल्या राज्याचे वाटेकरी होतील. ह्मणून शिकाऱ्याकडून पुष्कळ पशु मेजवानीच्या मांसासाठीं त्यानें आणविले ही हिंसा पाहून नेमिनाथ संन्यास घेतील अशी त्याला खात्री होती. पशु कशाला आणले ह्मणून त्यांनीं विचारल्यास मारून त्यांच्या मांसाची पक्वान्नें मेजवानीं देण्यासाठीं ते आणले आहेत असें स्पष्ट उत्तर देण्यास कृष्णानें रक्षकाना शिकवून ठेविलें

त्वद्विवाहे व्ययीकर्तुं कृष्णेनैते इति ।
तैः प्रत्यालापयन्नेमिं यातैमालोकितुं दिशः ॥ ५९ ॥

दिशावलोकनासाठीं नेमिनाथ पालखींत बसून चालले असता ते हरिण पाहून त्यांनीं विचारले व कृष्णानें शिकविल्याप्रमाणें रक्षकांनीं उत्तर दिलें

ज्ञात्वा तच्छद्म निर्विद्य सस्मृत्य स्वपुराभवान् ।
शोकार्तामविरामुक्त्वा स राजमतिराजकः ॥ ६० ॥

कृष्णाचें कपट नेमिनाथांनीं ओळखलें व वैराग्य पावून स्वत:च्या पूर्व जन्माचें स्मरण केलें. दु:खी मातेला उपदेश करून राजी-

१ हस्तादकक्षणसमय २ उत्तरमकारयत् ३ गत क्त ४ राजिमत्या राजपुत्र्येण च रहित ।

मति रडत आहे असे पाहून तिलाहि बरोबर घेतलें व हजारो राज-पुत्रासह दीक्षा घेतली.

सहस्राम्रवनं श्रित्वा तप पद् पञ्चवासरान् ।
नीत्वोर्जयन्ते कैवल्यं प्राप्य मोहं विहत्य सः ॥६१॥

ते सहस्राम्रवनात जाऊन राहिले व पासष्ट दिवस त्यानीं अनशन व्रत आचरलें. पारणें केल्यानंतर त्याना केवल्यज्ञान झालें. यानीं मोहाचा नाश केला.

प्राप्तो रैवतकोद्यानं कृष्णं तत्त्वमबूबुधत् ।
देवकीसत्यभामाद्या गणीडिष्टां कथां निजाम् ॥६२॥

रैवतकउद्यानात येऊन त्यानीं कृष्णाला तत्वोपदेश केला. देवकी, सत्यभामा वगैरे स्त्रियानींहि येऊन गणधराना त्यानीं आपापली भवावली विचारली.

प्रद्युम्नादि भवान्पृष्ट्वा ज्ञात्वा पृष्टो हर कियत् ।
राज्यं भावीतितत्प्रेम्णा सीरिणा नेमिरब्रवीत् ॥६३॥

प्रद्युम्नाची भवावली विचारून ऐकल्यावर हराच्या प्रेमानें बलदेवानें नेमिनाथाना प्रश्न विचारला कीं हें हरीचें राज्यवैभव किती दिवस टिकेल. तेव्हा ते ह्मणाले.

द्वीपायनस्तपो लात्वा प्रेर्प्यं मत्यंत्यधक्ष्यति ।
द्वारकां द्वादशाब्दान्ते मत्तयादवकोपित ॥ ६४ ॥

---

१ गणींद्रा भाविता २ हरिस्नेहेन ३ दशांतर गत्वा पश्चादागत्या

बारावर्षानंतर मद्यपानानें मदोन्मत्त झालेल्या यादवाकडून राज्य नष्ट होईल. द्वीपायन तप आचरून यादवामुळें क्रोधित होऊन द्वारकानगरी जाळून टाकील.

हरिं जरत्कुमारोऽपि कौशाम्बीगहनान्तरे ।
सुप्तं तृषार्तं वर्णेण भ्रान्त्या सद्यो हनिष्यति ॥६५॥

कौशाम्बी जवळील गाढ काननात कृष्ण तान्हेनें व्याकुळ होऊन निजला असता जंगली हरिण समजून जरत्कुमार तात्काळ त्याला ठार मारील.

एतच्छ्रुत्वाप्तनिर्वेदा विद्वांसः स्वाम्यनुज्ञया ।
प्रद्युम्नरुक्मिणीमुख्या मोक्षीं दीक्षामशिश्रयन्॥६६

वरील भविष्य ऐकून शहाण्याना वैराग्य उत्पन्न झाले व प्रद्युम्नादि मुलें व रुक्मिणी वगैरे स्त्रियांनी मोक्षपददायी दीक्षा स्वामींच्या म्हणजे कृष्णाच्या आज्ञेनें घेतली.

सन्भवश्चानिरुद्धश्च तन्नाशं वीक्ष्य दीक्षितौ ।
प्रद्युम्नश्चाथ निर्वाणा गिरनारीत्रकूटगा ॥ ६७ ॥

द्वारकेचा नाश होणार हें पाहून सभव व अनिरुद्धानेंहि दीक्षा घेतली व प्रद्युम्नासह ते गिरनार पर्वतावर मोक्षाला गेले.

रुक्मिण्याद्याः छुसंरत्यन्ति घोरन्युतास्तपसाऽच्युतः ।
धर्मातोऽनैत्य माहेन्द्राद्धलस्तीर्थं करिष्यति ॥ ६८ ॥

७ द्वारावतीदाहारिक ।

रुक्मिणी वगैरे स्त्रिया अच्युत नामक स्वर्गांतून येऊन, नंतर मोक्षाश जातील. बलदेव माहेंद्र स्वर्गांतून येऊन व कृष्ण प्रथम नरकांतून येऊन तप करून येथें तीर्थ वनवितील अर्थात् तीर्थंकर होतील.

नेमि पुनर्विहृत्योर्वी पल्लव देशमास्थितः ।
अथ भारतसंक्षेपो लाक्षावेश्मवेशिता ॥ ६९ ॥

नेमिनाथ पुढे विहार करीत पल्लव देशात गेले. भारत संक्षेपानें असें आहे. पांडव लाक्षागृहांत कुरकडून वैरामुळे टाकले गेले.

कुरुभि सहजारित्वान्निर्गत्यातःसुरंगया ।
सापदानन्तु द्रौपद्याः काम्पिल्यायां स्वयंवरम् ॥७०॥

पण कपट ओळखून सुरंगाच्या रस्त्यानें पांडव लाक्षागृहातून निसटले व अद्भुत कर्मे करून त्यांनीं कंपिला नगरींत प्रवेश केला.

पविष्टा पाण्डवास्तत्र विद्धराधो युवॉनृप ।
तत पार्थात्सुभद्रायामभिमन्युरसौत्सुतः ॥ ७१ ॥

तेथें त्यानीं स्वयंवरमंडपात प्रवेश केला व अर्जुनानें राधावेध (मत्स्यभेद) करून द्रोपदी मिळविली पुढें सुभद्राहरण अर्जुनानें केले व तिच्या पासून त्याला अभिमन्यु नामक मुलगा झाला.

द्रौपद्यामिगप्तुमाँनाश्च सूनवोऽन्वभवन्नमात् ।
देशानिमान्स्तितिर्गुप्त भ्रान्त्वा दर्शितविक्रमा ॥७२॥

१ दुर्योधनाद्यैः २ हस्तिनागपुरस्थितेन विदुरेण उद्दालकराम प्रस्थाप्य नगराद्बहिर्लाक्षागृहनिर्मापण व्याजेन निर्मापितया सुरंगया ३ अद्भुतकर्मणासह. प्रविष्टा ४ द्रुपदस्य दृढरथाया पुत्र्या. ५ अर्जुन. ६ प्रसूते स्म ७ पंच प्रमाणा ८ भूमौ प्रच्छन्न यथाभवति तथा ।

अर्जुनापासून द्रौपदीलाहि क्रमानें पाच मुलगे झाले. सर्व देश अज्ञातवासात हिंडून पाच पांडवानीं पराक्रम प्रगट केला.

द्यूतं रन्त्वा धर्मपुत्रो दुर्योधनमहीभुजा ।
जित्वा कुरूनकुरुक्षेत्रे श्रित्वापाग्मधुरामभूं ॥ ७३ ॥

दुर्योधन राजा बरोबर धर्मराजा द्यूत खेळला व हरला ह्मणून तो अज्ञातवास प्राप्त झाला होता. पण त्यानंतर कौरवाना जिंकून त्यानीं दक्षिणमथुरेंत वास केला. त्यानी पुष्कळ देशातून भ्रमण केलें.

श्रुत्वा द्वारवतीदाहमाप्य निर्वेदमर्हतैः ।
ज्ञातजन्मान्तरास्ते निर्ग्रन्था शत्रुञ्जये स्थिताः ॥७४ ॥

द्वारका भस्मसात् झालेली ऐकून त्याना वैराग्य प्राप्त झाले व नेमिनाथाकडून आपली भवावली ऐकून ते निर्ग्रंथ मुनि झाले व शत्रुंजयावर गेले.

द्विट्स्वस्रियाहतास्तप्तलोहभूषा विसेहिरे ।
कौन्तेयास्तेष्वगुः सिद्धिं माद्रेयौ त्वंतिमां दिवम् ७५

तेथें ते तपश्चर्या करीत असता दुर्योधनाचा भाचा आला व त्याने तापलेल्या लोखडाची राजभूषणें त्याच्यावर घातलीं तरी त्यानीं ध्यानावस्था सोडली नाहीं. त्यामुळें कुंतीचे तीन पुत्र सिद्ध-पदाला गेले व माद्रीचे दोन पुत्र अनुत्तर पाचव्या सर्वार्थसिद्धि नामक स्वर्गांतील विमानात देव झाले.

१ दक्षिण मथुरा २ प्रतपवि स्मके पाडवा' किं कृत्वा देशान्भ्रान्त्वा. ३ नेमेः समीपात् ४ आतापनयोगेन स्थिता. ५ दुर्योधनभागिनेय कुर्यवराख्य.

कुन्तीसुभद्रादौपद्यौनिर्वास्यंत्यच्युताच्च्युता ।
प्राग्बद्धनरकायुष्कः कृष्णोऽनुभाद्धशुद्धदृक् ॥ ७६ ॥

अच्युत स्वर्गांतून आलेले कुंती, सुभद्रा, द्रौपदी वगैरे स्त्रिया चे जीव मोक्षाला जातील. नरकातील आयुकर्म बांधलेला कृष्णाचा जीव भावापासून म्हणजे नेमिनाथाजवळून शुद्ध सम्यक्दृष्टि प्राप्त करून घेता झाला व तीर्थकर नामकर्माचा बंध करून प्रथम नरकात जन्मला.

भ्रातुराप्तान्त्यनामागाच्छ्वभ्रं तच्छत्रुरप्ययात् ।
नेमौ सिद्धेऽथ साकेते चूलायां ब्रह्मणो नृपात् ॥९८

त्याचा शत्रु जरासंध सुद्धा मरून तेथेंच गेला. नेमिनाथ सिद्ध-पदाला गेले. नंतर अयोध्येत ब्रह्मराजा व चूलाराणींचा मुलगा ब्रह्मदत्त चक्रवर्ती झाला.

स्वर्गादेत्य सुर कश्चिद्ब्रह्मदत्त सुतोऽभवत् ।
स भूत्वार्त्रातिमधन्नी प्राविक्षत्सप्तमीं क्षितिम् ॥९९

तो स्वर्गांतून येऊन चक्रवर्ती बनला होता व मेल्यानंतर सातव्या नरकाल गेला.

सुभानु प्राग्जश्चित्रागद खेटोऽर्ये तुर्यभूः ।
शङ्खो महाशुक्रसुर सीरी माहेंद्रजो जिनेट् ॥ १००

सुभानु पहिल्या स्वर्गांतील देव, चित्रांगद विद्याधर, चौथ्या

१ नेमेरुपदेशात्प्राप्तसम्यक्त्व २ जरासंध ३ सौधर्मजा देव ४ स्वर्गचतुर्थमाहेंद्रदेव ।

स्वर्गातील देव, शंखश्रेष्ठी, महाशुक्र विमानातील देव इतकी भवावली फिरून बलदेव झाला. आता तो महेंद्रस्वर्गांत आहे. पुढे तीर्थंकर होईल.

अमृतरसायनपलपचतृतीय नरकोद्भवस्थान ।
यक्षोभूर्निनामा महादिशुक्रोऽच्युतोऽथ धार्मोर्हन् १०१

अमृतरसायन स्वयपाकी, तिसऱ्या नरकातील जीव, यक्ष नावाचा मनुष्य, निर्नामा, महाशुक्र विमानातील देव अशी भवावली भोगून कृष्णाचा जीव नरकात गेला व पुढे तो तीर्थंकर होईल.

॥ इति श्रीनेमिनाथपद्मकृष्णजरासन्धब्रह्मदत्तचक्री चरितोत्तरं द्वाविंशम् ॥२२॥

पोदनेऽरविन्दस्य राज्ञो मन्त्री वराद्विज ।
मरुभूतिरभूद्राज्ञा सहमाप्तागमश्रियात् ॥ १ ॥

या जंबुद्वीपात दक्षिणभरतक्षेत्रात पोदनपुरच्या अरविंद नामक राजाचा मरुभूति नामक ब्राह्मण मंत्री होता. राजासह त्यानेंहि आगमाचें ज्ञान मिळविलें होतें. फार पूर्वीपासून तो त्याचा मंत्री होता.

स्वतें वरुणर्या ज्येष्ठे स्वभ्रातृकमठे स्त्रिया
रमुन्धरीं भवरकान्तां स्वभ्राता भजतीति स ॥ २ ॥

१ जंबूभरते २ श्रुतिस्मृतिशास्त्रविदित्यर्थ. राजासि प्राप्तागम ३ दायराल्पयत ४ कमठभाय ५ कथेन।

त्याल. कमठ नामक भाऊ होता. त्याच्या स्त्रीचें नांव वरुणा व मरुभूतीच्या भार्येचें नाव वसुंधरी होतें. कमठाचें प्रेम वसुंधरीवर होतें व तिच्याशी तो रममाण होऊं लागला. तुझा भाऊ तुझ्या भार्येला भोगतो असें वरुणेनें मरुभूतीला सांगितलें.

तामाश्वास्यान्यदा छन्नो दृष्ट्वा तच्चेष्टितं स्वयम् ।
विज्ञाप्येशं विगोप्यासौ तं शठं निरवासयत् ॥ ३ ॥

तिला योग्य अश्वासन देऊन मरुभूतीने स्वतः लपून बसून त्याच्या प्रेम चेष्टा पाहिल्या व राजाला सांगून कमठाला हद्दपार करविलें.

गत्वोपसिंधु पञ्चाग्नितपः कुर्वन्स मोहतः ।
तेनान्यदा स्वनृपेशाद्याच्याश्रित्य प्रणामिना ॥ ४ ॥

सिंधू जवळील तापसपल्लीत शिवतपऱ्याजवळ जाऊन कमठाने पंचाग्नि साधन केलें. मरुभूतीनें पुन्हा राजाला विचारून कमठाचा आश्रय घेतला. त्याची तो भक्ती करीत असे.

प्रसाद्यमानस्तं क्रोधाज्जघान शिलया तत ।
मलये कुब्जकाख्याने स जातः सल्लकीवने ॥ ५ ॥

एकदा मरुभूति त्याचे पुढे नमून प्रार्थना करीत असता पूर्व-वैर स्मरून, क्रोधानिष्ट होऊन कमठानें त्याला दगडानें ठेचून मा-

१ प्रच्छन्नो मरुभूतिः २ खरारोहणोच्छिष्टशरावमालागलारोपणादिकं कारयित्वा ३ निर्धाटित. ४ नदीतीरे तापसपल्ल्या शिवतापससमीपे ५ अज्ञानात् ६ मरुभूतिना ७ निजनृपस्य कथयित्वा ८ तं कमठं आश्रित्य ९ प्रणामोस्यास्तीति प्रणामी तेन प्रणामिना प्रणतवता १० मरुभूति ।

रलें. तेव्हां मेल्यावर तो मलयपर्वतावरील कुब्जक नामक सल्लकी वनांत हत्ती झाला.

वज्रघोषो गजेन्द्रोऽस्य वशासीद्वरुणा प्रिया ।
सार्थेनामारविन्दश्च यान्तं सम्मेदमर्हतः ॥ ६ ॥

त्याचें नांव वज्रघोष होतें. वरुणा मेल्यावर पूर्वप्रेमामुळें हत्तीण बनून त्याच्याजवळ राहिली. श्रावक संघाबरोबर सम्मेदशिखराला यात्रेस जातां जातां अरविंदराजानें मुनि झाल्यावर त्याच वनांत मुक्काम केला होता.

वन्दितुं तत्सरस्तीरे प्रतिमायोगमास्थितम् ।
सार्थं भंक्त्वा हन्तुकामो वत्सं श्रीवत्सलाञ्छनम्॥७॥

त्या वनांतील तळ्याजवळ मुनि झालेला अरविंद राजा प्रतिमायोग धारण करून ध्यानस्थ बसला असतां वज्रघोष हत्ती. संघ विध्वस्त करून त्याला मारण्यासाठीं आला. तेव्हां त्याला मुनीचे छातीवरील श्रीवत्सलांछन दिसलें.

तस्य दृष्ट्वांजसा जातिस्मरो स्नेहोद्बभूव सः ।
तेन प्रबोधितो धर्मं श्रावकव्रतमग्रहीत् ॥ ८ ॥

तें चिन्ह पाहून त्याला पूर्वजन्माचें स्मरण झालें व राजभक्तीमुळें त्याला मारण्याचें विसरून त्याच्यापुढें सोंड नमवून तो बसला. ध्यान उतरल्यावर अरविंदमुनीनें त्याला श्रावकव्रतें दिलीं.

१ हस्तिनी २ सल्लकीवनाय ३ वशासि ४ स्वामिस्नेहेन ।

तदाभ्यत्यघाद्भिव्यङ्ग्ना शाखा परैर्द्विपैः ।
शुष्काणि तृणपत्राणि खादन्विध्वैस्तमम्बु च ॥९॥

तेव्हांपासून पापभयानें तो हत्ती जलक्रीडा करीना व वनहि उध्वस्त करीत नसे. इतर हत्तीनीं पाडलेला पाला पाचोळा व अचित्त पाणी तो पिऊन श्रावकव्रत पाळीत असे

पारणायां पिबन्क्षीणः पातुं वेगवतीं चिरात् ।
पङ्कमग्नः समुद्धर्तुं यतमानोऽप्यशक्नुवन् ॥ १० ॥

एकदा अनशन व्रत आचरल्यावर पारणे करण्यासाठीं तो वेगवती नदीतीरीं आला व चिखलात रुतला फार अशक्त झाला असल्यामुळें बाहेर निघण्यासाठीं खूप धडपड केली तरीहि तो निघू शकला नाहीं

मृतो दष्ट कुक्कुटाहीभूतेन कमठेन च ।
सहस्रारे सुख भुक्त्वा स त्रिलोकोत्तमे पुरेम् ॥११॥

कमठाचा जार मरून कुक्कुट सर्प झाला होता त्यानें पूर्व वैर स्मरून हत्तीला दंश केला यामुळें तो मरून सहस्रार स्वर्गांतील देव बनला

जातोऽत्र पुष्कलावत्यामग्निवेग खगोऽन्यदा ।
स तपस्यन्हरिगिरेर्गुहायां कवलीकृत ॥ १२ ॥

स्वर्गातून तो जंबूद्वीपात विदेहक्षेत्रात, पुष्कलावती देशात,

१ उपलास्फालनाक्षपगजघट्टना प्रासुकीभूत २ अग्निवेग ३ के मस्तके वलीकृत वेष्टित गिलित इत्यर्थ ।

विजयार्धपर्वतावरील त्रिलोकोत्तमपुरात विद्याधराचा राजा विद्युद्गति व राणी विद्युन्माला यांच्या पोटीं अग्निवेग नामें करून जन्मला. त्यानें खूप सुखोपभोग भोगल्यावर दीक्षा घेतली. हरी नामक पर्वतातील गुहेत तो तपस्या करीत असतां त्याच्या डोक्याला अजगरानें वेटाळे घातले. अर्थात गिळिलें.

इतस्तेन सुभद्राख्येसे ग्रैवेयकेऽपश्चमे।
भुक्त्वान्तुतोऽभूदानन्द ऐक्ष्वाकु कोशलेश्वरः ॥१५॥

वज्रनाभि मुनि समाधिमरण साधून सुभद्र नामक मध्यम ग्रैवेयक विमानांत अहमिंद्र देव झाला. तेथून तो जंबुद्वीपांत कोशलदेशांतील अयोध्या नगरीचा इक्ष्वाकुवंशाचा राजा वज्रबाहु व राणी प्रभावती यांच्या पोटीं आनंद नामें करून जन्मला.

कुर्वन्नष्टाह्निके चैत्ये स स्वामिहितमन्त्रिण ।
वाचाभ्यर्च्य जिनेंद्रार्चा पप्रच्छ द्रष्टुमागतम् ॥१६॥

एकदा त्यानें नंदीश्वर पर्वांत च याच्यांत अष्टाह्निक महोत्सव स्वामिहित नामक मंत्र्याच्या सल्ल्यानुसार केला तेव्हां तेथें दर्शना साठीं आलेल्या मुनांना त्यानें विचारलें

नत्वा विपुलमत्याख्यं गणेश भगवन्फलम् ॥
अचेतना जिनेंद्रार्चा भाचता किं भवेदिति ॥ १७ ॥

निपुलमति मुनींना नमस्कार करून तो ह्मणाला, जिनेंद्राच्या अचेतन अशा मूर्तीचें पूजन केलें असता पूजकाना काय बरें फल मिळतें ?

सोऽप्योचदचिदप्यर्हन् सोत्पादजगता ध्रुवम् ॥
न वस्तुतत्परीणामप्रकर्षे पुण्यपुञ्जकृत् ॥ १८ ॥

---

१ मध्यग्रैवेयकत्रितयमध्यविमाने २ जिनगृहे ३ पूजयता भव्याना ४ गणेशः ५ चेतनारहिताऽपि ६ सह उत्पादेन वर्तते जगति तया सोत्पादजगता वस्तुपदार्थ. परिणामप्रकर्षे कृता पुण्यपुजकृत् किं न भवति अपि तु भवति।

तच्छ्रुत्वा शुद्धवृत्तेन विश्वार्हद्देहवर्णनम् ॥
भोगपर्याम्णि प्रतीयार्कबिम्बस्थजिनमन्दिरम् ॥ १९ ॥

ते ह्मणाले कीं अर्हद्बिंब जरी अचेतन असलें तरी उत्पन्न होणाऱ्या पदार्थावर परिणामाचा प्रकर्ष केला तर ते पदार्थ पुण्य पुद्गलाचा स्कंध बनविल्याशिवाय कसा राहील? जिन बिंबातील पुण्य पुद्गलाचा समुदाय भव्य जीवाना शुभ परिणाम उत्पन्न करण्यास निमित्त होतो. जिनबिंबामुळें जिनमंदिरहि पवित्र ठरते वगैरे उपदेश ऐकून त्या राजानें सूर्यविमानांत असलेल्या जिनमंदिराची भावपूजा केली.

इमं सान्तर्जिनगृहं कारयित्वार्कमण्डलम्।
चक्रे महेज्यां सूर्यार्घालोकं विशुजिनालयम् ॥२०॥

त्यानें राजवाड्यामध्ये रत्नखचित सुवर्णाचें जिनालय बांधून यांतील सूर्यविमानस्थ जिनबिंबाची महापूजा केली. या महापूजा ह्मणजे चतुर्मुख पूजा, रथावर्तपूजा, सर्वतोभद्र पूजा वगैरे होत सूर्याला अर्घ्य दिल्यावर ज्यात जिनबिंबदर्शन केलें जातें ती सूर्यार्घालोक पूजा त्यानें केली.

प्रत्यन्वहं ददे लोकं जिनेज्यायां युनक्ति च।
तदाप्रभृति लोकेऽस्मिन्जातमर्घोपसेवनम् ॥२१॥

तो राजा दररोज सूर्यार्घालोक पूजा करतो तें पाहून सर्व

---

१ सूर्यविमाने प्रतीय २ राजमंदिरमध्य ३ चतुर्मुखरथावर्तसर्वतो भद्राद्याः ४ सूर्यार्घेण आलोकः अवलोकन यत्र।

प्रजाजन सूर्याला अर्घ्य देऊ लागले व तेव्हापासून सूर्योपासना रूढ झाली.

समुद्रदत्तात्सवृत्त पलितात्सान्त्यनामभृत् ।
शयु श्वभ्रादेत्य सिंहीभूतेनानतमघ्ययत् ॥२२॥

बरीच वर्षे राज्यवैभव भोगीत असता डोईचा शुभ्र केस पाहून त्याला वैराग्य उत्पन्न झालें व समुद्रदत्त मुनीजवळ त्यानें दीक्षा घेऊन षोडशभावनांचें चिंतन केलें व तीर्थंकर नामकर्म बांधलें. कमठाचा जीव नरकांतून सिंहयोनींत जन्मला होता. पूर्ववैर स्मरून त्यानें ध्यानमग्न असता राजाला उपसर्ग केला व मरून तो आनत स्वर्गांतील प्राणत विमानांत देव झाला.

ततोऽनैत्य सकाशीशाविश्वसेनतुजोऽभवत् ।
षोडशाब्दवया प्राप्तो वनं श्वभ्रादुपेत्य तम् ॥२३॥

तेथून तो जीव काशीचा राजा विश्वसेन व ब्रह्मादेवी यांच्या पोटीं पार्श्वनाथ नावानें जन्मला सोळाव्या वर्षी एकदा तो वनात गेला. कमठाचा जीव नरकातून निघून प्रभूच्या मातेचा बाप महीपाल राजा होऊन जन्माला आला.

महिपालाख्यात्ममाता महीभृत प्रियामृते
दीक्षित दारु भिन्दन्तमार्ष्टे तीव्रायितु जगौ ॥ २४ ॥

१ गुरा २ अजगर ३ अधोष्टे स्म आनतैदोऽभूदित्यर्थ सिंहेन कृत्वा ४ आनतात् ५ ब्राह्मीदव्या ६ कमठचर ७ प्राप्त स्वयं दृष्ट ८ पुनः प्रदीपितु अग्निं ।

निर्ग्रंथपणाला म्हणजे दिगंबरत्वाला हें आचारण निंदास्पद आहे म्हणून तू वेषांतर कर असें देवतांनीं सांगितल्यावर त्यानें परिव्राजक वेष धारण केला.

तेनार्हतोऽपि सद्धर्मं किं तु दर्पात्तमोहृत् ।
तपोभिः साङ्ख्यतत्त्वानि कपिलादीनजिग्रहत् ॥ ६ ॥

ऋषभतीर्थंकरापासून दीक्षा घेतली असूनहि तो तें व्रत पाळूं शकला नाहीं. सद्धर्म सोडून त्यानें सांख्य नामक मिथ्यात्व-मत गर्वानें सुरू केलें व कपिलादि अनेक तपस्वी त्याचे शिष्य झाले.

एवं ब्रह्मामर सोऽभूद्द्विजोऽत्र जटिलोऽनैय ।
सौधर्मदेवो य पुष्पमित्रसौधर्मनाकतः ॥ ७ ॥

पुढे तो मेल्यानंतर पाचव्या स्वर्गांत देव झाला. तेथून अयोध्या नगरींत कपिल ब्राह्मणास कालीपासून जटिल नामक पुत्र झाला. तोहि लवकरच परिव्राजक बनला व मेल्यानंतर सौधर्म स्वर्गांत देव झाला. नंतर स्थूणागार नगरींतील भारद्वाज ब्राह्मणास पुष्पदन्ता स्त्रीपासून तो पुष्पमित्र नावानें पुत्र जन्मला. त्यानेंहि परि-व्राजक दीक्षा घेतली व मेल्यावर तो सौधर्म स्वर्गांत देव झाला.

विप्रोऽग्निसहःसानत्कुमारश्चाग्निमित्रक ।
ततो माहेन्द्रजो भूत्वा भारद्वाजोऽथ तद्द्युज ॥ ८ ॥

१ आदिनाथमुपसत्य दर्पमानोदयात्त सद्धर्मं नैव सद्धर्मेण सर्द्धते स्म २ पूर्वं तपा माहयित्वा ३ न्यायरहित मिथ्यादृष्टि. ४ तद्द्युज माहेंद्र स्वर्गजः ।

तेथून तो सूतिका नगरींतील अग्निभूतिनामक ब्राह्मणास गौतमीपासून अग्निसह नावानें पुत्र झाला. परिव्राजक दीक्षा घेऊन मेल्यावर तोहि सनत्कुमार स्वर्गांत देव झाला. पुढे मंदिर नगरातील गौतम ब्राम्हणास तो कौशावीपासून अग्निमित्र नावानें झाला. व परिव्राजक बनून मेल्यावर माहेंद्र स्वर्गांतदेव झाला पुढें त्याच नगरींत मालकायन ब्राम्हणास मंदिरा स्त्रीपासून भारद्वाज नामक पुत्र झाला. त्रिदंडी दीक्षा घेऊन त्यानें खूप तपश्चर्या केली. मेल्यावर तो माहेंद्र स्वर्गांत देव झाला.

ततस्त्रसस्थावरेषु सर्वश्वभ्रेषु चोत्कटम् ।
कष्ट स्थावरविप्र सन्माहेंद्रं प्राप पूर्ववत् ॥ ९ ॥

नंतर या जीवानें त्रस व स्थावर योनींत अनेक जन्म घेतल्यावर तो राजगृही नगरींत शांडिल्य ब्राह्मणास पाराशरीपासून स्थावर नावानें जन्मला परिव्राजक बनून मेल्यावर तोहि माहेंद्र स्वर्गांत देव झाला.

विश्वनन्द्यथ नार्पत्यो भूत्वा निर्ग्रन्थदीक्षया ।
महाशुक्र गताऽथाभूत्त्रिपृष्ठोऽथान्त्यनारकः ॥ १० ॥

पुन्हा मगधदेशात राजगृहीचा राजा विश्वभूति व राणी जैनी यांच्या पोटीं विश्वनंदी नावानें जन्मला त्यानें दीक्षा घेतली व गायीचा धक्का लागून मेल्यावर महाशुक्रस्वर्गात वैमानिक

१ नृपति पुत्र

देव झाला. तेथून तो पोदनपुरचा राजा प्रजापति व राणी मृगावती यांच्या पोटीं त्रिपृष्ठ नावानें जन्मला.

सोऽथ सिंहोऽथ घर्मोऽत सिंहो योऽभूत्स जात्वदन् ।
किञ्चिन्मृगमवष्टभ्य सहामितगुणेन खे ॥ ११ ॥
यतोजितञ्जयेनैनं दृष्ट्वैवं तीर्थनाथतः ।
स्मृत्वोपेत्य तमभ्यास्य शिलामेवमुवाच स ॥ १२ ॥

त्रिपृष्ठ अर्धचक्रवर्तीनें बरेंच वैभव भोगल्यावर मरून तो सातव्या नरकांत गेला तेथून सिंहयोनींत जन्मला. पुन्हा नरकांत गेला व पुन्हा सिंह झाला. तेथें तो एकदा एक हरिण मारून खात असतां अजितजय नामक चारण मुनि आले व त्यांनीं त्याला शिलेवर बसून खूब धर्मबोध केला. तेव्हां सिंहाला पूर्वभवाचें ज्ञान झालें.

भो मृगेन्द्र! त्रिपृष्ट सन्भुक्त्वा सौख्यं विक्रमत ॥
मास्म श्वाभ्रश्च यदु ख तच्च स्मरसि यत्पुनः ॥ १३ ॥

मुनि म्हणाले, हे मृगेंद्रा, त्रिपृष्ठ अर्धचक्रवर्तीच्या भवांत पापकर्मानें तूं भोगलेलें विषयसुख विसरलास काय? त्या पापामुळें तुला नरकांत दुःख भोगावें लागलें हेंहि विसरलास काय?

दु खायाहश्च भोः कुर्वन्नीदवर्मोग्रपापभृत् ।
सद्यो जातिस्मरो भूत्वा तत्त्वश्रवणसौह्या ॥ १४ ॥

---

१ गच्छता २ सिंह प्रत्युवाच ३ भवानि भविष्यति.

तेथून तो धातकी खंडांत विदेह क्षेत्रांत, पुष्कलावती देशांतील पुंडरीकिणी नगरीचा राजा सुमित्र व राणी सुव्रता यांचे पोटीं प्रियमित्र नांवानें जन्मला. चक्रवर्तीचे वैभव बराच वेळ भोगून त्यानें दीक्षा घेतली व मेल्यावर तो सहस्रार स्वर्गांत सूर्यप्रभ नामक देव झाला.

छत्राकारपुरे भूत्वा स नन्दाख्योऽत्र दीक्षितः ॥
प्रोष्ठिलानाम वद्धवान्त्य जातः पुष्पोत्तरेऽच्युते ॥२३॥

जंबूद्वीपांतील छत्रपुरचा राजा नंदिवर्धन, राणी वीरवती यांना नंद नांवानें तो पुत्र झाला. नंद सुखें भोगल्यावर त्यानें प्रोष्ठिल मुनिजवळ दीक्षा घेतली व सोळा भावनेचें चिंतन करून तीर्थकर नामकर्म बांधलें. समाधिमरण झाल्यानंतर तो सोळाव्या स्वर्गांत पुष्पोत्तर विमानांत इंद्र झाला.

च्युत्वा विदेहनाथस्य सिद्धार्थस्याङ्गजोऽजनि ॥
सोऽत्र कुण्डपुरे नाथ कृतगर्भादिपर्वणादिकम् ॥२४॥

तथून च्यवन पावून तो विदेह देशांतील कुंडपुरचा राजा सिद्धार्थ व राणी प्रियकारिणी यांच्या पोटीं महावीर नाम धरून जन्मला. इंद्रानें अभिषेकादि केला. कारण

वीरः श्रीवर्धमानश्चेत्यस्य नामद्वयं व्यधात् ॥
स्वस्याय संशयो यस्माज्जन्मानन्तरमीक्षितात् ॥२५

---

१ प्रियकारिणीगर्भे २ अच्युतेन्द्र आ॰ मुने ।

वीर व वर्धमान अशीं त्याची दोन नावें ठेवली गेलीं. जन्मानंतर त्याना पाहताच जयसेन व विजयनामक दोन चारण मुनींचे संशय दूर झाले.

निर्वृत्तो जयसेनाभ्रचारिणा विजयेन च ।
तत्रैव सन्मतिर्देव इत्युक्त प्रन्दादर्शी ॥ २६ ॥

तेव्हा त्याना सन्मति असें नाव ठेऊन ते दोघे चारण मुनि आनंदानें परत गेले.

वीर शूरोऽधुनेत्युक्ति सुराणामिन्द्रसंसदि ।
श्रुत्वा सङ्गमकोऽन्येद्युरागतस्तं परीक्षितुम् ॥२७॥

महावीरच इल्ली खरा शूर आहे अशी चर्चा इंद्रसभेंत झालेली ऐकून संगम नामक कोणी देव त्याची परीक्षा करण्यासाठी गेला.

दृष्ट्वा क्रीडन्तमुद्यानेऽगमारूढो नृपात्मजैः ।
काकपक्षधरैं सार्धं सवयोभिर्महाफणी ॥ २८ ॥

इतर राजकुमारासह वर्गीचाभोंल झाडावर जावळ राखलेले राजपुत्रासह महावीर खेळत असलेले पाहून तो देव महासर्प बनला.

भूत्वा वेष्टितमास्कन्धादस्थात्तद्भयतोऽखिला ।
विटपिभ्यो निपत्याशु राजपुत्राःपलायिता ॥ २९ ॥

त्या महासर्पानें झाडाच्या बुंध्याला विळखा घातलेला पाहून भ्यालेले राजकुमार फांद्यांवरून उड्या मारून पळून गेले.

१ गत २ इदानीम् ३ सुराणामुक्ति ४ वृक्ष ५ स्थित ६ सर्प ७ वृक्षात् ८ भूमौ पतित्वा ।

विघ्नानलात्मकृत्येप मनो निक्षेप्तुमक्षमः ।
त्वं महतिमहावीरोऽसीत्युक्त्वास्तौन्मुदानटत् ॥३४॥

या सर्वांनी महावीरास खूप उपसर्ग केले पण तपोनिश्चल जोरावर महावीरांनी आपलें मन किंचित्तहि विचलित होऊ दिलें नाहीं. हें पाहून तुम्ही महतिमहावीर आहां असें ह्मणून रुद्रानें प्रभूची आनंदानें नाचून स्तुति केली

एना वृषभसनस्य मप्यस्यापि स्वयापितः ॥
सोऽपि स्वकान्तसम्पर्कशंङ्किनी शृङ्खलासिता ॥३७॥

शेठन तिला आपल्या वानवाचा दासी झणून ठेवल पण शेठजाचा तिच्यारी सभ'ग घडल या भातीन तिने चदनला ‹ड्या घालून केदेंत ठेविल

शरावस्थसधान्याम्लभीर्णकोद्रवदित्सया ॥
तामनाथयदन्येद्युराश्य चयासमागतम् ॥ ३८ ॥

तिला ती मडक्यातून कादवचा भात पत्रेतून खायाला दत असे एकदा त्याच गावीं भिक्षेसाठीं महावीर आले

वार प्रत्युद्यता भक्त्या सद्यागलितशृङ्खला ॥
दिव्यभूपाम्बरा कशन्युतपुष्पाञ्चितक्षिति ॥ ३९ ॥

महावीर स्वामाचे भक्तीन स्वागत करात असता तिच्या शृखळ तुटल्या तिचीं वस्त्र दिव्य झाला कस सुशोभित झाल केसातून पुष्पें जमिनावर गळून ती सुदर दिसू लागली

स्वीकृत्यं शीलमाहात्म्याद्धेमीभतशरावगम् ॥
क्षीरशाल्यादनीभत तत्स्वमक्तमयोजयत ॥४०॥

शीलमाहात्म्यामुळें मडक सोयाच झाल कादूचा भात खीर झाला व त्याचा स्वीकार महावीरानीं केला

१ सायवाह भ्यस्र वृषभसनाम्न २ नद्यान्याया अपयत् ३ मद्ग ४ वद्धा ५ अभ्युतिष्ठन्ती उद्यमपूर्वकम श्री वीरसन्मुख गच्छती ६ विविना प्रतिमहा ॥

त्यानें महावीराना शंका विचारल्या व त्यांचें समाधान झाल्यामुळे त्यानें दीक्षा घेतली व पाप कर्माचा नाश करणारें तप आचरिलें तेव्हां तो इंद्रभूति गणधर झाला

किञ्चिदूनशरत्रिंशद्वर्षस्तार्हन्त्यपदःपदम् ।
परं प्राप्तो महावीर स दिश्यान्नः परं पदम् ॥४५॥

तीस वर्षांना कांहीं कमी दिवस अर्हंत पद भोगून जे सिद्ध पदाला गेले ते महावीर आम्हांला इष्ट पद देवोत.

मद्यमासमधुत्यागात्सौधर्मं स पुरूरवाः ।
त्यां मरीचिर्दिवीभूय षड्वारान्साङ्ख्यतो गत ॥४६

पुरूरवा भिल्ल मद्य, मांस व मधाच्या त्यागामुळें सौधर्मस्वर्गी प्रत गेला. तेथून मरीचि होऊन देव झाला व सहा वेळा सांख्य मताचा ब्राम्हण झाला

ततस्त्रसस्थावरेषु क्लिष्ट्वा साङ्ख्यो द्विजोऽभवत् ।
स्वर्गतो विश्वनन्दी सन्नपि निर्ग्रन्थदीक्षया ॥ ४७ ॥

नंतर अनेक त्रस व स्थावर योनीत जन्म घेऊन तो सांख्य मताचा ब्राम्हण झाला. पुढे स्वर्गातील देव होऊन विश्वनंदी झाला.

त्रिपृष्टोऽन्त्यश्वभ्रागिंहो धर्मभूय ततःश्वसनं ।
सिंहोऽथ श्रावकत्वेनाद्यकल्पेऽथ ततःस्वगः ॥ ४८ ॥

नंतर देवगतींतून त्रिपृष्ट झाला. पुढे नरकगतीतून सिंह झाला व मग देव होऊन विद्याधर झाला

---

१ विश्वमान ।

च्युत्वानत हरिषेण सन्महाशुक्र ततोऽभवत् ॥
प्रियमित्र सहस्रार नन्द श्चाच्युतेन्द्रताम् ॥ ४९ ॥

दगतीतन च्यवून हरिषेण झाला न्हा देव होऊन प्रियमित्र झाला नतर सहस्रार स्वर्गांत जाऊन नंद झाला व मग , अच्युत स्वर्गात इंद्र झाला

ततश्च्युतो विरज्यात्तसयम प्राप्य केवलम् ।
तीर्थकृत्त्व्य य सिद्धो महावीर नमामि तम् ॥ ५० ॥

तेथून च्यवन जो महावीर झाला व राज्य पावून दीक्षा घेऊन त्यावर तपाचरण करून जाला केवलज्ञान झाले व त्याने धर्मतीर्थ प्रवर्तन करून सिद्धपद मिळविले त्याला मी नमन करतो

गणभृत्पूर्वधृत्सत्वसयमावधिमतिप ।
विक्रियर्द्धीश्वरान्तुर्यज्ञानिन श्चरम्भणा॰ ॥ ५१ ॥
वादिनश्चार्यिका यथा श्राविका श्रावका गण ।
देवादेव्यश्च तिर्यञ्चस्तान्नुमस्तीर्थनायकान् ॥ ५२ ॥

गणधर, चादापूर्वाचे धारक, सामान्यमुनि, अवधिज्ञानी, विक्रियाधर मुनि, मन पर्ययज्ञानी, केवलज्ञानी सामर्थ्य आहे असा सर व ज्यांच्या सभात वादपटु मुनि व आर्यिका श्रावक व श्राविका, देवदेवी व तिर्यंच प्राणी आहेत त्या तीर्थकराना मी नमन कर ।.

इत्याशाधरस्दृब्ध त्रिषष्टिस्मृतिनाम्नि महापुराणातस्तत्त्वसङ्ग्रहे श्रीमहावीरपुराण चतुर्विंशम् ॥

---

१ दीपक २ सप विद्ने